शनिवार । ३ एप्रिल १९८२ । एक रुपया

माणूस

## लखनवी बंड

भाजप, संघाशी संबंधित असलेल्या दिल्लीतील काही मंडळींनी मनेका गांधींचे 'सूर्य' हे मासिक विकत घेतले म्हणून इंदिरा गांधी भयंकर संतप्त झाल्या. अशी आतल्या गोटातून आलेली वार्ता एका वृत्तपत्राने दिली आहे. हा राग थोडा कमी होतो न होतो तोच सूनबाईंनी सासुबाईंवर २८ मार्चच्या लखनौ परिषदेचा दुसरा वार केला आहे. इंदिरा गांधी इंग्लंडमध्ये भारतमहोत्सव साजरा करीत होत्या, आपल्या जागतिक महत्त्वाचे प्रदर्शन करीत होत्या, त्याच वेळी इकडे त्यांचे कौटुंबिक मतभेद चव्हाट्यावर येत होते. त्यांच्या घराण्याच्या प्रतिष्ठेला सुरुंग लागत होते. एकूण नेहरूपरिवाराला घराण्याविषयी अभिमान खूप. जुन्या काळीसुद्धा मोतीलाल नेहरू व जवाहरलाल नेहरू यांचे मतभेद कितीही असले व राजकारणात दोघांनी काहीकाही वेळा परस्परविरोधी भूमिका घेतल्या होत्या तरी आपल्या वडिलांविषयी कुणी अनादराने कमी-जास्त बोलले तर मुलगा खवळत असे. जाहीर सभेतही असे बोलणाऱ्यांची खरडपट्टी जवाहरलालांनी काढल्याची उदाहरणे आहेत. तोच 'खानदान की इज्जत'चा वारसा इंदिरा गांधीही जपून असतात. हा वारसा तसा सरंजामशाहीचा अवशेष आहे. पण तो जागरूकतेने सर्वत्र जपला जातो आहे, एवढे खरे. कुटुंबसंस्थाच जेथे मोडकळीस येत आहे तेथे खानदान आणि त्याची इज्जत वगैरे भावनांना अर्थच काय उरतो? लवकरच ही एक हास्यास्पद भावना ठरू लागेल! तोवर मात्र सगळ्यांनाच असे वाटणार की, कौटुंबिक मतभेदांचे जाहीर प्रदर्शन होऊ नये, मतभेद अगदी तात्त्विक स्वरूपाचे असले तर मात्र गोष्ट वेगळी. पण इंदिरा आणि मनेका यांच्यातील बेबनावात कमली कपाळाची आली आहे तात्त्विकता? सूनबाईंना राजकारणात यायचे आहे. सूनबाईंच्या मागे त्यांची आईही आहे. सासुबाईंना या माय-लेकींना दूर ठेवायचे आहे. सूनबाई तरी राजकारणात का येऊ पाहात आहेत? संजय गांधींच्या पाच कलमी कार्यक्रमाकडे म्हणे दुर्लक्ष होत आहे, संजय अनुयायांना पक्षातून एकामागोमाग हाकलले जात आहे म्हणून! मुळात तो संजय गांधींचा पाच कलमी कार्यक्रम असा काय मोठा नाविन्यपूर्ण होता? नाविन्य होते ते अंमलबजावणीचे. कुटुंबनियोजन, झाडे लावणे याला कुणाचा विरोध असण्याचे काहीच कारण नाही. मनेका गांधींना खरोखरच या कार्यक्रमाविषयी आस्था असेल तर इंदिरा गांधी त्यांना हवा तितका वाव देऊ शकतात. पण मनेकाबाईंना हवी आहे सत्तेतील भागीदारी. आणि राजीवला जर पुढे आणायचे असेल तर इंदिरा गांधी अशी भागीदारी कशी करू देतील? म्हणून लखनौ परिषदेचे निमंत्रक अकबर अहंमद यांना पक्षातून लगेच गचांडी दिली गेली. पुढेही त्यांची धडगत कमीच दिसते. मनेकाबाईंचा काटा जरा नाजुक पद्धतीने काढला जाईल एवढेच. तो राहिला तरी फारसे बिघडत नाही. त्यांची ताकद ती किती? पण अशा किरकोळ वाटणाऱ्या गोष्टींकडे दुर्लक्ष करायला इंदिरा गांधी म्हणजे जनता पक्ष व त्याचे नेते थोड्याच आहेत? मनेकाला घर सोडावे लागलेच आहे. □

मनेकाबाई आणि अकबर अहमद यांना भाजप/संघ वर्तुळांकडून फूस मिळत आहे अशी आगपाखड इंदिरा गांधींनी केलेली आहे. राजीव गांधी आणि ही वर्तुळे एकमेकांच्या अधिक जवळ येत आहेत, असेही दिल्लीत बोलले जाते. खरे काय? □

काहीही असो. मनेका-अकबरांचे हे लखनवी बंड लवकरच शमवण्यात येईल. उद्या अगदी अंतुले त्यात सामील झाले तरी! □

## एक फर्मास श्याम कथा..?

पृष्ठ...११ वर

# स. न. वि. वि.

■ दि. ६ मार्चच्या 'माणूस'मध्ये मुखपृष्ठावरच प्रसिद्ध झालेले प्राध्यापकाच्या बहिष्काराला विद्यार्थ्यांचा विरोध कशासाठी, हे प्रकटन वाचले. त्यामुळे सुचलेले काही विचार आपल्याकडे पाठवीत आहे.

'विमानाचे अपहरण करून, आपल्या मागण्यांसाठी निष्पाप विमानप्रवाशाच्या जीवनाशी क्रूर खेळ करणाऱ्या आणि प्रसंगी स्फोट घडवून विमान नष्टही करणाऱ्या गुंडांशी श्री. सहस्रबुद्धे यांनी प्राध्यापकांची तुलना केली, ते पाहून मन आनंदाने भरून आले. त्यांना धन्यवाद द्यावे तेवढे थोडेच! फक्त एक गोष्ट या अनुषंगाने नमूद करावीशी वाटते. ती अशी की, अशी तुलना ज्यांना ग्राह्य वाटते त्याना प्राध्यापकांच्या मागण्या, त्यांची दुःखे याची कितपत कल्पना आहे आणि त्या मागण्याना त्याची कितपत सहानुभूती आहे हे यावरून स्पष्ट दिसून येते.

या तुलनेवरून आणखी एक महत्त्वाचा बोध होतो. तो असा की, विमाने पळवणारे अतिरेकी अनेक पूर्वसूचना देऊन, शासनाला अर्ज-विनंत्या करून, आपण केलेल्या कष्टांचा मोबदला म्हणून अशी कृत्ये करतात. अनेकांच्या सामान्यज्ञानात यामुळे नक्कीच भर पडली असेल.

आतापर्यंतच्या काही वर्षांत सातत्यानं प्राध्यापक आपल्या मागण्या शासनासमोर ठेवत आले आहेत. त्यातील काही मागण्या अगदी जीवन-मरणाच्या प्रश्नाशी निगडित नसल्या तरी अधिक चांगले जीवन जगून अधिक चांगले काम करण्याशी त्याचा नक्कीच संबंध आहे. शिक्षकाचे काम करणाऱ्या व्यक्तीने कायम त्यागच करावा आणि तोही वाढत्या महागाईतल्या अपुऱ्या पगारात समाधान मानून, प्रामाणिकपणे केलेल्या कामाचा अधिक मोबदला न मागता, हा कुठला न्याय?

प्राध्यापक वर्ग हा Privileged Class आहे, असे श्री. सहस्रबुद्धे म्हणतात त्याचे कामाचे तास आणि सर्वांच्याच डोळयांवर येणाऱ्या त्याच्या सुट्टया या प्रस्तुत लेखकांनाही खटकत असाव्यात. त्या सुट्टयाचा बहुताशी वेळ (मे महिना वगळता) नैमित्तिक कामाचा भाग म्हणून उत्तरपत्रिकाचे गठ्ठे तपासण्यात जातो, हे कोण लक्षात घेतो? कामाचे तास कमी दिसतात; पण शंभर विद्यार्थ्यांच्या वर्गात कधी कधी ओळीनं तीन तीन तास बोलण्याचे काम प्राध्यापक करतो, त्याचा कधी कुणी विचार केला आहे! वर्गात घेतलेल्या प्रत्येक तासामागे किमान दोन तीन तासांची पूर्वतयारी, मेहनत असते; नवीन सत्राची तयारी, अभ्यास, सुट्टीतही करावा लागतो, त्याचा हिशेब कोण करणार?

त्यातही अर्धवेळ किंवा तासांच्या हिशेबाने काम करणारे प्राध्यापक, ग्रंथपाल यांची स्थिती काय असते हे अनेक विद्वान विचारवंताच्या खिजगणतीतही दिसत नाही!

शहर गावात प्राध्यापक 'शर्टाची इस्त्री बिघडू न देता आंदोलन करीत आहेत' असे विधान करताना ग्रामीण भागातील प्राध्यापकांची अवस्था, व्यवस्थापन मंडळांच्या हाती असणारे संपूर्ण अधिकार आणि 'विद्यार्थी कमी आहेत' या सबबीवर बंद पडणारे अनेक विषयाचे विभाग यांचा उल्लेखही या प्रकटनात नजरचुकीनं राहून गेलेला दिसतो.

प्राध्यापकाच्या कामासाठी आवश्यक असलेली गुणवत्ता आणि त्याला मिळणारा मोबदला याचा शैक्षणिक पात्रतेचे लोक इतर क्षेत्रात काय करून दाखवू शकतात या संदर्भात का विचार होत नाही? वैद्यकीय सहाय्य किंवा इतर कुठलाही भत्ता मागण्याचा शिक्षकाला, प्राध्यापकाला काय अधिकार नाही?

गेले १८ महिने चिकाटीने, सातत्याने सरकारशी संपर्क साधण्याचा प्रयत्न प्राध्यापकांनी केला आहे. स्मरणपत्रे, सूचनापत्रे, मोर्चे, शिष्टमंडळांतर्फे पाठवलेली निवेदने असे अनेक मार्ग त्यासाठी अमलात आणले गेले. या प्रत्येक निवेदनातून निदान बोलणी सुरू करावीत, अशी शासनाला विनंती होती. न पेक्षा बहिष्काराचा मार्ग चोखळावा लागेल, अशी सूचना केली होती. याची दखल घेण्याइतके शिक्षण किंवा विद्यार्थ्यांचे हित महत्त्वाचे आहे असे शासनाला वाटले नाही!

शासन आणि वृत्तपत्रे यांनी आजपर्यंत पद्धतशीर कोंडी करून अनुल्लेखाने हे आंदोलन दडपले आहे. वृत्तपत्रांच्या 'सहकार्या'मुळे अनेक प्रयत्न करूनही परिस्थितीचे खरे चित्र समाजापुढे आलेच नाही. आणि 'बहिष्काराचा निर्णय हे काय अमलात आणणार' अशा विचाराने 'सरकारने या अर्जांनाही कायम वाटाण्याच्या अक्षता लावल्या. त्यामुळे नाइलाजाने हा मार्ग स्वीकारावा लागला. परीक्षा प्रत्यक्ष घेण्यापेक्षा उत्तरपत्रिका तपासणे हे प्राध्यापकाचे काम असते. विद्यापीठाच्या नियमानुसार हे काम पूर्ण ऐच्छिक आहे; म्हणूनच हा बहिष्कार करण्याचा प्राध्यापकांना हक्क आहे, त्यासाठी सर्वांची परवानगी काढण्याची काय गरज?

'जूनमध्ये संपावर जा!' असा आगंतुक


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकविसावे

अंक : चव्वेचाळिसावा

३ एप्रिल १९८२

किंमत : एक रुपया

संपादक

श्री. ग. माजगावकर

सहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :

चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

सल्ला अनेकांनी दिला आहे तसे केल्याने शासन मागण्याकडे लक्ष पुरवेल हे फारच गोंडस स्वप्नरंजन आहे. आजपर्यंत शासनाने आमची काय संभावना केली, तो अनुभव आमच्या गाठी आहे. 'त्या वेळी संपाचा उपयोग होणार नाही' हे गृहीत तत्त्व आहे, असे श्री. सहस्रबुद्धे म्हणतात; पण त्यामागे असलेला भरीव पुरावा, अनुभव त्यांना दिसत नाही. याचे ताजे ढळढळीत उदाहरण म्हणजे MFUCTO च्या महाराष्ट्रभरच्या प्रतिनिधींना मुंबईपर्यंत बोलावून, मुख्यमंत्र्यांनी ऐन वेळी त्यांना भेटण्यास दिलेला नकार आणि गुप्तपणे विचाराधीन असलेला विद्यापीठ परीक्षाचे काम विनामोबदला अनिवार्य करणारा काळा कायदा !

अशा 'प्रेमळ' शासनाला न लागलेल्या झोपेतून उठवण्यासाठी बहिष्काराखेरीज दुसरा जालीम उपाय नाही आणि त्याच्या परिणामाची जबाबदारीही सर्वस्वी शासनाचीच आहे. आतापर्यंत प्राध्यापकानी बहिष्कार घातलेला नसतानाही परीक्षा कशा घेतल्या जात होत्या, त्यात कशा त्रुटी रहात होत्या हे एकूण यंत्रणेच्या 'यशाचेच' उदाहरण आहे !

'या बहिष्काराने प्राध्यापकाना काहीच गमवावे लागणार नाही', हे आणखी एक विधान. केवळ शासनाच्या आडमुठ्या धोरणामुळे ज्या विद्यार्थ्यांत राहून आम्ही काम करतो त्यांच्या मनात बुद्धिपुरस्सर इतका कडवटपणा निर्माण व्हावा यापेक्षा प्राध्यापकाचे अधिक काय नुकसान होऊ शकते ?

जाता जाता एक गोष्ट सांगणे आवश्यक आहे. श्री. सहस्रबुद्धे यांनी अ. भा. वि. प. चे धोरण स्पष्ट करण्यासाठी हा व्याप केला असावा असे वाटते. मी स्वत. काही वर्षांपूर्वीच महाविद्यालयात शिकत असताना तीन वर्षांहून अधिक काळ अ. भा. वि प. मध्ये काम केले आहे आणि आजतागायत माझ्या शक्तीनुसार अनेक कार्यक्रमाना आर्थिक हातभार लावत आले आहे, हा एकच मुद्दा मला वाटते, पुरेसा बोलका आहे !

७ मार्च

प्रा. शोभना नाडकर्णी
(कोल्हटकर)
रुपारेल कॉलेज, मुंबई १६

## पुणे वार्ता

# ग्रामीण आत्मकथन श्रोते नाहीत

२२ मार्चला पुण्याच्या वृत्तपत्रातील 'स्थानिक कार्यक्रम' या सदरातील 'ग्रामीण आत्मकथन' या कार्यक्रमाने लक्ष वेधून घेतले. स्थळ – पुणे साहित्य परिषदेचं सभागृह. वेळ – संध्याकाळी साडेसहाची.

ग्रामीण आत्मकथन म्हणजे नक्की काय असावं, असा विचार मनात घेऊनच साहित्य परिषदेत गेले. या कार्यक्रमाचे संयोजक होते वैजापूरच्या अनतराव पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य आणि प्रसिद्ध ग्रामीण साहित्यिक श्री. रा. रं. बोराडे, मराठवाडा युवक कल्याण केंद्राचे प्रमुख सोमनाथ रोडे, मराठवाडा राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक भास्कर चंदनशिव आणि अर्थातच प्रा. आनंद यादव, एन. के. पाटील, डॉ. माने यांसारखी ग्रामीण जीवनाबद्दल विचारपूर्वक काम करू इच्छिणारी अनुभवी मंडळी.

पुण्यात झालेला ग्रामीण आत्मकथनाचा कार्यक्रम म्हणजे ग्रामीण आत्मकथन कौशल्य विकास शिबिराचा प्रात्यक्षिकवजा छोटा भाग. ग्रामीण कौशल्य विकास शिबिर ही कल्पना वैजापूरच्या काही मान्यवर, विचारपूर्वक काम करणाऱ्या व्यक्तींना प्रथम सुचली, महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेद्वारा या शिबिराची माडणी झाली आणि ग्रामीण विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनी त्याला उत्स्फूर्त प्रतिसादही दिला.

कौशल्य विकास शिबिर योजनेत वैजापूरला आतापर्यंत चार शिबिरं झाली. ग्रामीण आरोग्यासाठी शरीरविज्ञानाची प्राथमिक तोंडओळख करून देणारं 'आरोग्य शिक्षण शिबीर', स्वयंपूर्ण व्यक्तिमत्त्वासाठी 'उद्योजकता शिबीर', लोककला ज्या ग्रामीण मातीत रुजल्या, वाढल्या त्याची ओळख करून देण्यासाठी 'लोककला विकास शिबीर' आणि ग्रामीण जीवनाची ओळख एकमेकाला पटवून देण्यासाठी, परिणामकारक अनुभव कथन शैलीसाठी 'आत्मकथन कौशल्य विकास शिबीर' ही चार शिबिरे या योजनेद्वारा आतापर्यंत यशस्वीरीत्या पार पाडली.

आत्मकथन शिबिराचं उद्घाटन प्रसिद्ध लेखक प्रा. आनंद यादवांनी केलं आणि शिबिराचा समारोप लोकप्रिय ग्रामीण कवी श्री. ना. धों. महानोरांनी केला. आत्मकथन शैलीची विद्यार्थ्यांना खरी ओळख पटण्यासाठी 'उपरा' 'बलुतं', 'मुक्काम पोष्ट देवाचे गोठणे' यासारख्या साहित्यावर मोकळी चर्चा झाली. प्रत्यक्ष अनुभवासाठी गावातील बारा बलुतेदारांशी, शेतमजुरांशी, भटक्या जमातीशी आणि लोककलावंतांशी भेटी-गाठी (या मात्र अगदी अनौपचारिक स्वरूपात) झाल्याच. या भेटीतून, चर्चांतून अनुभवांना व्यापक स्वरूप आलं, असं या शिबिरातल्या मुलांनी सांगितलं. या सर्वांवर आधारित असं हे आत्मकथन.

ग्रामीण भागात रहाणाऱ्या दलित समाजाला 'खालच्या जातीमुळे' माणूस म्हणून जगता येत नाही. सामाजिक नाकारलेपणामुळे प्रस्थापित समाजाविषयी सतत परकेपणा वाटत रहातो आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट, हे सारं बोलावसं वाटतं. ग्रामीण महाविद्यालयीन मित्र–मैत्रिणींनी हे मोकळेपणाने बोलावं, ही या कार्यक्रमामागील संयोजकांची भूमिका आहे. अशा तऱ्हेच्या संवादासाठी आत्मकथन हा फॉर्म वैशिष्ट्यपूर्ण आहे. कारण आजच्या दलित साहित्याशी याचं जवळचं नातं आहे. आज मान्यता पावलेलं दलित साहित्य प्रामुख्याने वैयक्तिक अनुभवातूनच आपल्या समाजाचं प्रातिनिधिक स्वरूपात चित्रण करणारं आहे. अनुभवाचं प्रचंड वेगळेपण हीच त्याची सध्याची शक्ती आहे. हे आत्मनिवेदन प्रामाणिक, अनुभवाधिष्ठित आणि प्रभावी असणं म्हणूनच जरुरीचं आहे त्यामुळे यासाठी आत्मकथन कौशल्य विकास शिबिराची कल्पना महाविद्यालयीन मुला मुलींना मार्गदर्शक वाटते.

आत्मकथनाचा प्रत्यक्ष कार्यक्रम फारसा समाधानकारक झाला नाही. जे जीवन आपण जगलो, जगत आहोत ते प्रामाणिक पद्धतीने माडण्यापेक्षा कथाकथनाच्या प्रचलित लोकप्रिय तंत्राने स्वत.चे, अनुभव चटकदार पद्धतीने खुलवून सांगण्याकडे बऱ्याच जणांचा कल दिसला. हे नक्की टाळता आलं असतं.

याला अपवाद म्हणजे उदगीर जिल्ह्यातला हरिजन समाजातला जाधव आणि मंगळवेढ्याचा शेख मेहबूब ! कार्यक्रमापूर्वी जाधव म्हणाला, 'मान्याच, सोनकांबळ्यांचं, दया पवारांचं जीवन मला माझंच वाटतं. तुम्हाला काटा बोचतो, आमचं जीवनच काट्यावर आहे!'

कार्यक्रमात निवडक बारा कथनाचा समावेश होता. श्रोत्यांच्या अत्यल्प उपस्थितीमुळं संयोजकानी कार्यक्रम लवकर आवरता घेतला. सुरुवातीच्या वीस-पंचवीस श्रोत्यांपैकी चार-पाच श्रोते शेवटपर्यंत टिकले. प्रा. यादव नंतर खेदानं म्हणाले, 'परदेशी भाषांमधून चर्चा करायला पुण्याचं सांस्कृतिक सार एकत्र जमू शकतं, पण आपल्याच समाजाचं हे उपेक्षित अंग, त्यांची कहाणी ऐकायला मात्र कोणाला फुरसत नसते.'

यादव म्हणाले हे खरंच आहे; पण असे जाहीर कार्यक्रम यशस्वी करण्यात संयोजकांचाही हातभार असावा लागतो. या शिबिराच्या संयोजकांनीच 'शिबिर तंत्र आणि मंत्र' अर्थात शिबिरं यशस्वी कशी करावीत, यावर स्वतंत्र शिबीर घेतलं होतं. तरीसुद्धा केवळ स्थानिक कार्यक्रमांच्या यादीत नाव टाकून सयोजक स्वस्थ कसे बसले, हा प्रश्नच आहे. आत्मकथनाचा पुढचा कार्यक्रम मुबईत करायचा संयोजकाचा विचार आहे त्या वेळी कार्यक्रमापूर्वी संबंधित संस्था, कार्यकर्ते आणि सामान्य श्रोते यांच्यापर्यंत कार्यक्रमाविषयी योग्य माहिती पोचल्यास श्रोत्यांच्या प्रतिसादातून या संवादातलं उद्दिष्ट साध्य होऊ शकेल.

दलित साहित्याला 'विद्रोही' हे विशेषण लावून मोकळं होता येतं. या विद्रोहाला संस्कारित करण्याचा प्रयत्न करून संस्कारातून चिंतन आणि चिंतनातून कृती या दिशेनं टाकलेलं पाऊल म्हणून कौशल्य विकास शिबिराच्या संयोजकांचं आणि त्यात भाग घेणाऱ्या विद्यार्थी मित्र-मैत्रिणींचं मात्र अभिनंदन !

—मेधा देशपांडे

## माथाडी कामगारांचा आधार

# अण्णासाहेब पाटील

ज्या अण्णासाहेबाच्या नेतृत्वाखाली लाखो कामगारांनी सोमवारी विधानभवनावर विराट असा मोर्चा काढला त्याच लाखो कामगारांना मंगळवारी (दि. २३ मार्च) त्यांच्या अंत्ययात्रेत अतीव दु:खाने सामील व्हावं लागलं, ही केवढी मोठी दुर्दैवी घटना ! नियतीचा हा किती मोठा आघात !!

'अण्णासाहेब आमच्यातून निघून गेले,' या गोष्टीवर कामगाराचा अद्यापही विश्वास बसत नाही. ही अतीव दु:खाची धक्कादायक गोष्ट त्यांना सहनच होत नाही; पण दुर्दैवाने हे सर्व झाले आहे. आमदार अण्णासाहेब पाटील हे आता सर्वांच्यातूनच निघून गेले आहेत !

महाराष्ट्रातील समाजाला ज्यावेळी अण्णासाहेबाची खरीखुरी आवश्यकता वाटू लागली होती अशाच प्रसंगी त्याचं जाणं सर्वांनाच हानिकारक ठरलं आहे. गेल्या काही वर्षांत अण्णासाहेबानी ज्या तत्त्वाच्या आधारावर महाराष्ट्रात चळवळ उभी केली होती त्याने या भूमीतील मराठी माणूस आता कोठे जागा होऊ लागला होता !

अण्णा हे तसे कामगाराचे नेते ! कामगार म्हणूनच त्यांनी आपल्या जीवनकार्यास सुरुवात केली आणि हा मनुष्य मुबईच्या माथाडी कामगारांचा 'देव' ठरला; परंतु गेल्या काही वर्षांत त्याचं नेतृत्व विशाल झालं होतं. त्यांच्या नेतृत्वाने उभा महाराष्ट्र जरा कोठे जागा होऊ लागला होता.

या देशात समान नागरी कायदा असावा, ही अण्णासाहेबांची रास्त आणि न्याय्य मागणी ! जातीच्या आधारावर सवलती न देता आर्थिक दुर्बलतेवर त्या दिल्या जाव्यात, याचा पाठपुरावा ते प्रत्येक ठिकाणी करीत. सीमाप्रश्न लवकर सुटावा ही अण्णासाहेबांची आणखी एक मागणी.

या सर्व गोष्टींसाठी ते अखेरपर्यंत लढले ! राजकीय प्रवाहात नेईल तिकडे आणि हवे तसे वाहात जाणारे अण्णासाहेब नव्हते. ज्या वेळी तत्त्वाचाच प्रश्न उभा ठाकला तेव्हा त्यासाठी त्यांनी शरद पवारांची काँग्रेसही सोडली. गेल्या काही वर्षांत तर ते कोणत्याच राजकीय पक्षात जवळजवळ नव्हतेच. स्वत:कडे असणाऱ्या नेतृत्व गुणाच्या आधारावर आणि संघटनकौशल्यावर अण्णासाहेबानी अखिल भारतीय मराठा महासंघाची जबरदस्त अशी संघटना उभारली. या महासंघाने पहाता पहाता संपूर्ण महाराष्ट्रभर आपले नेतृत्व विस्तारण्यास सुरवात केली होती.

अण्णासाहेबाच्या या कार्यानेच सीमाबांधवांना त्यांच्याविषयी विलक्षण आपुलकी आणि प्रेम वाटू लागलं होतं. त्यांच्या आशा उंचावल्या होत्या. सर्व शक्तीनिशी ते त्यांच्या लढ्यात सामील होऊ लागले होते.

सोमवारी त्यानी विधानभवनावर जो विराट असा मोर्चा काढला त्यात लाखो माथाडी कामगाराबरोबरच अनेक सीमाबाधव होते. त्या वेळी मुख्यमंत्री बाबासाहेब भोसले यांना अण्णासाहेबाच्या नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळ भेटले. बाबासाहेबांना अण्णांनी स्पष्ट सागितले की, 'या माझ्या मागण्यांकडे जातीने लक्ष द्या, नाही तर हा अण्णासाहेब साऱ्या महाराष्ट्राला पेटवून देईल !'

सोमवार संध्याकाळचे अण्णासाहेबाचे हे शब्द विरतात न विरतात तोच मंगळवारी सकाळी त्यानी स्वत:ला विझवून घ्यावं, ही केवढी मोठी धक्कादायक आणि दुर्दैवी घटना !

अण्णाचे असे अकाली जाणे लक्षावधी माथाडी कामगाराना पोरके करणारे आहे. कारण या कामगाराच्या कुटुबांचा ते खऱ्याखुऱ्या अर्थाने त्राता होते. आज त्यांचा हा आधारच निखळून पडला. बलदंड शरीराचे, पीळदार मिशाचे आणि घणाघाती आवाजाचे अण्णासाहेब नुसते पुढारी नव्हते, तर कुशल सघटक होते. चागला सघटक आपल्या अनुयायांची जशी सर्वार्थाने काळजी वाहतो तशी अण्णासाहेब हजारो माथाडी कामगाराची बारीक-सारीक बाबतीत काळजी वाहात. तळागाळातल्या विखरून पडलेल्या हमाल, ओझेवाहक माथाडी कामगाराला त्यांनी संघटित करून आर्थिक लाभ तर मिळवून दिलाच, पण या कामगारांची मुले

पृष्ठ २४ वर

# बांगला देश
## लष्करशाहीची पकड
### वा. दा. रानडे

बांगला देशमध्ये दहा वर्षांत तिसऱ्यांदा लष्करी क्रांती झाली. बांगला देश पाकिस्तानातून फुटून स्वतंत्र राष्ट्र झाल्यानंतर तेथे लोकशाही रुजेल, अशी अपेक्षा बाळगणारांना देशाचे पहिले पंतप्रधान शेख मुजीबुर रहमान, त्यांचे कुटुंबीय व मंत्री यांच्या हत्येने पहिला जबर हादरा बसला. त्यानंतर बांगला देशमध्ये ज्या राजवटी आल्या त्या भारतविरोधी आणि पाकिस्तानला अनुकूल अशाच होत्या. त्यांचे नेते बाह्यतः भारताशी सहकार्य ठेवण्याची भाषा बोलत होते; पण वृत्तपत्रांतून भारतविरोधी प्रचार चालू होता.

शेख मुजीब यांच्या हत्येनंतर काही काळ खोंडकर रहमान यांच्याकडे सत्ता होती. नंतर ब्रिगेडियर खलिद मुश्रफ यांनी त्यांचे सरकार उलथून पाडून सत्ता हाती घेतली; पण चार दिवसांतच मुश्रफ यांची हत्या झाली! लष्करी नेत्यांच्या सत्तास्पर्धेतून अखेर जनरल झिया उल् रहमान सर्वसत्ताधीश झाले. त्यांनी देशात लष्करी कायदा जारी केला. सर्व राजकीय पक्षांना बंदी केली; पण लोकप्रियता मिळविण्यासाठी लोकशाहीचा देखावा करायला हवा, याची त्यांना जाणीव झाली. त्यांनी स्वतःला देशाचे अध्यक्ष घोषित केले. आपल्या धोरणानुसार चालणारा बांगला देश नॅशनल पार्टी हा पक्ष त्यांनी स्थापन केला. नवी घटना तयार केली. या घटनेत संसदेचे अधिकार कमी करून अध्यक्षाचे अधिकार वाढविण्यात आले. या घटनेवर त्यांनी सार्वमत घेतले व त्यात घटनेच्या बाजूने मोठ्या प्रमाणात कौल मिळविला. नंतर त्यात त्यांनी मोठे बहुमत मिळविले. फेब्रुवारी १९७९ मध्ये त्यांनी देशात नव्या घटनेनुसार निवडणुका घेतल्या. त्यात बांगला देश नॅशनल पार्टीला मोठे बहुमत मिळाले. झियांची राजवट स्थिर झाली. तिला आता धोका नाही, असे वाटू लागले होते; पण काही तरुण लष्करी अधिकाऱ्यांनी चितगाव भागात झिया राजवटीविरुद्ध उठाव केला. तो मोडून काढण्यात आला तरी लष्करातच एक गट त्यांच्याविरुद्ध आहे, हे त्यातून दिसून आले. त्यानंतर मे १९८१ मध्ये चितगाव येथे झियांविरुद्ध काही लष्करी अधिकाऱ्यांनी कट करून त्यांना ठार केले; पण कट मोडून काढण्यात आला!

झियांची हत्या झाली तरी त्यांच्या पक्षाकडे सत्ता कायम राहिली. उपाध्यक्ष अब्दुस सत्तार यांना हंगामी अध्यक्ष म्हणून घोषित करण्यात आले. त्यांनी नंतर निवडणुका घेतल्या व मोठ्या बहुमताने त्यांची अध्यक्षपदी निवड झाली; पण या निवडणुकीतच पुढच्या संघर्षाची बीजे दिसू लागली होती. अवामी लीगतर्फे शेख मुजीब यांच्या सरकारमधील परराष्ट्रमंत्री कमाल हुसेन यांनी ही निवडणूक लढविली होती. कमाल हुसेन विजयी झाले तर लष्कर तो विजय मान्य करणार नाही, असा इशारा लष्करप्रमुख जनरल इर्शाद यांनी निवडणुकीपूर्वीच दिला होता. बांगला देशमध्ये लष्कर महत्त्वाचा घटक आहे. त्यांचा पाठिंबा असलेलेच सरकार अधिकारावर राहील, हेच त्यांना सूचित करावयाचे होते. बांगला देशात खरी सत्ता कोणाची? लष्करप्रमुख इर्शाद यांची, की हंगामी अध्यक्ष अब्दुस सत्तार यांची? हा प्रश्न सत्तार यांच्या हंगामी अध्यक्षपदाच्या काळात जनरल इर्शाद यांनी धसास लावला नाही. त्या वेळी त्यांनी सत्तार यांना पाठिंबा दिला; पण सत्तार मोठ्या बहुमताने निवडून आल्यानंतर आपल्याला देशाचा पाठिंबा आहे, लष्कराने आपल्या धोरणांना पाठिंबा दिला पाहिजे, सरकारवर लष्कराचा प्रभाव आपण मानणार नाही, अशी भूमिका त्यांनी घेतली. लोकशाहीच्या दृष्टीने वास्तविक ही भूमिका बरोबर होती. लोकशाहीत लोकनियुक्त सरकार हेच सर्वसत्ताधारी असले पाहिजे; लष्कराचे कर्तव्य देशाचे संरक्षण करण्याचे, त्यापलीकडे राजकारणात हस्तक्षेप व लुडबुड त्याने करता कामा नये, हीच भूमिका मान्य करायला हवी. देशाच्या कारभारात व सरकारमध्ये लष्कर महत्त्वाचा घटक होत नाही, ही दक्षता राजकीय पक्षांच्या नेत्यांनी घेतली पाहिजे. जपानबाबत आपलेच धोरण मानले गेले पाहिजे, असा आग्रह जनरल मॅकार्थर धरू लागले तेव्हा त्या वेळचे अमेरिकेचे अध्यक्ष ट्रुमन यांनी त्यांना लेखणीच्या एका फटकाऱ्याने अधिकारपदावरून दूर केले; पण राजकीय पक्ष दुबळे असतात तेव्हा लष्कराला राज्ययंत्रणेत हस्तक्षेप करण्याची आणि आपली पकड बसविण्याची संधी मिळते. पाकिस्तानात असेच घडले आणि बांगला देशात त्याचीच पुनरावृत्ती होत आहे.

देशाच्या कारभारात लष्कर महत्त्वाचा घटक मानला पाहिजे आणि त्यांच्या संमतीने निर्णय घेतले गेले पाहिजेत, असा आग्रह जनरल इर्शाद यांनी धरला. अब्दुल सत्तार यांनी ते मान्य केले नाही. लष्कराचे काम फक्त संरक्षणाचे, त्यापलीकडे त्याची लुडबुड मान्य केली जाणार नाही, अशी स्पष्ट भूमिका त्यांनी घेतली. नॅशनल सिक्युरिटी कौन्सिलच्या रचनेबाबत त्यांचे जनरल इर्शाद यांच्याशी मतभेद झाले. तिन्ही सेनादलांच्या प्रमुखांना त्यांनी या कौन्सिलमध्ये घेतले होते; पण ते अल्पमतात होते. कौन्सिलमध्ये लष्करी प्रतिनिधींचे बहुमत असले पाहिजे आणि या कौन्सिलला संरक्षणविषयक प्रश्न व धोरणाबाबत केवळ शिफारशी करण्याचे किंवा सल्ला देण्याचे नव्हे, तर निर्णय घेण्याचे अधिकार असले पाहिजेत, अशी जनरल इर्शाद यांची मागणी होती. ती सत्तार यांनी मान्य केली नाही. मंत्रिमंडळाच्या रचनेबाबतही सत्तार व इर्शाद यांच्यात मतभेद झाले. वास्तविक मंत्रिमंडळरचनेबाबत सूचना करण्याचा जनरल इर्शाद यांना काहीही अधिकार नव्हता. तो पूर्णपणे सत्तार यांच्या अधिकारक्षेत्रातील प्रश्न; पण जनरल इर्शाद यांची सूचना मान्य करून त्यांना मंत्र्यांच्या संख्येत कपात करावी लागली. उपाध्यक्षपदी हुडा यांची नेमणूक अध्यक्ष सत्तार यांनी केली होती. ते पूर्वी शेख मुजीब यांचे सहकारी होते. ही नेमणूक जनरल इर्शाद यांना पसंत नव्हती. याबाबतही सत्तार यांना त्यांचे ऐकावे लागले आणि हुडाकडून त्यांना उपाध्यक्षपदाचा राजीनामा घ्यावा लागला!

सत्तार नावाचे अध्यक्ष असून खरी सत्ता जनरल इर्शाद यांचीच आहे, हे या घटनांवरून स्पष्ट झाले होते; पण जनरल इर्शाद यांचे एवढ्याने समाधान झाले नाही. त्यांनी अखेर लष्करी कायदा जारी करून सर्व सत्ता हाती घेतली! पूर्वापूर्वीच्या लष्करी क्रांत्या आणि या वेळची क्रांती यातला एक महत्त्वाचा फरक म्हणजे यावेळी कोणाची हत्या घडली नाही! रक्तदान न होता हे सत्तांतर झाले! इर्शाद यांना काहीही प्रतिकार झाला नाही. त्यांनी अध्यक्ष सत्तार व मंत्रिमंडळास अटक केली. संसदेचे विसर्जन केले. घटना स्थगित केली. पूर्वीच्या राजवटीवर भ्रष्टाचाराचा आरोप त्यांनी केला आहे व त्याबद्दल खटले भरण्यात येतील.

बांगला देश भारतापासून दूर गेलेलाच आहे. जनरल इर्शाद यांच्या राजवटीत तो पाकिस्तान, चीन, अमेरिका, यांच्या आघाडीत अधिक खेचला जाण्याचो आणि या देशाचा, विशेषतः चीनचा प्रभाव तेथे अधिक वाढण्याची शक्यता आहे. □

स. शि. भावे

# मध्यमवर्गीय हळवेपणाचा कोश

आई खरोखर रागावल्या होत्या म्हणून आज त्या गप्प होत्या. एरवीसारखा राग असता तर एव्हाना त्यांची फैर सुरू झाली असती !

त्यांच्याकडे कामाला येणारी बाई अजून आली नव्हती म्हणून तर त्यांचा राग होताच; पण, तिला अजूनही आपण शिस्त शिकवू शकलो नाही, ही रागाची छटा अधिक तीव्र होती.

आई म्हणजे माझ्या ज्येष्ठ मैत्रीण. अंतर्बाह्य प्रामाणिक. मायाळू. सरळ. पूर्वग्रहविरहित, पिढीने जुन्या, पण वृत्तीने आधुनिक; त्यांना मी खास प्रेमाने आई म्हणतो.

तर त्या रागावून गप्प होत्या. नेहमीप्रमाणे दुपारी चार वाजता गेलो. पंधरा मिनिटे झाली, वीस झाली, तरी त्यांचा गुस्सा कायम होता. चहाचेही विचारीत ना ! शेवटी, त्यांनी आधी बोलायचे हा आमच्यातला करार मी मोडला. विचारले, 'आज एवढं रागवायला काय झालं ? झाला असेल उशीर. काही कारण असेल.'

माझ्या या प्रश्नाने आईंचा गप्पपणा संपला. त्यांच्या रागाचा स्फोट झाला. त्या सांगू लागल्या–

'उशीराचा नाही मी इतका राग करीत; तसा रोजच ती उशीर करते; पण मी तिला सांगून ठेवलंय, की बाई, उशीर होणार असं वाटलं की कळवीत जा ! माणूस अडकून बसलेलं असतं. त्याला मोकळं करावं. तर तसा निरोपही नाही अजून !'

'निरोप पाठवायला मिळालं नसेल कुणी.' समाजकार्यकर्त्याच्या भूमिकेतून मी कामवाल्या बाईचा कैवार घेतला.

'निरोप पाठवायला माणूस न मिळायला काय झालं तिला ? कळती–सवरती दोन मुलं आहेत. तिला गरज असली म्हणजे दहा वेळा पाठवते!'–आईंनी आपला अनुभव सांगितला.

'याचा अर्थ, आत्ता तिला गरज नाही.' मी स्पष्टीकरण दिले; पण ते सरळ स्वभावाच्या आईंना कसे पटणार ? त्या म्हणाल्या, 'गरज आत्ता आपली, मग दुसऱ्याची, अशी का असते ? गरज ही सर्वांची, प्रत्येकाची असते. ही वेळेची गरज असते, ती जाणायला नको का ?'

'असा गरजेचा तात्त्विक विचार कोण करतो ? आणि घरकाम करणाऱ्यानी असा तात्त्विक विचार का करावा ? तुम्ही साऱ्या मालकिणी असा त्यांच्या गरजेचा तात्त्विक विचार कुठे करता ?' मी आता जरा गंभीरपणाने वादाची सुरुवात केली.

'का बरं ?' आईंनी आपली कैफियत द्यायला सुरुवात केली. 'त्यांच्या किती तरी अडचणीच्या वेळी आम्हीच पुढे होतो. आमच्या बाईच्या मुलाला एका मोठ्या शाळेत प्रवेश हवा होता. तो मी मिळवून दिला! तिच्या नवऱ्याला मालकानं कामावरून काढून टाकलं होतं, तर मी मालकाची समजूत घातली. स्वतः हमी दिली. त्याला पुन्हा कामावर घ्यायला लावला. कोणी आजारी असलं तर साधी औषधं तर मी देतेच; पण वेळप्रसंगी गोळ्या–इजेक्शनांचा खर्चदेखील मी केला आहे! शिवाय मुलांना पाटी–पुस्तक, हिला स्वतःला सणाचं लुगडं, कधी हात उसने पन्नास–शंभर रुपये–हे तर चालू असतंच !'

'हे सारं आपण करतो याचं तुम्हाला विशेष काय वाटतं ?' मी आधुनिक दृष्टिकोण मांडू लागलो. 'या मोलकरणीच्या कामाचा कायदा अन् त्याचे नियम झाले असते तर हे सारं तुम्हाला द्यावंच लागलं असतं. फक्त त्या खात्यांची नावं वेगळी झाली असती. आज कारखान्यातल्या साध्या, अकुशल कामगाराला जे मिळतं ते ते सारं त्यांना मिळालं असतं. प्रॉव्हिडंट फंड, पगारवाढ, कामाच्या वेळचा गणवेश, तो धुण्यासाठी भत्ता, किरकोळ रजा, हक्काची रजा, आजारपणाची रजा, आजारी पडल्यावर सरकारी खर्चानं वैद्यकीय मदत...काम करताना दुखापत झाली की भरपाई आणि सरकारी कामात असेल तर शेवटी पेन्शन... आता हे सारं तुम्ही करता त्याच्यापेक्षाही जास्त होईल की नाही ?'

'पण आम्ही प्रेमानं करतो, त्याचं काय ?' –आई.

'प्रेमाचा यात संबंधच नसावा, असं त्यांना वाटतं. जे काय मिळायचं, ते हक्कानं मिळावं असं माणसाला वाटतं. कितीही प्रेमानं केलं तरी करवून घेणाऱ्याच्या पदरी मिंधेपणाच येतो. शिवाय तुमच्या प्रेमाची शाश्वती काय ? जरा राग आला की तुमचं प्रेम बंद होणार! अशा वेळी त्यांनी काय करावं ? तुमचं एक सोडा. तुमच्या शेजारीणबाई त्यांच्या मोलकरणीशी कसं वागतात ?'

'हो बाई. कालच ती मोलकरीण तक्रार करीत होती. म्हणाली, 'बाई फारच किटकिट करतात. पाहीन पाहीन आणि देईन सोडून काम !'

¤

मोलकरणींना त्यांच्या कामात सुरक्षितता नसते हा माझा मुद्दा आईंना पटला असावा. म्हणून माझ्या शेवटच्या मुद्द्याला दुजोरा देऊन त्या थांबल्या. मला पण वाटले, वाद नव्या रुळावर न्यायला ही वेळ चांगली आहे म्हणून मी विचारले,

'पण ती हे काम असं कसं फटकन सोडू शकेल ? तिला गरज नाही का ?'

'आता तुम्हीच द्या याचं उत्तर. त्यांना फार फार गरज असते, आम्ही देतो ते गरजेच्या मानानं काहीच नाही, बऱ्याच मालकिणी हेही देत नाहीत, असं तुम्हीच म्हणत होता ना ? मग तुम्हीच सांगा. कशा सोडतात कामं फटाफट ?'–आईंनी वस्तादीने चेंडू माझ्याकडेच फटकावला.

बाजू माझ्यावर आली खरी; पण आपल्याला पडलेली शंका हुशार विद्यार्थ्याला विचारावी ही प्राध्यापकी मखली वापरून मी विचारले; 'तुम्हाला या साऱ्याचा जास्त अनुभव आहे. तुम्हीच सांगा.'

आई सरळ त्या चटकन सांगू लागल्या.

'अहो, या मोलकरणींचा काही अंदाजच येत नाही. आपण चांगलं वागावं तर त्या शिरजोर बनतात. आमच्या बाईंचंच बघा. मी सोसते, समजून घेते, तर माझ्याशी तालेवारी करते; पण संध्याकाळी ती दुसऱ्या एका घरी जाते. त्या घरच्या बाई हिला नेहमी धारेवर धरतात. तर त्यांच्याकडे मात्र ही संध्याकाळी सहाच्या ठोक्याला हजर! त्यांच्या डोक्याचं गणित काही तिरपागडच असतं.'

'पण कामात हयगय करणं वेगळं आणि काम एकदम सोडून देणं वेगळं. निष्कारण कोण काम सोडील ? आणि दुसरं मिळाल्याशिवाय ?' मी विचारलं.

'खरच. अगदी निष्कारण देखील त्या काम सोडून देतील.' आई म्हणाल्या, 'इतराचा कशाला ? माझाच अनुभव घ्या. गेल्या वर्षी आमची कामवाली बाई कोकणात गावी गेली होती. चांगली एक महिनाभर तिनं बदली बाई दिली होती. तर ती चार दिवस कामाला आली. मी तिला सगळं काम शिकवलं; पण पाचव्या दिवशी आपली बाई गायब! एक दिवस वाट पाहिली. दुसऱ्या दिवशी वाट पाहिली. तिसऱ्या दिवशी मीच उठून तिच्याकडे गेले. म्हटलं, आजारी पडून आहे की काय ? पाह्यलं, तर मुलाला पोटाशी घेऊन आरामात आडवी झाली होती. सकाळी नऊ वाजता विचारलं, 'अग, कामाला का आली नाहीस ?' तर म्हणते कशी—

'काम करूस वाटलच नाही.'

'म्हणजे काय, कामाची बोली झाल्येय ना आपली ? मग कामावर यायला नको ?' या माझ्या नैतिक आवाहनाचा तिच्यावर काहीच परिणाम झाला नव्हता'—आई सांगत होत्या ती शांत होती. म्हणाली, काम करूसं जिवाला वाटलंच नाही.'

'तसं मी म्हणाले, 'काम नाही, तर पैसा नाही. मग खाशील काय ?'

ती म्हणाली—शांतपणाने म्हणाली, 'नाही तर नाही. दोन दिवस उपाशी राहू; पण जिवाला वाटलं नाही करू, तर काम नाही करणार !'

'अशी आडमुटी असतात ही माणसं.' आईंनी समारोप केला.

'ही माणसं म्हणजे कोणती ?'—मी.

'म्हणजे अशिक्षित माणसं हो यांना उद्या परवाचा काही विचार नसतो. सुशिक्षितांचं असं नसतं. वीस वीस वर्षांचे त्यांचे वेतं आज आत्ता ठरलेले असतात.' आईंनी अनुभव सांगितला.

¤

आईंचे नि माझे बोलणे केव्हा संपले, त्यांच्या मोलकरणीनें त्या दिवशी किती उशीर केला हे काही मला आठवत नाही; पण त्यांच्या एका वाक्याचा मात्र मी बराच वेळ विचार करीत राहिलो होतो. नंतरही ते वाक्य मला मधून मधून सतावत राहिले आहे.

'या अशिक्षितांना उद्या-परवाचा काही विचार नसतो' हे ते वाक्य. असा उद्या—परवाचा विचार न करून कसे चालेल ? कसे परवडेल ? रोजच्या रोज जगताना सुरक्षित कसे वाटू शकेल ?

माझे संस्कार मध्यमवर्गीय ही बेफिकिरी या संस्कारात बसत नव्हती. आजोबांनी वाडा बांधलेला. त्यातच मुलगा राहत असलेला चार-सहा भाडेकरू. थोडे भाडे, थोडी वकिली. सकाळी 'केसरी'. संध्याकाळी फर्ग्युसन हिल. उत्तम आरोग्य. निर्व्यसनी क्रम. मुख्य म्हणजे अविच्छिन्न उत्पन्नाची शाश्वती !

नातूही तसाच. जुन्या भाड्याने थोडा वैतागलेला; पण वाड्याच्या चौकात ऑटोवर्कशॉप टाकलेला. फावल्या वेळात ड्रायव्हिंग शिकविणे, शिस्तीत काळी अर्धी चड्डी घालून. सकाळी जूडो. सायंकाळी झेरोक्स मशीनवर स्वतः बसणे. अविच्छिन्न उत्पन्नाची शाश्वती कायम!

शाश्वती हा माझ्या मध्यमवर्गीय संस्कृतीच्या परवलीचा शब्द ! त्यामुळे या बेफिकिरीचा विचार मला अस्वस्थ करीत राहिला. विशेषत: आईंनी सांगितलेले त्या बदली कामवालीचे शब्द : 'दोन दिवस उपाशी राहू; पण जिवाला वाटले, नाही करू, तर काम नाही करणार !'

मनात आले, मध्यमवर्गीय माणूस दोन नाही चार दिवस उपास काढील, वर्ष वर्ष एक वेळ जेवून काढील, महिना महिना अर्धपोटी राहील, पण अशी लहर, असा अनिश्चितपणा त्याला सोसणार नाही? ते उपास, ते एक वेळ जेवणे याचे पूर्वनियोजन असल्याशिवाय त्याला बरे वाटणार नाही. कारण पूर्वनियोजनात शाश्वती आहे आणि शाश्वतीत सुरक्षिततेचे समाधान आहे.

पण मग, हे सुरक्षिततेचे समाधान इतरांनाही का हवेसे वाटू नये ? ते काय मध्यमवर्गीयासारखे जगत नाहीत ? जगण्याची शाश्वती कोणाही जगणाराला नकोशी कशी असेल ? जगण्याबद्दल ते काय बेफिकीर असतात ?

¤

जगण्याविषयीची बेफिकिरी. मला काही वर्षांपूर्वीचा एक प्रसंग आठवला. पुणे-मुंबई असा आगगाडीने प्रवास करीत होतो. देहूरोडला काकडी विकणारा एक सिंधी पोरगा डब्यात आला. म्हणजे प्लॅटफॉर्मवरून आला नाही. कारण तसा तो येण्याआधी गाडी चालू झाली होती.

शेजारच्या डब्याच्या हॅंडलला धरून तो लोंबकळला. हात लांबवून त्याने आमच्या डब्याचे हॅंडल पकडले. डब्याचे दार बंद होते. म्हणून हाका मारल्या. मी दाराशी होतो. दार उघडले तशी त्याने दुसऱ्या डब्याचा हात सोडला, एक सफाईदार झोका घेतला आणि वाऱ्याच्या झोताबरोबर तो आमच्या डब्यात घुसला. घुसण्याच्या वेगाने तो बराचसा डोलला आणि मग दोन पायांवर स्थिर झाला.

मळका लेंगा-शर्ट. शर्टाची बटणे उघडी. डोक्यावर झुलपे. पाय अनवाणी. खांद्याला मोठी चोपदरी. चौपदरीत काकड्या, तिखटमिठाचा डबा आणि सुरी! एक दम घेऊन त्याने घोगऱ्या आवाजात धंदा सुरू केला. सफाईने काकडी अर्धी चिरायची, तिखटमिठाचा डबा वरून नुसता हलवायचा, काकडी गिऱ्हाइकाच्या हातात कोंबायची.

आमच्या डब्यातली गिऱ्हाइके संपल्यावर दुसऱ्या डब्यात जाण्यापूर्वी तो काही क्षण टेकला. नजर दूरवर. कुठल्या तरी सिनेमातले गाणे गळ्यात गुणगुणते.

मला कुतूहल आवरले नाही. मी विचारले, 'असं बाहेरून लोंबकळत या डब्यातून त्या डब्यात जाताना भीती नाही वाटत ?'

'वाटते ना. म्हणजे सुरुवातीला खूपच भीती वाटायची. आता सवय झाली म्हणून कमी वाटते, पण भीती ही वाटतेच !'

(येथे हे स्पष्ट केले पाहिजे की प्रस्तुत संभाषण हिंदी—मराठी—सिंधी अशा एका मिश्र भाषेत झाले. ती मिश्र भाषा जशीच्या

तशी येथे देणे हे वाचकाच्या सहनशक्तीवर अन्याय करण्यासारखे होईल, यास्तव साध्या सरळ मराठीत तर्जुमा करून ते येथे दिले आहे).

'भीती जर वाटते, तर तू हेच काम का करतोस ?'–मी.

'दुसरं कुठल काम करणार, साहेब ? काकडीऐवजी गोळचा विकायच्या इतकंच. काहीही विकल तरी रेलवे काही चुकत नाही !'–तो.

चौदा-पंधरा वर्षांचा मुलगा. तत्त्व सांगत होता ! मी कळवळलो.

'कितव्या वर्षापासून धंदा सुरू केलास ?' मी पुन्हा प्रश्न विचारायला सुरुवात केली या प्रश्नात केवळ कुतूहल नव्हते. एक अपेक्षा होती. एखाद्या तरी प्रश्नाचे उत्तर मध्यमवर्गीय संस्काराचे येते का, हे मी बघत होतो.

'लहानपणापासूनच; पण तेव्हा असं एका डब्यातून दुसऱ्यात बाहेरून जाता येत नसे. पाय अपुरे पडायचे.'

'मग ?'

'थोरला भाऊ मला या डब्यातून त्या डब्यात न्यायचा. कधीकधी देहूरोडला चढायचं अन् लोणावळ्याला उतरायचं.'

'थोरला भाऊ आता काय करतो ?'

'दोन वर्षांपूर्वी तो गाडीखाली आला. दोन तुकडे झाले, साहेब !'

–सांगताना तो शांत दिसत होता. घटना सहजपणे सांगत होता. मला माझ्या संस्कारानुसार ते अमानुष वगैरे वाटले.

'आईवडील कुठं असतात ?'

'वडील नाहीत. आई उल्हासनगरला असते.'

'तू तिच्याजवळ का राहत नाहीस ?'

'तिनं दुसरं घर केलं. आम्हाला म्हणाली 'तुमचं तुम्ही बघा. तुम्ही आता मोठे झाला.' मग भाऊ न मी पिंपरीला आलो. काकाकडे.'

'हे किती वर्षांपूर्वी ?'

'नक्की आठवत नाही. पाच-सहा वर्षं झाली असतील !'

–म्हणजे, नऊदहा वर्षांचा हा मुलगा घराबाहेर पडला होता आणि मध्यमवर्गीय मुलांना त्यांचे पालक दहावीपासून एम. ए. पर्यंत परीक्षेला पोचवायला जात असतात !

'मोठा भाऊ गेला. मग आता घरी फक्त काकाच असतात ?'

'काका पण गेल्या साली आटपले !'

'मग आता तू एकटा. एकट्यानं भीती वाटत असेल ?'

'एकटा कशानं ? आमची गँग आहे ना आठ जणांची. काकाची खोली आहे. तिथं आम्ही सगळे राहतो !'

माझ्या कोणत्याच प्रश्नाने तो नर्व्हस होत नव्हता. म्हणून आतल्या आत मी नर्व्हस होत होतो. ज्याला कशाचीच भीती वाटत नाही असला कसला हा पोरगा ? याला कशाची तरी भीती वाटलीच पाहिजे. म्हणून विचारले तेव्हा तो दुसऱ्या डब्यात जाण्यासाठी दारात उभा होता.

'समजा, दुसऱ्या डब्यात जाताना आत्ताच तू पडलास तर काय होईल ?'

'गाडी अंगावरून जाईल. तुकडे होतील. पोलिस उचलून नेतील.' थंडपणाने, सहजपणाने तो सांगत होता. उद्धट मिरवेपणा त्याच्या सांगण्यात नव्हता.

'म्हणजे मरशील तू !' माझ्या मनाने मी सर्वांत मोठा घाव घातला.

'केव्हा तरी मरायचंच ना !' पलीकडच्या गजाला धरण्यासाठी तो लोंबकळला आणि त्याने शांत हसत उत्तर दिले.

मला हवे ते उत्तर मिळाले नव्हते; पण उत्तर मिळाले होते.

अशाश्वतीचा स्वीकार त्या मुलाने केला होता आणि अशाश्वतीबद्दल त्याची तक्रार नव्हती. लहानपणापासून वास्तव म्हणून अशाश्वतीशीच त्याचा परिचय झाला होता. विशेष म्हणजे आईने, वडिलानी हा परिचय होताना अडथळा आणला नव्हता. आपल्या मायेच्या दुबळ्या टोपलीखाली त्याला झाकून ठेवले नव्हते. कळायला लागल्यापासून त्या पोराने स्वतंत्रपणे अनुभव घेतला होता. तो निर्भय झाला होता !

हे कसे उलटे वाटते. मध्यमवर्ग हा भविष्य काळाची तरतूद करू पाहतो. बहुतांशी तशी तरतूद करतोही. तरीही तो पराकाष्ठेचा भ्यालेला असतो. आपल्या मुलाबाळानाही तो सांभाळतो. सांभाळतो आणि भित्रे बनवून ठेवतो... याउलट, गरीब आईवडिलांचे ठेव, शेअर्स, बंगला, कार असे मुलाबाळाना द्यायला त्यांच्याजवळ काहीच नसते. तरी त्यांची मुले निडर, स्वतंत्र, साहसी असतात !

हे उलटे वाटते. पण खरे तर हेच सुलटे आहे. सुरक्षिततेच्या आत्यंतिक हव्यासानेच परिस्थितीशी गुलामी आणि दुबळेपणा यांचा जन्म होतो. या दुबळेपणानेच मध्यमवर्गीयांचा एक हळवा कोश तयार झालेला असतो. तो कितीही शिको, कुठेही जावो–राहो, कितीही क्रांतिकारकत्व अंगी बाणवो–त्याला वारसाहक्काने मिळवलेला हा हळवेपणाचा कोष कायमच राहतो. सामाजिक प्रगतीच्या मार्गांत इतिहासकाळापासून या हळव्या कोशाने अडथळ्याचे काम बजावले आहे. या अडथळ्यासंबंधी एकदा सविस्तर लिहायला हवे. ❑


**दलित-दलितेतर या भेदांना ओलांडून जाणारे गोष्टीरूप आंबेडकर चरित्र**

सर्व मराठी मुलांच्या हाती हा 'कथा-संग्रह' देणे योग्य ठरेल! दलित–दलितेतर या भेदांना ओलांडून जाणारा हा स्फूर्तिदायक कथा-संग्रह संस्कारक्षम मुलांना अत्यंत उद्‌बोधक वाटेल. इतिहासाचे सर्जनशील साहित्यात कथारूपाने जे रूपांतर होते ते सिद्धहस्त लेखक कसे सोन्यासारखे करून दाखवितो त्याचा पुरावा बागुलांच्या या गोष्टीरूप चरित्रातून मिळतो.

**–रा. ग. जाधव**

(केसरी, रविवार, ६-१२-८१)

# आं बे ड क र भा र त

लेखक बाबुराव बागुल

राजहंस प्रकाशन, पुणे. मूल्य : वीस रुपये

अवतीभवती । शरद कृष्णन

# ताठ मानेने पदत्याग करणारा संस्था-संचालक – पी. एस्. अप्पू

राजकीय नेत्याचे ज्येष्ठ शासकीय कर्मचाऱ्यावर सतत दडपण असते. मंत्री महोदय, खासदार, आमदार, आदी मंडळी आपली विविध स्वरूपाची कामे शासकीय अधिकाऱ्याकडे घेऊन जातात. प्रत्येक वेळी ही कामे मोठी सरळ असतात असे नाही. आणि तरीही नियमाच्या चौकटीमध्ये राहून ही कामे करण्याकडेच अधिकाऱ्यांचा कल असतो. कारण अखेरीस त्याचे भवितव्य सत्तास्थानी असलेल्या या लोकप्रतिनिधीच्या हाती असते. लेखणीच्या एका फटकाऱ्याने हे सत्ताधीश अधिकाऱ्याच्या बदल्या करू शकतात. क्वचित प्रसंगी, त्याना निवृत्त होण्याचा सल्ला देतात. असे असले तरी शासकीय दडपणाला भीक न घालता आपले काम काटेकोरपणे करणारे अधिकारीही असतात. हे असे अधिकारी पोलादी नोकरशाहीचे मोठे आधारस्तंभच मानले पाहिजेत. सख्येने हे कमी असले तरी अतिशय कर्तव्यतत्पर व खाजगी जीवनात अत्यंत चोख असल्याने त्यांच्या मताचा आणि निर्णयाचा मोठाच प्रभाव पडताना दिसतो. बिहार सरकारच्या पोलीस सेवेमधील एक ज्येष्ठ अधिकारी श्री. एस्. एन्. सिंग यांची सेवा ज्येष्ठता व अनुभव पहाता त्याना राज्याचे पोलीस प्रमुख म्हणून बढती मिळणे जरूर होते. दुसऱ्या कोणा अधिकाऱ्यावर मेहरबानी करण्यासाठी त्याना डावलण्यात आले. आपण डावलले गेलो आहोत हे त्याना जाणवू नये म्हणून त्याना होमगार्डस्चे कमांडर–जनरल पद बहाल करण्यात येऊन वर दरमहा २५० रुपयाचे खास जादा वेतन देण्यात आले. ही जागा स्वीकारल्याने त्याचे कोणतेही आर्थिक नुकसान होणार नव्हते. शासनाला अप्रिय असणारे परंतु नियमाप्रमाणे आवश्यक असलेले असे काही निर्णय श्री. सिंग यानी घतले होत. ताठ मानेने वागणारा हा अधिकारी सध्याच्या भ्रष्टाचार युगामध्ये राज्याच्या पोलीस प्रमुखपदी असणे परवडण्यासारख नव्हते. म्हणून त्याना डावलण्यात आले. थोडे फार नरम राहून श्री. सिंग याना सेवेत राहता आले असते; परतु त्यानी तडक राजीनामा दिल्याने मोठेच वादळ उठले असून या साऱ्या प्रकरणाची सारवासारव करता करता बिहार गृहमंत्र्याची तारांबळ उडाली आहे. या प्रकरणापूर्वी श्री. ए. के. चटर्जी नावाच्या ज्येष्ठ सेवकाचे प्रकरण असेच गाजले होते. मंत्र्यासमोर हाजी-हाजी करणे नको म्हणून त्यानी चालत आलेली बढती नाकारली. येथे ज्याची विशेषत्वाने दखल घ्यायची आहे, ते श्री. पी. एस. अप्पू हे अत्यंत नावाजलेले अधिकारी, मसूरी येथील लाल बहाद्दूर शास्त्री नॅशनल अॅकॅडमी ऑफ अॅडमिनिस्ट्रेशन या संस्थेचे संचालक म्हणून काम करत होते. नोकरशाहीची पोलादी चौकट ज्याच्या हाती असते, ते आय्. ए. एस. अधिकारी आपल्या नेमणुकीपूर्वी मसुरीच्या या संस्थेत येऊन प्रशिक्षण घेतात. अशाच अधिकाऱ्यापैकी एक व्ही. के. सिंग. त्यानी आपल्याबरोबर प्रशिक्षण घेणाऱ्या काही महिलांबरोबर गैरवर्तन केले. त्या प्रकरणाची पूर्ण चौकशी करून संस्था संचालक श्री. अप्पू यांनी श्री. सिंग याना ताबडतोब काढून टाकण्यात यावे अशी शिफारस केंद्र सरकारकडे केली. परंतु संबंधित सिंग याच्या दडपणामुळे, गृहमंत्रालय आपला वस्तुस्थितीवर आधारलेला रास्त निर्णयही मानण्याच्या मनस्थितीत नाही, हे लक्षात येताच श्री. अप्पू यानी खुषीची निवृत्ती स्वीकारली व ते दीर्घकालीन रजेवर रवाना झाले. या प्रश्नावरून लोकसभेमध्ये विरोधी पक्षानी एकच मोहोळ उठवून दिले. गृहमंत्री झैलसिंग याची चांगलीच त्रधातिरपिट उडाली. पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यानी स्वत: या प्रकरणी लक्ष घातले आणि अखेरीस श्री. अप्पू याची शिफारस मान्य करण्यात येऊन सिंग याची हकालपट्टी करण्यात आली. श्री. अप्पूना परत बोलावण्यात यावे अशा स्वरूपाची मागणीही विरोधी पक्षानी लावून धरली. परंतु स्वत:च्या प्रतिष्ठेचा प्रश्न समजून शासनाने या प्रकरणी फारशी हालचाल केली नाही. परिणामी चांगली तीन वर्षांची सेवा बाकी असूनही श्री. अप्पू याना सेवेतून बाहेर पडावे लागले. पण त्याचा पदत्याग हा अगदीच वाया गेला नाही. कारण ज्याच्या संदर्भात श्री. अप्पू यानी शिफारस केली होती त्या सिंग यानाही अखेरीस जावेच लागले. शासनाने एकदा घेतलेला निर्णय बदलून श्री. सिंग याची हकालपट्टी व्हावी एवढे नैतिक सामर्थ्य श्री. अप्पू याच्या निवृत्तीमध्ये खचितच होते. श्री. अप्पू याचा गौरव करणारा मजकूर तसा सर्वत्र प्रसिद्ध झाला आहे. तथापि 'सन्डे' या साप्ताहिकामध्ये प्रसिद्ध झालेली त्याची मुलाखत विशेष लक्षवेधी आहे. सिंग प्रकरणाच्या पुनरुक्तीचा भाग टाळून त्या मुलाखतीमधील महत्त्वाची प्रश्नोत्तरे येथे नोंदवत आहे :

**प्रश्न :** आपण पुन्हा सेवेमध्ये दाखल व्हावे अशी विनती करण्यात आली तर आपण पुन्हा परत याल का ?

**उत्तर :** खरे सांगायचे तर कायमचे जावे लागेल असे समजूनच मी निरवानिरव केला आहे. खेरीज माझ्याकडे तशी विचारणा केली गेली नसल्याने हा प्रश्न आता तरी जर-तरच्या स्वरूपाचा आहे. त्यामुळे या हवेतील प्रश्नावर आत्ताच काय उत्तर देणार ? श्री. अप्पू याचे म्हणणे बरोबर वाटते. कारण त्याना विचारणा झाल्याखेरीज ते काय निर्णय घेणार ? आणि तशी विचारणा करण्याचा सरकारचा विचार नाही हे आता पुरेसे स्पष्ट झाले आहे.

**प्रश्न :** तुमच्या या निर्णयाचे देशभर कौतुक झाले आहे. असा धाडसी निर्णय घेण्यामागे कोणती भूमिका आहे ?

**उत्तर :** प्रथमच हे स्पष्ट केले पाहिजे. माझा निर्णय हा अगदी व्यक्तिगत स्वरूपाचा आहे. ज्येष्ठ आय्. ए. एस. अधिकाऱ्यावर जे दडपण येते त्याचे प्रतिक म्हणून या निर्णयाकडे पाहू नये. शासनाची भूमिका मला पटली नाही, मी बाजूला झालो इतकी या संदर्भातील माझी भूमिका स्पष्ट आहे.

**प्रश्न :** शासकीय निर्णय घेण्याबाबत जी प्रक्रिया असते त्या संदर्भात आपले काय मत आहे ?

**उत्तर :** अंतिम निर्णय संबंधित मंत्री घेतात. अधिकाऱ्यांनी संपूर्ण वस्तुस्थिती त्यांच्यासमोर ठेवायची असते. मंत्रीमहोदयाच्या निर्णयाबाबत काही प्रतिक्रियाही ज्येष्ठ अधिकाऱ्यांना नोंदवता येतात. मंत्री आपल्या मर्यादांचे अथवा कायदेकानूंचे उल्लंघन करत आहेत, असे जर अधिकाऱ्यांना वाटले तर रजेवर जाऊन निषेध नोंदवणे, बदली मागणे आणि प्रकरण अगदीच गंभीर बनले तर चक्क राजीनामा देणे, एवढ्या गोष्टी सनदी अधिकाऱ्यांच्या हातात असतात.

**प्रश्न :** आपण ज्या व्ही. के. सिंगप्रकरणी राजीनामा दिलात, तशाच स्वरूपाचे प्रकरण समजा, सुमारे १५ वर्षांपूर्वी आपल्यासमोर आले असते आणि शासनाने आपल्याला मंजूर असलेला निर्णय घेतला नसता तर आपण काय केले असते ?

**उत्तर :** या प्रश्नाचे उत्तर देणे मोठे अवघड आहे. असे म्हणून श्री. अप्पू यानी एक उसासा सोडला. थोडा वेळ विचार करण्यासाठी थांबून ते म्हणाले, होय, १५ वर्षांपूर्वी जरी अशी परिस्थिती निर्माण झाली असती तरी मी राजीनामाच दिला असता.

**प्रश्न :** आपल्या या निर्णयामागे कोणते सामर्थ्य आहे ?

**उत्तर :** मी म्हणतो ते बरोबरच आहे, अशी खात्री असल्याने जे एक नैतिक बळ प्राप्त होते तेच माझे सामर्थ्य होते. खेरीज माझ्यावर कोणत्याही कौटुंबिक जबाबदाऱ्या आता नसल्याने अन्य कोणते दडपण नव्हतेच. मला एक २८ वर्षांचा मुलगा आहे आणि त्याचे उत्तम चालले आहे. पत्नी समजदार आहे आणि कोणत्याही परिस्थितीला तोंड देण्यास ती तयार आहे.

**प्रश्न :** व्ही. के. सिंग यांच्याबाबत शासनाने आपल्याला हवा असा निर्णय घेतला आहे, असे ज्या वेळी घोषित करण्यात आले त्या वेळी आपल्याला काय वाटले ?

**उत्तर :** लोकसभेमध्ये गृहमंत्र्यानी हा निर्णय घोषित केला त्या वेळी शासनाने केली ती योग्य गोष्ट केली असेच मला वाटले.

**प्रश्न :** आपल्या शिफारसीची अंमलबजावणी करण्यात आली नाही तर संस्था चालवणे अवघड आहे असे आपल्याला वाटले का ?

**उत्तर :** मला नेमके तसेच वाटले. प्रथम श्रेणीचे प्रशासकीय अधिकारी ज्या संस्थेतून बाहेर पडतात त्या संस्थेमधील वातावरण निकोपच असले पाहिजे, अशीच माझी भूमिका होती. व्ही. के. सिंग प्रकरणाची भरपूर चर्चा झाली होती. याबाबतची माझी भूमिका काय आहे हेही बहुतेक सर्वांना माहित होते. आणि असे असूनही निर्णय होत नसेल तर मी बळेच खुर्चीला चिकटून बसलो आहे असे झाले असते. व्ही. के. सिंग प्रकरणी शासनाने लवकर निर्णय न घेतल्याने संस्थेमधील शिस्तीला तडा गेला होता. काहीही केले, कसेही वागले, तरी निसटून जाता येते अशी भावना निर्माण होऊ लागली होती. अशा परिस्थितीत मी राजीनामा देणे हाच सगळ्यात सोयास्कर मार्ग असल्याने मी त्याचा अवलंब केला.

**प्रश्न :** आपल्याबरोबरच आपले काही सहकारीही राजीनामा देणार आहेत, किंवा राजीनामा देणार होते हे खरे का ?

**उत्तर :** माझ्या सहकाऱ्यांना मी सांगितले होते की, मी राजीनामा देणार हे निश्चित आहे. तुम्ही काय करायचे ते तुमचे तुम्ही ठरवायचे आहे. माझ्या दोन सहकाऱ्यांनी माझा सल्ला विचारला होता. परंतु या प्रकरणाचे भांडवल करण्याची माझी जराही इच्छा नसल्याने अन्य कुणावर दडपण आणण्याचा प्रश्नच नव्हता.

**प्रश्न :** तुम्ही सार्वजनिक जीवनाच्या संदर्भात काही आदर्श व्यक्तींचे उदाहरण डोळ्यांसमोर ठेवले होते काय ?

**उत्तर :** नाही. मी तसे कोणतेही आदर्श डोळ्यासमोर ठेवलेले नव्हते. तसे कोणाला 'हिरो' मानण्याची माझी वृत्ती नाही. समोरची परिस्थिती पहायची आणि आपल्या सदसद्विवेकबुद्धीला जो निर्णय योग्य वाटेल तोच निर्णय घ्यायचा असे माझे धोरण असते. अर्थात माझ्या प्रारंभीच्या काळामध्ये मला काही व्यक्तिंबद्दल नितांत आदर होता. महात्मा गांधी व पंडित जवाहरलाल नेहरू यांचा नामनिर्देश करता येईल.

**प्रश्न :** वाढत्या भ्रष्टाचारामुळे प्रामाणिक अधिकारी वर्ग अस्वस्थ झाला आहे हे खरे आहे काय ?

**उत्तर :** तशी अस्वस्थता वाटावी अशी परिस्थिती आहे, हे तुम्हीसुद्धा मान्य कराल पण याबाबत मी निराशावादी नाही. अधिकारी जर आपल्या कामात चोख असेल तर त्याच्या चोखपणाचे दडपणही त्याच्या सहकाऱ्यांवर, वरिष्ठांवर आणि मंत्र्यांवरही पडू शकतो. नैतिक सामर्थ्यामुळे ताठ असणाऱ्या अशा अधिकाऱ्याच्या कामात अगदी क्वचित ढवळाढवळ केली जाते.

**प्रश्न :** शासकीय निर्णयावर प्रभाव कुणाचा असतो ? मंत्र्यांचा की, ज्येष्ठ अधिकाऱ्यांचा ?

**उत्तर :** मंत्र्यांचा प्रभाव असतो, हे मी पूर्वीच स्पष्ट केले आहे. पण मंत्र्यांना सर्व काही ठाऊक असते असे नव्हे. त्यांना निर्णय घेण्याची शक्ती अधिकारी ज्या पद्धतीने केसेस त्यांच्यासमोर ठेवतात त्याहूनच प्राप्त होते. सम्यक ज्ञान ही फार मोठी शक्ती असते. चाणाक्ष मंत्री अधिकाऱ्यांजवळ असलेल्या ज्ञानाचा व अनुभवाचा पुरेपूर फायदा घेतात. निर्णय जरी मंत्र्यांना घ्यायचा असला तरी त्याना चुकीचे अथवा अचूक मार्गदर्शन करणे सर्वस्वी संबंधित अधिकाऱ्यांच्या हाती असते. अधिकारी आपल्या मताशी प्रामाणिक असतील तर आपले मत कसे बरोबर आहे, हे मंत्र्याना ते पटवून देऊ शकतात. आणि मंत्र्याना आपले म्हणणे मान्य करणे भाग पाडतात. अर्थात हे सारे अधिकारी व संबंधित मंत्री यांच्या परस्पर संबंधावर अवलंबून असते.

**प्रश्न :** राजकीय हस्तक्षेपाला कंटाळून अनेक ज्येष्ठ अधिकारी निवृत्त होत आहेत. नोकरशाही व शासन यांचे संबंध तणावाचे आहेत असे आपल्याला वाटते का ?

**उत्तर :** नोकरशाहीच्या चौकटीमध्ये फार बदल झाला आहे अथवा सरकारी अधिकाऱ्यांच्या दृष्टीने परिस्थिती चिंताजनक आहे, असे मला वाटत नाही. नोकरशाही आहे तशीच आहे; परंतु नोकरीतून मुक्त होणे आता पूर्वीपेक्षा पुष्कळ सोपे झाले आहे. वीस वर्षांच्या सेवेनंतर निवृत्तिवेतनाचा लाभ घेऊन तुम्हाला बाहेर पडता येते. त्यामुळे अनेक अधिकारी बाहेर पडून खाजगी कंपनीत नोकरी स्वीकारतात. एक गोष्ट मात्र नक्की की, अधिकाऱ्यांना काम करणे पूर्वीपेक्षा जास्त अवघड आहे.

**प्रश्न :** व्ही. के. सिंग प्रकरणी आपल्याला काहीशा अनपेक्षितपणे

प्रसिद्धी मिळाली. आपली निवृत्ती हा सन्मानाचा व गौरवाचा विषय झाला आहे. प्रसिद्धीचा हा झोत आपल्याला कसा वाटतो ?

उत्तर : मी केले ते काही प्रसिद्धीसाठी वगैरे केले नाही. मी राजकारणी नाही आणि राजकारणात मला रसही नाही. मी खुषीने निवृत्ती स्वीकारली आहे. मला आता जाऊ द्या, एवढेच माझे म्हणणे आहे.

## □ महात्मा गांधी सेतूबद्दल थोडेसे

पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी अलीकडेच पाटणा येथे गंगा नदीवर बांधण्यात आलेल्या महात्मा गांधी सेतूचे उद्घाटन केले. बिहार सरकारने प्रमुख दैनिकांतून पानभर जाहिराती येऊन या पुलामुळे मिळणाऱ्या लाभाचे कोडकौतुक केले. खेरीज, आपले शासन जनकल्याणदया-योजना कशा राबवत आहे याचीही उदंड टिमकडी वाजवली. जून १९७० मध्ये ज्या पुलाचा पायाभरणी समारंभ श्रीमती इंदिरा गांधीं यांच्या हस्तेच झाला होता त्या पुलाचे बारा वर्षांनंतर उद्घाटन करण्यात आले असले तरी पुलाचे बांधकाम अजून पूर्ण झालेले नाही. वाहनांना तर सोडाच, पण अजून पायी जाणाऱ्यांना ही हा पूल वापरता येत नाही. मग उद्घाटनाची एवढी घाई कशासाठी ? बिहारमधील राजकीय वातावरण अशांत आहे. मुख्यमंत्री श्री. जगन्नाथ मिश्रा हे सतत टीकेचे लक्ष्य झालेले आहेत. लोकांचे व राजकीय नेत्यांचे लक्ष इतरत्र वेधावे, आपण जनकल्याणाची कामे कशी करत असतो याची प्रतिमा जनमानसात ठसावी यासाठी, तसेच केंद्रीय नेत्यांनाही आपण मोठे कार्यक्षम आहोत हे दिसून यावे म्हणून मिश्रा यांनी जगामधील कोणत्याही नदीवर असलेल्या पुलापेक्षा जास्त लांबी असलेल्या या पुलाचा उद्घाटन सोहळा घडवून आणला. या पुलावरील पक्का रस्ता, उद्घाटन होऊन महिना होत आला तरी झालेला नाही. खेरीज, पुलाच्या कठड्याचे कामही अपूर्णच आहे. आपण ज्या पुलाचे उद्घाटन करणार आहोत तो पूल अपूर्ण अवस्थेमध्ये आहे याची कल्पना पंतप्रधानांना फार उशीरा आली. कार्यक्रम टाळणे शक्य नव्हते म्हणून त्यांनी तो स्वीकारला इतकेच; परंतु उद्घाटनानंतर जवळजवळ सहा महिनेपर्यंत पूल जनतेच्या वापरासाठी जर खुला होणार नसेल तर त्याचे उद्घाटन कशासाठी करायचे, असा प्रश्न त्यांनी बिहारच्या मुख्यमंत्र्यांना विचारला. या प्रकरणी असलेली आपली नाराजी पंतप्रधानांनी वेगळ्या पद्धतीने व्यक्त केली. दिल्लीहून निघण्यापूर्वीच त्यांना या पुलाचे काम पूर्ण झालेले नाही, हे समजले असल्याने त्या काहीशा नाराज मन स्थितीतच विमानतळावर उतरल्या. बरोबर चिरंजीव राजीवही होतेच. स्वागतासाठी मुख्यमंत्री आणि अन्य मंत्रिगण हजर होते; परंतु या सर्वांची उपेक्षा करून त्या तडक जवळच उभ्या केलेल्या जीपमध्ये जाऊन बसल्या. त्यांच्या मागोमाग चिरंजीव राजीव व त्यांची पत्नी सोनिया ही जोडीही जीपमध्ये जाऊन बसली. ही सर्व मंडळी हवाईदलाच्या हेलिकॉप्टरने पुलाकडे रवाना झाली. या साऱ्या प्रकाराने मिश्राजी खजिल झाले. बिहारला प्रगतीकडे नेणाऱ्या या पुलाच्या उद्घाटनाची जाहिरात तशी मोठ्या कल्पकतेने करण्यात आली होती. या जाहिरातीप्रमाणे लक्षावधी टन स्टील व सिमेंट खर्ची घालून व अपार मानवी परिश्रमातून तयार झालेला हा पूल म्हणजे आधुनिक बिहारच्या इतिहासामधील मानबिंदू. या पुलाच्या बांधकामाच्या वेळी एकूण सोळा कामगारांनी आपले जीव गमावले. शेतीप्रधान उत्तर बिहार व उद्योगशील दक्षिण बिहार यांना नजिक आणणाऱ्या या पुलाचे शानदार उद्घाटन करता यावे, म्हणून उभी शेते अवेळी कापून जागा करून घेण्यात आली. ज्या पिकाचे शेतकऱ्याला आणखी महिनाभरात एकरी किमान १२०० रुपये मिळाले असते अशा पिकाबद्दल एकरी फक्त ६४० रुपये देण्यात येऊन शेते मोकळी करण्यात आली व शामियाना उभारण्यात आला. आपले सरकार श्रमजीवी वर्गाचे भले व्हावे यासाठीच प्रयत्नशील आहे, असे जेव्हा पंतप्रधान म्हणाल्या तेव्हा केवळ नाईलाज म्हणून, एकरी ६४० रुपये घेऊन बाजूला निवांत उभे असलेले शेतकरी हताश होऊन हा सारा तमाशा पहात होते.

समारंभ थाटात साजरा व्हावा म्हणून वैशाली मुझफ्फरपूर, सरान, पाटणा येथून मंडळींना उचलून आणण्यात आले होते. विरोधी पक्षनेते कर्पूरी ठाकूर यांच्या मते, केवळ माणसे गोळा करून आणण्यासाठी साठ लाख रुपयांची रक्कम खर्ची पडली. यातील अतिशयोक्तीचा भाग सोडला तरी किमान पंधरा लाख रुपये या सत्कारणी निश्चितपणे खर्च झाले, यात संदेह नाही. सगळ्यात जास्त लांबीच्या या पुलाला, बांधकाम पूर्ण करण्यासही अर्थात् सगळ्यात जास्त काळ लागला– अजूनही काम चालूच आहे. ज्यावेळी पुलाचा मुहूर्त झाला त्यावेळी हा पूल ७८ साली पूर्ण होईल, असे सांगण्यात आले; पण निदान पुलाचे उद्घाटन करावे असे वाटण्याजोगी परिस्थिती येण्यास ८२ साल उजाडले. वर्षे जशी सरली तसेच बजेटही फुगले. मूळ योजनेप्रमाणे जो पूल २३५ कोटी रुपये खर्चून पूर्ण व्हायचा तो पूल पूर्ण होण्यास ४६५ कोटी रुपये खर्ची पडले. उद्घाटन खर्चाचा सोहोळा जवळजवळ ७० लाख रुपये खर्ची घालून साजरा करण्यात आला. पुलाचे उद्घाटन झाले. आकाशवाणी, दूरदर्शन, वृत्तपत्रे या प्रसिद्धीमाध्यमातून वार्ता येऊन गेल्या; पण पुलाच्या पलिकडील लोक अजूनही पूल पूर्ण होण्याची वाट पहात पैलतीरावर बसून आहेत. असे सांगतात की, पंतप्रधानांनी मिश्राजींना या प्रकरणी चांगलेच खडसावले असून निदान एप्रिलअखेर पूल जनतेसाठी खुला होईल असे पहावे, असे सांगितले आहे.

## □ चोरांना पकडणारे बँक कर्मचारी

बँकेवरील दरोडे ही आता इतकी नित्याची बाब झाली आहे की, बँकेवर पडणारे डाकेही आता जवळजवळ नित्याची बाब झाली आहे. दिल्ली-कलकत्त्याची वर्तमानपत्रे वाचणाऱ्यांना ही गोष्ट जितक्या सहजी समजेल तितक्या सहजी ती पुण्या-मुंबईच्या वाचकांना समजणार नाही; पण आकडेवारीच्या भाषेत बोलायचे झाले तर गेल्या सहा महिन्यात बँका व पोस्ट ऑफिस यावर डाके घालून लुटालूट करण्याचे एकूण ११ प्रकार झाले आहेत या सर्व प्रकरणाचा पोलीस तपास चालूच आहे आणि तसा तो चालू रहाणारही आहे;

परंतु गुन्हेगार हाती लागेल याची मात्र शाश्वती नाही. या पार्श्वभूमीवर कलकत्ता येथील स्टेट बँकेच्या सफेद कपड्यामधील कर्मचाऱ्यांनी जे साहस दाखवले त्याची नोंद करणे आवश्यक वाटते. कलकत्त्याच्या न्यू अलिपोर येथे स्टेट बँकेची एक शाखा आहे. बँकेचे कामकाज नेहमीप्रमाणे चालू असताना कमी गर्दीच्या वेळी चार बुरखाधारी मंडळींचे टोळके बँकेत येऊन दाखल झाले. आता बुरखा घालून आलेली मंडळी सरळ व्यवहारासाठी आली नसून लूट करण्यासाठी आली आहेत, ही दिसती गोष्ट होती. सर्वसाधारणपणे ३०–३२ वयोगटामधील या तरुणांनी पिवळे शर्टस् घातले होते. बंगाली, हिंदी व इंग्रजी अशा तिन्ही भाषांचा वापर करून त्यांनी कर्मचाऱ्यांना धमकावले. बँकेत गर्दी नव्हती असे नाही. साधारणपणे ७० ते ८० अन्य लोक गुन्हा घडला त्यावेळी तेथे हजर होते. उपस्थितांमध्ये महिलांची संख्या जास्त होती. गुन्हेगारांनी दमदाटी करून दोन फैरी झाडल्यावर ही तमाम मंडळी त्यांच्या आदेशाप्रमाणे वागण्यास सिद्ध झाली. गुन्हेगारांनी खिडक्या बंद केल्या व टेलिफोन्सच्या वायर्स तोडून ते कामाला लागले. चौघांपैकी दोघेजण रोखीचे व्यवहार करण्याची जी खिडकी होती तेथे गेले! रोखपालाला धमकावून त्याच्याकडून एक लाख तेरा हजारांची रक्कम वसूल केली; पण एवढे मोठे धाडस करून केवळ लाख–दीड लाख रुपये घेऊन बाहेर पडणे त्यांना पसंत नसावे. त्या चौघांपैकी एकजण आत घुसला व कर्मचाऱ्याला धमकावून त्यांनी मुख्य तिजोरीच्या किल्ल्या हस्तगत केल्या. आता नोटांच्या घड्या बरोबरच्या पोत्यामध्ये भरायच्या आणि तत्परतेने बाहेर पडायचे, एवढेच काम बाकी होते. तिजोरी उघडून त्या पठ्ठ्याने झपाट्याने नोटा बरोबर आणलेल्या पोत्यात भरण्यास सुरुवात केली. दरम्यान त्याचे दोन सहकारी दाराजवळ गेले होते. दारात उभ्या असलेल्या त्यांच्या मित्राने नंबर चार कुठे आहे, अशी विचारणा केली. हे तिघे एका बाजूला पडले असून तिजोरीमधील नोटा भरणारा एकाकी आहे, हे लक्षात येताच सुरेंद्र नावाच्या कर्मचाऱ्याने आपली सारी भीती बाजूला टाकून त्या पैशात बुडालेल्या डाकूवर झेप घेतली. आपल्यापैकी कोणी तरी साहस दाखवतो आहे, हे पाहून अन्य दोन कर्मचाऱ्यांना स्फूर्ती आली. त्यांनी मदतीचा हात दिला. आता तीन विरुद्ध हतबल झालेला एक, अशी अवस्था झाली. दारात उभे असलेले त्याचे साथीदार चांगलेच दबकले. हा असा काही प्रतिकार होईल अशी त्यांची अपेक्षा नव्हती. आपण येथे थांबलो तर आताच कदाचित सारेच पकडले जाऊ, अशीही भीती त्यांना वाटली असावी. त्यांनी दारातूनच, नंबर चार–कमॉन, असा एक–दोनदा पुकारा केला आणि मग पळ काढला. आपण ज्याला पकडला आहे त्याला आता कोणाचीही साथ नाही, हे लक्षात आल्यावर बँकेच्या कर्मचाऱ्यांनी जास्त आक्रमक भूमिका घेऊन या नंबर चारला पकडून ठेवले. नंतर रीतसर पोलिसांना बोलावण्यात आले. पैशाच्या लोभाने थांबलेल्या त्या डाकूने पोत्यात जी रक्कम भरली होती तिची मोजदाद केल्यावर ७ लाख ३८ हजार रुपयांची रक्कम कर्मचाऱ्यांनी वाचवली असल्याचे लक्षात आले. पोलिसांनाही जे साहस कदाचित झाले नसते ते साहस भित्रट समजल्या जाणाऱ्या पांढऱ्या कपड्यामधील कर्मचाऱ्यांनी दाखवले. थोडासा 'सुगावा' हाती असला की, भांबावून जाणारे पोलीस एकदम शेर बनतात. इथे तर काय मुद्देमालासह डाकू पकडून पोलिसांच्या स्वाधीन केला आहे. आता त्याची चामडी सोलून पोलीस त्याच्या साथीदारांपर्यंत पोहचतील आणि निदान या बाराव्या चोरीचा तरी केवळ पोलीस तपास चालू राहणार नाही! □


# मी आलेय् 'मिंटी', अेक खारोटी

स्वभाव माझा जागरूक,
वृत्ती माझी संचयी,
चालणे माझे चपळ,
वागणूक माझी निगर्वी,
सेतू बंधनात आपला वाटा उचलून
रामाचा आशीर्वाद मिळवलेली
आजहि थोरामोठ्यांचे
आशीर्वाद असेच आहेत पाठीशी,
माझं घर होतं दूर रानांत
झाडांच्या ढोलींत—
आता मात्र माझं घर खेड्यात, शहरात
महाबँकेच्या शेकडो शाखांत.
मी आलेय 'मिंटी' मी म्हणजे महाबँक



**बँक ऑफ महाराष्ट्र**
(भारत सरकारचा उपक्रम)
मुख्य कचेरी: "लोकमंगल" शिवाजीनगर
पुणे-४११ ००५

R.A. ADVTG.

## श्याम कथा : अठ्ठाविसावी

# दया, क्षमा, शांती तेथे देवाची नालस्ती किंवा हमारी नेता दया माता

### फिरोझ रानडे

दया, क्षमा व शांती ह्या गोकुळातल्या तीन गोपी होत्या. त्या शेजारी शेजारी रहात. त्यांची आपसात खूप मैत्री होती. त्याचे स्वभाव वेगवेगळे होते, तरी त्यांचे वय साधारण सारखेच असल्यामुळे ह्यांच्यात खूप मतैक्य होत असे. त्या अगदी मॉन्टेसरीपासून एका वर्गातच नव्हे, तर एका तुकडीत शिकल्या होत्या. बोर्डाच्या परीक्षेला त्या बरोबरच बसल्या होत्या व प्रथम जो निकाल प्रसिद्ध झाला त्यात त्या तिघीजणी नापास झाल्याचे जाहीर झाले होते. मग तिघीच्या पालकानी फेरतपासणीकरता अर्ज केला असता त्या तिघीजणी पास झाल्या असल्याचे जाहीर करण्यात आले.

बोर्डाची परीक्षा पास झाल्याचे जाहीर झाल्यावर त्या कला व विज्ञान विभागाकडे न जाता तांत्रिक शिक्षणाकडे गेल्या होत्या. सरकारने तकनकी ज्ञानाचा प्रसार व्हावा म्हणून काढलेल्या एका सस्थेतून त्यांनी एम. बी. बो. एस. चा डिप्लोमा घेतला होता. एम. बी. ए. आता गल्लोगल्ली झाले असल्याकारणाने त्यांनी एम. बी. ए म्हणजे Master in Business Adminisrtration न करता एम. एम. बी. बी. म्हणजे Master in Milking, Buttering and Butter milking चा अभ्यास केला. त्या तीन वर्षांच्या शिक्षणक्रमात जवळजवळ अडीच वर्षं त्याची संस्था प्रथम विद्यार्थ्यांचा संप म्हणून, मग सहाय्यक वर्गाचा संप म्हणून, मग प्राध्यापकाचा सप म्हणून व शेवटी मुख्याध्यापकाचा सप म्हणून बद होती; पण म्हणून सरकारने त्यांना प्रमाणपत्र न देण्याची कोती मनोवृत्ती दाखवली नाही. उलट शिक्षणमंत्र्यानी स्वत: येऊन मोठ्या समारभाने त्याना प्रमाणपत्रे दिली होती. मत्रीमहोदयानी अडीच वर्षे शिक्षणसंस्था बद होती म्हणून त्यांच्या शिक्षणाचे नुकसान न होता, त्यांनी घरी आई–वडिलाकडून व इतर वडीलधाऱ्या मडळीकडून एम. एम. बी. बी. चे शिक्षण घेतले, त्यामुळे एका दृष्टीने त्याचा फायदाच झाला आहे, असे विधान करून खूप टाळ्या व मोठी वाहवा मिळवली होती. खरेच आई–वडिलासारखे शिक्षण जगात कोण देणार ?

प्रमाणपत्र मिळाल्यानंतर त्यानी कोणा सरकारी खात्यात नोकरी न करता आपल्या पायावर उभे रहावयाचे ठरवले. सरकारने समाजवाद आणण्याकरता राष्ट्रीयीकरण केलेल्या वेगवेगळ्या बँकातून त्यानी वेगळ्या वेगळ्या नावानी, पण एकाच कारणाकरता कर्जे काढली. त्यांनी वेगवेगळ्या नावांनी कर्जे काढली त्याचे काही विघ्नसंतोषी लोकाना बरे वाटले नाही. त्यांच्या टीकेला त्यांनी 'नावात काय आहे ?' असे कोणा गोऱ्या लेखकाने विचारलेल्या प्रश्नाने उत्तर दिले. आता गोऱ्या माणसाचा असा पुरावा दिल्यावर त्या विघ्नसंतोषी लोकांना चूप बसण्याशिवाय गत्यंतरच नव्हते.

त्यानी ज्या वेळी राष्ट्रीयकृत बँकेतून कर्ज काढले त्या वेळी त्यानी व्यवस्थापनाला 'हे कर्ज केव्हा परत करू हे आताच सांगता येणार नाही,' असे म्हटल्यावर तो व्यवस्थापक मोठ्याने गडगडून हसला होता. तो म्हणाला, 'तुमच्या बँकेविषयीच्या व कर्जाविषयीच्या कल्पना फार जुन्या आहेत. राष्ट्रीयीकृत बँकेतून काढलेले कर्ज परत करावयाचे असते, हे कोणा खुळ्यांनी तुम्हाला सांगितले ? मग साध्या बँकेत व राष्ट्रीयीकृत केलेल्या बँकेत फरक तो काय राहिला ? ह्या त्याच्या अभिवचनाने त्या तिघीचा उत्साह त्रि–गुणित झाला होता.

बाकी त्याचे आयुष्य आपण कथा–पुराणातून वाचतो तसेच चालले होते. त्या दही–दूध–लोणी विकायला यमुनेच्या बाजाराला जात. कृष्णही कथा–कादंबऱ्यातून असतो तसाच नटखट होता. तो त्यांना बाजाराला जाताना अडवत असे. त्याचे दही, दूध, लोणी लुटत असे. त्या भल्या पहाटे यमुनेवर आघोळीला जात व कृष्ण त्यांच्या सवयीप्रमाणे त्यांचे कपडे घेऊन झाडावर उंच जाऊन बसत असे !

गोपी यमुनेवर आघोळीला जात ह्याचे कारण त्यांच्या घरात नळ नव्हते, असा नाही. त्याच्या घरातून मुबईला असतात तसेच नळ होते. त्याच्या घरात मुबईला असतात तसेच नळ होते म्हटल्यावर फक्त नळ होते, पण त्यातून पाणी येत नसे, हे वेगळे सांगावयाची गरज नाही व गिरगावातल्यासारखे कोणी रस्ता–रोको आदोलन केल्याशिवाय नळाना पाणी येण्याची शक्यताही नव्हती. गोपीना काय कोठून तरी आघोळ झाल्याशी कारण ! त्यातून घरी निर्जीव नळासमोर आघोळ करण्यापेक्षा यमुनेवर कृष्ण व त्याच्या सवंगड्यांसमोर आघोळ करण्यात जास्त मौज होती. त्यातून कृष्णाने त्याचे कपडे वगैरे उंच झाडावर लपवून ठेवल्यावर तर काय मजेला पारावारच रहात नसे !

थोडक्यात म्हणजे गोकुळ पुराणकाळी होते तसेच होते. गोपीही पूर्वी होत्या तशाच होत्या. गोपही होते तसेच होते, किंबहुना गोप 'तसेच' होते ( म्हणून गोपीही 'तशाच' होत्या, म्हटले असते तरी चालले असते.)

एवढे मोठे यू. नो. ने स्त्री–वर्ष साजरे केले. स्त्रियांना जागे करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्यावरील अन्यायाला तोंड फोडले व त्यांना आपला स्वातंत्र्याकरता लढा पुकारण्याचे पण आवाहन केले. ह्या स्त्री–वर्षामुळे सगळेजण इकडचे तिकडे झाले. मराठी लेखिकांना, मुख्यतः प्राध्यापक–लेखिकांना लेख लिहायला चविष्ट विषय मिळाला. ज्या चळवळया स्त्री–पुढाऱ्यांना आता कोणते प्रश्न सोडवावेत असा प्रश्न पडला होता त्यांना उत्तर मिळाले. साध्या साध्या गोष्टींतून, अगदी व्याकरणासारख्या निष्पाप विषयातही स्त्रियांवर अन्याय होत असल्याचे त्या हिरीरीने सांगू लागल्या व त्याकरता मोर्चे काढू लागल्या, रस्ता–रोको आंदोलने करू लागल्या !

पण एवढया मोठया वर्षभर चाललेल्या गोंगाटाचा गोकुळातल्या गोपीवर ढिम्म सुद्धा परिणाम झाला नाही! नाही गोकुळात मोर्चे निघाले, नाही स्त्री–स्वातंत्र्याकरता चळवळी झाल्या. गोकुळी भाषेत नाही लेख लिहिले गेले; ना त्यावर काही खास पुस्तिका प्रसिद्ध झाल्या !

याचा अर्थ गोकुळातल्या गोपीना स्वातंत्र्य नको होते असा नव्हे. खरं म्हणजे गोपीना जे स्वातंत्र्य मिळत होते त्याचा अमेरिकेतल्या ललनानी पण हेवा केला असता. कोणत्याही तऱ्हेचे स्वातंत्र्य उपभोगावयाचे त्यानी शिल्लक ठेवले नव्हते. त्या स्वतः दूध, दही, लोणी बाजारात विकायला जात व स्वतःच पैसे मिळवत, त्यामुळे त्यांच्यावर आर्थिक बाबतीत अन्याय होण्याचा प्रश्नच नव्हता. उलट गोपांनाच, बिडी–काडीला लागणारे पैसे गोपीकडून घ्यावे लागत.

अमेरिकेतल्या ललनानी आपल्या अंगवस्त्राची होळी केली. गोकुळच्या गोपीबद्दल तोही प्रश्न नव्हता. त्या मुळी त्या तऱ्हेची अंगवस्त्रे घालतच नसत. काही गोपीनी अमेरिकन ललनांच्या पावलावर पाऊल ठेवून आपण परकर-पोलक्यांची होळी करू या, असा हट्ट धरला होता; पण तसे करू देणे सामाजिक शांततेच्या दृष्टीने मोठे धोक्याचे होते, म्हणून ते रहित झाले.

ज्या स्वातंत्र्याबाबत मराठी लेखिका अगदी हळुवार होतात त्याबाबत, म्हणजे लैंगिक स्वातंत्र्याबाबत तर काही बोलायलाच नको. अगदी बंडखोर मराठी लेखिकासुद्धा लैंगिक स्वातंत्र्य मागताना कंसात लगेच, स्वैराचार नव्हे, असे म्हणते. काही गोपींच्या जेव्हा असले 'कंसमय' लेख वाचनात आले त्या वेळी त्यांची हसता हसता पुरेवाट झाली. कारण स्वैराचार करायला तर लैंगिक स्वातंत्र्य हवे असते. स्वैराचार करावयाचा नाही, मग लैंगिक स्वातंत्र्य काय उपासाला खायला करावयाचे आहे ? असा त्यांचा प्रश्न.

ह्या स्वातंत्र्याबाबत राधा हे सर्व गोपीचे ध्येय होते. सासू, सासरा, पती सगळे असून, कृष्णाबाबत सर्व तऱ्हेचे स्वातंत्र्य राधा उपभोगत असे. 'राधे सैल तुझा अंबाडा' हे काव्य ऐकल्यावर, ह्या अंबाडा कदाचित् मिस्टर राधानी सैल केला असल्याचा कोणाला संशयही येत नसे. राधेचा अंबाडा सैल झाला आहे ना, मग तो कृष्णानेच केला असणार, असे सगळेजण मोकळेपणे म्हणायचे !

राधा उपभोगत असलेल्या स्वातंत्र्याबद्दल गोकुळातल्या जनतेनेही मोठा विशाल दृष्टिकोन ठेवला होता. कृष्णाशी असलेल्या संबंधामुळे राधाची बदनामी होत नव्हती. ती स्वैराचारी आहे म्हणून तिला कोणी दूषणे देत नव्हते. तिच्यामुळे तरुण-तरुणीवर वाईट परिणाम होईल, म्हणून तिच्या वागण्यावर सेन्सॉर करावा, असे सेन्सॉर बोर्डाचे माननीय सभासदही म्हणत नसत ! उलट राधा-कृष्णाच्या प्रेमावर काव्ये रचली गेली, कादंबऱ्या लिहिल्या गेल्या, नाटके झाली: अगदी राधा-कृष्णन् नावाच्या माणसाला गोकुळ-नगरपालिकेचा, त्याचे नाव फक्त राधा व कृष्ण संबंध दाखवणारे होते म्हणून, अध्यक्ष निवडण्यात आले होते !

सांगण्याचा मथितार्थ एवढाच की, जगात काय वाटेल ते होवो, कशाचेही वर्ष साजरे होवो, त्याचा गोकुळावर काहीही परिणाम होत नसे व त्याचे आयुष्य शतकानुशतके मागील पानावरून पुढे चालू असे चालू होते !

□

हे झाले सगळया गोकुळाबाबत. आता दया, क्षमा व शांतीबद्दल सांगावयाचे म्हणजे सकाळी नऊला पाणी असेल तर त्या घरी आंघोळ करत वा यमुनेवर जात. मग त्या घरात बनवलेले दूध, दही, लोणी वगैरे घेऊन मथुरेला बाजाराला जात. कृष्णाने वाटेत अडवले तर ठीकच; नाहीपेक्षा त्या मथुरेत जाऊन वाढत्या भावाने ते दूध दही, लोणी विकून दुपारच्या लंचच्या वेळी घरी येत. मथुरेला पायी जावयाचे, तेथे वस्तूची विक्री करावयाची व परत गोकुळी पायी यायचे. त्यामुळे त्या अगदी दमून जात. त्यामुळे त्या तिघीजणी लंच झाला की, कचेरीतले मोठे मोठे साहेब जशी वामकुक्षी करतात तशी वामकुक्षी करत.

वामकुक्षी झाल्यावर चहा घेऊन जरा इकडे-तिकडे केले की, संध्याकाळ होत असे. संध्याकाळ झाली की, लागला तर रेडिओ–सिलोन, नच लागल्यास विविध-भारती लावून झुमरीतलैया व लातूर वगैरे लोकांच्या फर्माइशीनी होणारा कार्यक्रम व इतर गाणी ऐकत असत. बिनाका गीतमाला हा तर त्यांचा लहानपणापासूनचा अगदी आवडता कार्यक्रम होता. एक वेळ अमिन सायानीचा बिनाका चुकेल, पण त्यांचा कधी चुकला नव्हता !

याचा अर्थ देशात दूरदर्शन आले नव्हते असा नाही. उलट दूरदर्शन येऊन आता चागली दोन दशके झाली होती; पण देशात दूरदर्शन होता तो कृष्ण-धवल होता. कृष्ण-धवल दूरदर्शनाबाबत गोकुळच्या रहिवाशांची मते माननीय माहिती व प्रसारणमंत्र्यांशी मिळती-जुळती होती.

सरकार जनतेकरता इतके सगळे करते. साखरेच्या व इतर जीवनाश्यक वस्तूच्या गोष्टी जेथे रुकतील तेथे रुकू देते. आवश्यक त्या सर्व गोष्टीचा शक्य होईल तेवढा पुरवठा करते. जनतेची जेवढी शक्य आहे तेवढी सेवा करते. लाच-लुचपत जेवढी कमी करणे शक्य आहे तेवढी करावयाचा प्रयत्न करते. हरिजनावर व स्त्रियांवर कमीत कमी अत्याचार होऊ देते; पण एवढे असूनसुद्धा जनतेत सरकारबद्दल, त्यांच्या मंत्र्यांबद्दल, त्यांच्या धोरणाबद्दल म्हणावा तेवढा आदर वाटत नाही ह्याचे कारण फक्त एकच एक व ते म्हणजे देशात रंगीत दूरदर्शन नाही ! ह्या विचारसरणीशी दया, क्षमा, शांती धरून गोकुळातली तमाम जनता सहमत होती. त्याचकरता त्यानी कृष्ण–धवलवर बहिष्कार घातला होता. त्यामुळे गोकुळात दूरदर्शन नव्हते व म्हणून गोपीना आकाशवाणीवर आपली भूक भागवावी लागत होती.

कृष्णाचा पण जनतेच्या व माननीय माहिती व प्रसारणमंत्र्यांच्या रंगीत दु. द. ला पाठिंबा होता. खरे म्हणजे भारतीय जनतेप्रमाणे कृष्णपण काळाच असल्यामुळे दु. द. रंगीत असला काय वा कृष्ण-धवल असला काय, त्याला काही फरक पडणार नव्हता. दोन्हीमध्ये तो काळाच दिसला असता; पण जनतेच्या खऱ्या पुढाऱ्याप्रमाणे स्वतःला फरक पडो वा न पडो, जनतेच्या मागणीला पाठिंबा हा द्यायलाच पाहिजे, ह्या सद्हेतूनेच कृष्ण पण जनतेच्या रंगीत मागणीला पाठिंबा देत असे.

आता कृष्ण काही आपल्या पुढाऱ्यांप्रमाणे साधा-भोळा नव्हता. रंगीत मागणीला पाठिंबा देण्यात त्याचा 'कृष्ण-हेतू' होता. खरे म्हणजे यमुनेतल्या आंघोळ करणाऱ्या गोपी पाहून पाहून कृष्ण आता अगदी कंटाळला होता. प्रथम यमुनेवर जावयाचे, मग गोपी केव्हा येतील त्याची वाट पहावयाची, मग त्या सगळे कपडे कधी काढताहेत ह्याची वाट पहावयाची, मग ते सगळे घेऊन उंच झाडावर चढून बघावयाचे काय, तर व्ही. शांतारामाच्या सिनेमातल्यासारख्या गळ्यापर्यंत पाण्यात उभ्या असलेल्या गौळणी ! आता गळ्यापर्यंत पाण्यात उभ्या असलेल्या गौळणी पहाण्यात व तेवढ्याच पाण्यात उभे असलेले सरदारजी पहाण्यात काय फरक होता सांगा बरे ?

यमुनेवर आंघोळी करणाऱ्या गोपी पहाण्यापेक्षा कृष्ण-धवल असल्या तरी रंगीत चित्रपटातील नळावर आंघोळ करणाऱ्या गोपी जास्त छान दिसतात, असे मुंबईला नुकत्याच जाऊन आलेल्या गोपाने कृष्णाला सांगितले होते. येथे आंघोळ करणाऱ्या गोपी पहायला झाडावर चढून जाण्याची तसदी घ्यावी लागते व एवढे करूनही गंमत पहायला बरोबर कोणी नसते. नळावर आंघोळ करणाऱ्या गोपी पहाण्यात सुखच सुख होते. आधी ते गृह थंडगार, त्यात पिछे–लोट खुर्च्या व इच्छा असल्यास कोणा गोपीशेजारी बसून नळावर आंघोळ करणाऱ्या गोपी मनमुराद पहाता येतात. वर नळाला नव्या लाटेचे पाणी येत असल्याकारणाने असली आंघोळ–दृश्ये अभिमानाने पहाता येतात.

आता हे खरे आहे की असले आंघोळ–चित्रपट, दू. द. कृष्ण-धवल असो वा रंगीत असो, त्यावर दाखवणे शक्य नव्हते. पण कृष्णाला दूरदृष्टी होती. पुढे पुढे सगळे चित्रपट असलेच निघू लागल्यावर तरी दू. द. वर असले चित्रपट दाखवतील की नाही ? हा प्रश्न व हा हेतू मनाशी बाळगूनच कृष्ण रंगीत दू. द. चा समर्थक बनला होता.

सांगायचा मुद्दा काय की, पुराणकाळापासून आतापर्यंत कृष्णात, त्याच्या सवंगड्यात, गोकुळात, गोपीत, गोपात म्हणजे समग्र गोकुळी जनतेत कोणत्याही तऱ्हेचा फरक पडला नव्हता. अर्थात आपल्या तिन्ही नायिकांत म्हणजे दया, क्षमा व शांतीमध्ये पण फरक पडावयाचे काही कारण नव्हते व तसे काही कारण नव्हते म्हणून काही फरक पडला नव्हता.

¤

मात्र गेल्या काही दिवसापासून आपल्या दयामध्ये अगदी सर्वांगीण फरक पडत चालला होता. आतापर्यंत दया इतर सर्वसामान्य गोपी प्रमाणे होती. खेळावे, बागडावे, मौजमजा करावी अशी तिची वृत्ती होती. चांगले चांगले भारी व एकमेकांना शोभतील असे कपडे करावेत, त्यावर शोभतील असे दागिने घालावेत व तेवढ्याच शोभतील अशा चपला घालाव्यात, नटून व थटून सिनेमाना जावे, नाटकांना जावे, कधी कधी पार्टीज्‌ना जावे वा पार्टीज द्याव्यात. पार्टीत सगळे आपलेच लोक असल्यास थोडे मद्य घ्यावे, कधी धूम्रपान करावे अशी दयाची इतर गोपीप्रमाणे वृत्ती होती.

पण कसं व का कोणास ठाऊक, दयामध्ये एकदम फरक पडत चालला होता. गरीब व दलित लोकांविषयी तिला एकदम व मोठा कळवळा वाटू लागला होता. शेतकऱ्यांचा भाव वाढावा असे तिला वाटू लागले होते. कामगाराचे हाल तिला पहावेनात, स्त्रियावरच्या अत्याचाराच्या बातम्या वाचून तर तिची झोप उडून जात असे व आता एवीतेवी झोप येत नाही म्हणून तिने आपल्या विचाराच्या गोपांशी व गोपीशी चर्चा–सत्र सुरू केले. त्या समविकारांच्या व समविचाराच्या गटाला ते 'पार्टी' म्हणू लागले. रात्र रात्र चर्चा होऊ लागल्या. बैठकी होऊ लागल्या. बौद्धिके घेतली जाऊ लागली.

अर्थातच अशा अनैसर्गिक वागण्याचे परिणाम दिसू लागले. दयाला सकाळी उठायला उशीर होऊ लागला. त्यामुळे क्षमा व शांतीचा खोळंबा होऊ लागला. त्यांना बाजारला जायला उशीर होऊ लागला. तसा उशीर होऊ लागल्याकारणाने त्याचे व कृष्णाचे वेळापत्रक चुकू लागले. त्यामुळे कृष्ण दुसऱ्या गोपीना अडवू लागला व त्यांचे दूध, दही खाऊ लागला. त्यामुळे क्षमा व शांतीची चिडचिड होऊ लागली; पण त्या दयाच्या खास मैत्रिणी असल्यामुळे दयाला सोडून बाजाराला जाण्याची कल्पनासुद्धा त्याना करवत नव्हती.

आजसुद्धा असेच झाले. क्षमा व शांती तयार होऊन दयाच्या अंगणात आल्या; पण दयाचा पत्ताच नव्हता! थोडा वेळ वाट पाहून त्यांनी दयाला हाक मारायला सुरुवात केली. मग त्यांनी ओरडून दया, लवकर नीघ, नाही तर आपली ७-१८ चुकेल, असे सांगितले. खरे म्हणजे त्या सगळ्या गोपी बाजारला पायीच जात. पण त्यानी असे ऐकले होते की, मुंबईला कोणाला निघण्याची दाखवावयाची असेल तर ८–१० ची चुकेल, ९–२३ ची चुकेल असे म्हणतात म्हणून. तेव्हा त्यानी पण आपल्याला उशीर होतो आहे हे दाखविण्याकरता म्हणून ७–१८ ची चुकेल असे म्हटले होते व त्याने तरी दया लवकर खाली येते का ते पाहिले.

ही ७–१८ ची मात्रा मात्र खरंच लागू पडली. दयाने ७–१८ चुकेल, ऐकल्यावर वरूनच ओरडून 'पाच मिनिटात येते हं !' म्हटले व खरोखरच पाच मिनिटात ती खाली अंगणात आली होती. हल्ली दयाला प्रसाधनाला वेळ कमी लागत असे, म्हणजे जवळजवळ लागतच नसे म्हणानात. आधीच तिचे केस मानेपर्यंत रुळणारे होते. आता तिने ते आणखी कापून कमी केले होते. त्यामुळे कंगवा, फणी-वेणी वगैरे गोष्टी अजिबात नव्हत्या. ब्रशाच्या एका फटकाऱ्याने केस ठीक बसत. मग हाताला येईल ती साडी व त्यावर जुळत्या रंगाचा असल्यास उत्तम, जुळता नसल्यास अधिकच उत्तम, असे

**खरं म्हणजे यमुनेतल्या आंघोळ करणाऱ्या गोपी पाहून पाहून कृष्ण अगदी कंटाळला होता**

ह्याताला येईल ते पोलके घालत असे.

दया खाली येताच 'किती उशीर ह्या दया!' असे शांतीने प्रेमपूर्वक रागाने विचारले. 'अग, पार्टीची मीटिंग होती. चांगली अडीच वाजेपर्यंत चालली होती!' दया म्हणाली व आपल्या उशीरा उठण्याचे समर्थन करू लागली. 'पार्टीची मीटिंग होती, की आपली नुसती पार्टीच होती?' क्षमाने अत्यंत खडूसपणे विचारले. क्षमाचा हात नुसतासुद्धा कोणी धरला नसता व खडूसपणे बोलण्यात तर कोणीही तिचा हात धरला नसता! तिच्या खडूसपणाच्या बोलण्यामुळे दया जाम भडकली.

'हे असे होते बघा. आम्ही तुमचे–सगळ्या जनतेचे प्रश्न सोडवण्याकरता मर मर मरतो, रात्री चर्चा करतो व वर आम्हालाच विचारतात की, पार्टीची मीटिंग होती की, नुसती पार्टीच होती म्हणून!' दया एकदा भडकली म्हणजे अतोनात भडकत असे.

'पण काय ग, रात्री अडीच वाजता मीटिंग संपल्यावर तुम्हाला बस कशी मिळाली?' शांती म्हणजे साधेपणाचे मूर्तिमंत प्रतिक होते. त्या प्रश्नाने भडकलेल्या दयाला पण तिची दया आली. दया काही उत्तर देणार होती; पण खडूस क्षमा अशी संधी बरी सोडील!

'अग वेडाबाई, अशा पार्टी–मीटिंग्जना तुझ्या-माझ्यासारखे बसने येणारे थोडेच येतात? स्वत:च्या गाड्यांनी येणाऱ्यांची मीटिंग असते ती!'

पण आता शांतीच्या डोक्यातली शेवटची बस सुटली होती. ती विचार करू लागली की, दयाच्या पार्टीचे लोक जर एका विचाराचे आहेत, त्यांचे ध्येय एक आहे, मते मिळती–जुळती आहेत, तर मग इतकी रात्ररात्र चर्चा कशावर होते? आता मूळ तत्त्वेच वेगळी असतील तर गोष्ट वेगळी; पण येथे तसेही नाही. सगळेच गरिबांचे कैवारी व त्यांचे प्रश्न सोडवायला तयार! शांतीने आपल्या मनातले विचार दयाला सांगितले.

दया तिला समजावून सांगू लागली की, आमची सगळ्यांची तत्त्वे एक आहेत, ध्येय एक आहे, म्हणजे काय करावयाचे त्यावद्दल एकमत आहे; पण कोणत्या मार्गाने जावयाचे, म्हणजे कसे करावयाचे, ह्यावर मुख्यत: चर्चा होते.

'कमाल आहे तुमची! काय करावयाचे त्यावद्दल एकमत असताना कसे करावे हे ठरवायला रात्रीचे अडीच वाजले तुम्हाला? मग रात्री अडीचनंतर तरी काही केलेत की नाही?' अर्थात साध्या साध्या वाक्यातून असाधा अर्थ क्षमाशिवाय दुसरे कोण काढणार होते?

आता दया व शांतीने क्षमाकडे लक्ष द्यावयाचे नाही म्हणून ठरवले. शांतीने दयाला विचारले, 'पण काय ग दया, काल रात्री अडीच वाजेपर्यंत कोणत्या मार्गांची चर्चा करत होतात? कोणत्या अन्यायाला लढा देण्याचे ठरवत होतात?'

'हे असे होते पहा. मी तुम्हाला प्रथम कालच्या मीटिंगमध्ये काय झाले ते सागणार होते; पण ह्या क्षमाच्या बोलण्याने भलतीकडे भरकटत गेले बघ! पार्टी मीटिंगमध्ये सध्या माझे असेच होते बघा. खरे म्हणजे काल आम्ही आपल्यावर होणाऱ्या अन्यायाबाबतच चर्चा करत होतो बघा!'

'पण माझ्यावर अजुनी कोणीसुद्धा अन्याय केलेला नाही बाई!' परत शांतीचा भोळेपणा.

'हेच, हेच मला तुम्हा बायकांचे आवडत नाही. एक तर प्रत्येक वाक्याच्या शेवटी असं बाई बाई काय म्हणतेस, मागास बायकासारखे? आणि आपल्यावर अन्याय होतो आहे. कित्येक शतके अन्याय होतो आहे. त्याच्यावर कादंबऱ्या लिहिल्या गेल्या, नाटके, तमाशे, वग लिहिले गेले व असे असून माझ्यावरही अजून कोणी अन्याय केला नाही म्हणतेस? अशा सार्वजनिक महत्त्वाच्या प्रश्नाला वैयक्तिक दृष्टिकोनातून पहातेस?' आता दया रुज न लावता लाल लाल झाली होती!

'पण अन्याय आमच्यावर व त्याची चर्चा मात्र पार्टीमध्ये!' क्षमाला दयाने शांतीवर इतके लाल व्हायला नको होते, असे वाटले म्हणून दयाला अडवण्याच्या दृष्टीने क्षमा म्हणाली–

'अग, असं होणारच!' दया गालावरचा रुज पुसून टाकत म्हणाली. आता तिच्या आवाजात समजूतदारपणा आला होता.

'ज्यांच्यावर अन्याय होत असतो त्यांना वेळ कुठे होत असतो चर्चा करायला? म्हणून पार्टीचे लोक वेगवेगळ्या लोकांवर होणाऱ्या वेगवेगळ्या अन्यायाचे प्रश्न हाती घेतात, चर्चा करतात, त्यासाठी आंदोलने उभारतात, लढा उभारतात, बंद जाहीर करतात, रस्ता रोको करतात, संप पुकारतात!'

'पण प्रत्यक्ष अन्याय करणाऱ्याविरुद्ध काय करतात? आता तू म्हणतेस तसे सगळे केले तर त्याचा लोकांना, म्हणजे तुमच्या भाषेत जनतेलाच त्रास होणार!' क्षमासुद्धा आता पार्टी सभासदासारखी अटीतटीने वाद घालू लागली.

'खुळीच आहेस! त्याच्याविरुद्ध प्रत्यक्ष काही कशाला करायला पाहिजे? त्यांच्यावर दडपण आले म्हणजे झाले! आता परवा मराठवाड्यात कोणा बाईवर, हरिजन बाईवर बलात्कार झाला तर पार्टीच्या लोकांनी पोलीस ठाणे जाळून टाकले!' दया पार्टीचे मार्ग सोदाहरण देऊन पटवून देऊ लागली.

'पण आता तिथल्या दुसऱ्या कोणा बाईवर काही अत्याचार झाला तर तो नोंदवायला पोलीस-ठाणेच जागेवर नाही, असे होणार!' शान्ती सरळ मनाची असल्यामुळे तिला पोलीस-ठाणे जाळण्यात लोकांचे सरळ नुकसान होणार आहे, हे सहजपणे लक्षात आले.

'आता लढा चालू झाला म्हणजे जनतेला थोडा त्रास होणारच! कोणत्याही लढ्यात वा लढाईत तसे होतेच; पण अशा गोष्टींचे सरकारवर दडपण पडतेच की नाही?'

अशा गंभीरपणे चाललेल्या चर्चेचे क्षमाच्या मनावर दडपण पडत चालले. ती म्हणाली, 'आपण परत वाहवत चाललो, तुमच्या पार्टी मीटिंगसारखे. आता सांग आमच्यावर अन्याय कोणता होतो आहे? कोण करते आहे? तुम्ही काल काय चर्चा केलीत? कोणावर दडपण आणावयाचे?'

'हं, तर मी काय म्हणत होते की, हा कृष्ण आपल्यावर घोर अन्याय करतो आहे. आपण बाजारात निघालो की, आपल्यावर बळजबरी करतो. आपल्याला अडवून आपले दूध, दही, लोणी खातो. कधी कधी आपले घडे पण फोडून टाकतो! आता आपण त्याच्या अन्यायाविरुद्ध लढा पुकारावा, असा पार्टीचा आदेश आहे!' दयाने अगदी मोजक्या शब्दात मोजके काय करावयाचे ते सांगितले.

'काल रात्री झालेल्या मीटिंगमध्ये काळ्या कृष्णाचे काळे अत्याचार

चर्चिले गेले होते. बाकी अत्याचाराबरोबर व अन्यायाबरोबर कृष्ण, गोपी आघोळीला गेल्या की त्यांचे कपडे घेऊन उंच झाडावर जाऊन बसतो, हा पण अन्याय चर्चिला गेला; पण त्याबाबत पार्टीमध्ये दोन तट पडले. काहीचे म्हणणे असे पडले की, आधीच कमी कपडे घालणाऱ्या गोपी, सगळेच्या सगळे कपडे काढून ठेवून आंघोळीला जायला लागल्या तर कृष्णाचेच काय, पण कोणाचेही मन त्याचे कपडे लपवण्याकडे जाणारच ! काही म्हणाले, ही जुनाट मनोवृत्ती दाखवणारे झाले. जसे काही लोक स्त्रियांवरच्या अत्याचाराचे कारण त्याचे उत्तान कपडे आहेत असे म्हणतात, तसे त्याच्या म्हणण्याप्रमाणे स्त्रियांनी किती व कसे कपडे करावेत, हा त्याचा वैयक्तिक प्रश्न आहे. खूप वेळ चर्चा झाली; पण एकमत म्हणून होईना. मग शेवटी हा प्रश्न प्रत्येक गोपीने आपआपले कपडे सोडून ठेवताना सोडवावा, असे ठरले.

मात्र कृष्ण गोपींना मथुरेला बाजाराला जाताना अडवून त्यांचे दूध, दही, लोणी वगैरे खाऊन त्यांच्यावर मोठा अन्याय करतो ह्यावर, सगळ्यांचे एकमत झाले व त्याचा काही तरी बंदोबस्त करावयाला पाहिजे. ह्यात शारीरिक अन्यायाइतका आर्थिक अन्याय पण गुतला असल्याकारणाने पार्टीत आर्थिक प्रश्नावर अधिकारवाणीने बोलणाऱ्यांना सुवर्णसंधी मिळाली व ती त्यांनी अर्थातच सोडली नाही. काल रात्री बैठक अडीचपर्यंत चालण्याचे ते एक महत्त्वाचे कारण होते.'

दयाने आदल्या दिवशी, म्हणजे आदल्या रात्री झालेल्या बैठकीचा वृत्तात सांगितला व आजपासूनच आपला लढा सुरू झाला आहे, म्हणून जाहीर केले. अर्थात शांती व क्षमाला लढा कशाशी खातात हे माहीत नसल्यामुळे तो चालू कसा करतात तेही माहीत नव्हते. लढा द्यावयाचा म्हणजे नक्की काय करावयाचे, असा त्यांना प्रश्न पडला. तो पडलेला प्रश्न त्यांनी उचलून घेऊन दयाचे हाती सुपूर्त केला.

'लढा द्यावयाचा म्हणजे त्याच्या अन्यायाला तोड द्यावयाचे.' दया उत्तरादाखल म्हणाली. ती तरी काय करणार ? पार्टीच्या एका कोशातलीच वाक्ये ती वापरणार की नाही ?

'तोड देऊन अन्याय कमी कसा होणार ? उलट त्यामुळे अन्यायाला तोड फुटण्याची व तो वाढण्याचीच शक्यता जास्त !' हे वाक्य अर्थातच क्षमा म्हणाली होती, हे वेगळे सांगावयाची गरज नाही.

'ह्या क्षमेला कोणतीही गोष्ट सरळपणे बघता येत नाही बघ !' आता शांतीचीसुद्धा क्षमेच्या खडूस बोलण्याने शांती ढळली होती. 'दया, तू तिच्याकडे काही लक्ष देऊ नकोस. मला सांग तू अन्यायाला तोंड कसे द्यावयाचे ते !'

'प्रथम म्हणजे आपण आपला आतापर्यंतचा मार्ग बदलावयाचा.' दया म्हणाली.

'पण आपण आपला आतापर्यंतचा मार्ग बदलला, म्हणजे वेगळ्या वाटेने गेलो तर ते कृष्णाला कळणार कसे ? ते कळले नाही तर तो आपल्याला अडवणार कसा व कुठे ? आणि जर अडवलेच नाही तर मग आपल्यावर अन्याय होणार कसा ?' परीक्षेत एकदम अ, ब, क असे सात-आठ प्रश्न असतात तसे शांतीने अ, ब, क प्रश्न विचारले.

'आणि जर अन्याय-कर्ताच नाही तर तोड कुणाला द्यावयाचे ?' अर्थात क्षमा.

मग दयाने त्यांना मार्ग ह्याचा अर्थ फक्त रस्ता किंवा वाट एवढाच न होता त्याचा अर्थ कार्यपद्धती ह्राही होतो, हे सांगितले व कार्यपद्धत बदलावयाची म्हणजे आतापर्यंत कृष्णाने अडवल्यावर अडवून घेत होतो, त्याने दूध, दही तपासून बघतो म्हटल्यावर तपासू देत होतो, त्याने दूध, दही, लोणी खातो म्हटल्यावर खाऊ व पिऊ देत होतो, उलट त्याच्या गमक्या करत होतो, विनवण्या करत होतो, ते बंद करावयाचे ! प्रथम म्हणजे त्याच्याकडे लक्ष द्यावयाचे नाही व जरी नंतर दिले तरी त्याला कशाला म्हणून हात लावू द्यावयाचा नाही!' हे सगळे सागून 'चला आता बाजाराला जाऊ या. आधीच किती उशीर झालाय !' असे ती म्हणाली व मग त्या तिघींनी आपआपले दुधा-दह्याचे माठ डोक्यावर घेतले व त्या बाजाराला ठुमकत ठुमकत जाऊ लागल्या. सगळे जग बदलले तरी त्याचे ठुमकत ठुमकत चालणे बदलले नव्हते !

¤

तिकडे कृष्ण त्याच्या प्रमुख चमच्याबरोबर म्हणजेच पेंद्याबरोबर यमुनेच्या बाजाराला जाण्याच्या वाटेवर गोपींची वाट पहात थांबला होता. कृष्ण आपल्या हातातल्या 'सिको' घड्याळाकडे परत परत पहात होता. रेडिओवरची 'सिको घडी–सबकी पसंत-सिको, सिको' ही जाहिरात व त्यानंतर होणाऱ्या प्रियकर आणि प्रेयसीच्या सिको घड्याळाविषयीच्या प्रेमळ संवादाला भुलून जाऊन कृष्णाने ते घड्याळ नुकतेच खरेदी केले होते. प्रेमिकेपेक्षा विश्वासू असलेल्या त्या घडीकडे तो घड़ी घडी मनगट वळवून पहात होता; पण गोपींचा काही पत्ता नव्हता ! त्यामुळे त्याचा धीर सुटत चालला. एकदा तर त्याने घड्याळ कानाला लावून पाहिले. मग त्याच्या लक्षात आले की, आज–कालची घड्याळे टकटकीत नसतात म्हणून !

आता पेंद्यालाही किती वाजलेत, हे विचारण्यात अर्थ नव्हता. कारण पुढारी म्हणेल ती वेळ, त्याच्या वेळेत व आपल्या वेळेत फरक पडला तर आपला पुढारी आपल्याला मंडळातून काढून टाकील, अशी त्याला भीति वाटत असल्यामुळे पेंद्याने घड्याळ वापरावयाचेच सोडून दिले होते. हो, फट म्हणता वा न म्हणता, उगाच ब्रह्महत्या नको !

घड्याळ सिकोचे असल्यामुळे प्रेयसीपेक्षा ते विश्वासार्ह होते. त्यामुळे गोपींनाच यावयाला उशीर झाला आहे, हे कृष्णाच्या मनाने पक्के केले व त्यांना आज यायला एवढा उशीर का झाला असेल, ह्याची त्याला काळजी वाटू लागली. रात्री गोपी कुठल्या सांस्कृतिक कार्यक्रमात गुंतल्या असतील तर त्याची माहिती कृष्णाला अवश्य असती. कारण त्याच्याशिवाय गोकुळातल्या गोपी कोणाबरोबरही सांस्कृतिक-कार्यक्रम करत नसत त्यामुळे त्या रात्री एखाद्या कार्यक्रमाला गेल्या असाव्यात, त्यामुळे त्यांना उठायला उशीर झाला असावा, व त्यामुळे त्यांना बाजाराला जायला उशीर झाला असावा, ही कल्पनाच बाद झाली. मग काय झाले असावे बुवा ? असा प्रश्न पडला.

दयामध्ये फरक पडल्याचे त्याच्या पण लक्षात आले होते; पण हा

## कृष्ण आपल्या हातातल्या 'सिको' घड्याळाकडे परत परत पाहत होता

फरक तात्कालिक असेल, असा त्याचा होरा होता. दया कोणा पार्टीचे काम करते, त्यांच्या रात्री मीटिंग होतात व त्या रात्री, कधीकधी अडीचपर्यंत चालतात ह्याची त्याला कल्पना नव्हती. दयाच्या पार्टीची हीच तर खुबी होती. कित्येक गोपी पार्टी-मीटिंग्जना येत व रात्री उशीरापर्यंतच नव्हे, रात्रीच्या रात्री थांबत; पण त्यांच्या गोपानाही त्याची कल्पना नसे! आता ज्याची गोपांना कल्पना नव्हती त्याची कल्पना गोपाळाला कशी यावी ?

'काय झाले असेल बुवा आज ह्या गोपीना ?' पेंद्याने चर्चेला तोंड फोडण्याच्या दृष्टीने विचारले. 'बाकी कोणी नाहीत तरी दया, क्षमा, शाती तरी यावयास पाहिजे होत्या. त्या आपल्या अगदी खात्रीच्या आहेत. त्यातल्या त्यात शांती तर फारच खात्रीची आहे!' पेंद्या दया, क्षमा, शांती कोणत्या अर्थी खात्रीच्या आहेत म्हणतो आहे, हे कृष्णाला पण माहीत होते. त्याच्या आठवणीने त्याचा जीव थोडा थोडा झाला व त्याने मोठा निश्वास टाकला!

कृष्ण काहीच बोलत नाही म्हणून पेंद्या पुढे बोलू लागला. 'हल्ली त्या मध्यपूर्वेत शेकड्याने लोक जाताहेत. आपले दुबाई, मसकत, कुवेट वगैरे भागात. वैद्यमंडळी, घर बांधणारे गवंडी, नकाशे काढणारे, सुतारकाम करणारे, अगदी धोबीसुद्धा जात आहेत म्हणे. त्या गावातून खूप पगार मिळतो म्हणे तेथे व खूप गोष्टी फुकट मिळतात!' पेंद्याचे जगाबद्दलचे ज्ञान अगदी अद्ययावत होते.

'तसे नसेल,' कृष्ण मोठ्या खात्रीने म्हणाला, 'एक तर त्या भागातून यमुनेसारख्या नद्या नाहीत व ह्या गोपीना यमुनेवर आघोळ करायची इतकी चटक लागली आहे की, त्यांना तेथे जीवन जगणे अवघड जाईल व वर बुरखा घालायला लागेल!'

'तेही खरेच म्हणा.' पेंद्या आपल्या आवडत्या पुढाऱ्याशी सहमत होत म्हणाला, 'मग कदाचित काँग्रेस (आय)मध्ये दाखल होण्याकरता इंदिरा-प्रस्थेला गेला असतील!' हल्ली पेंद्या दिल्लीला दिल्ली किंवा इंद्रप्रस्थ न म्हणता, जास्त अर्थवाही नाव म्हणजे इंदिरा-प्रस्थ म्हणत असे!

'ते कसे शक्य आहे?' कृष्ण परत तेवढ्याच खात्रीने म्हणाला, 'काँग्रेस आय म्हणा, काँग्रेस माय् म्हणा, त्यात सामील व्हावयाचे म्हणजे माणूस मोठा धीराचा असावयास पाहिजे! असा साधा-सुधा धीर नाही, चांगला महिनोन्महिने टिकणारा, बेडेकराच्या लोणच्यासारखा! आणि येथे गोपीना पाच मिनिटे धीर धरवत नाही. जरा मी कोठे दिसलो नाही की डॉ. प्रभा अत्रेची 'कोन गली गयो शाम' ही वीस मिनिटाची एल. पी. लावतात! त्या काय जातात काँग्रेस आयमध्ये ?'

'तेही खरंच म्हणा', पेंद्या परत आपल्या पुढाऱ्याशी सहमत होत म्हणाला. पेंद्याचे एक धोरण होते. कृष्णाशी बोलताना तो नेहमी सुरुवात 'तेही खरंच म्हणा' ह्या वाक्याने करत असे. मघाशी म्हटलं ना, फट म्हणता ब्रह्महत्या व्हावयाची! तेव्हा नेहमीप्रमाणे 'तेही खरंच म्हणा' असे म्हणून पेंद्या पुढे म्हणाला,

'मग मला वाटते मुबईच्या मंत्रिमंडळात बदल वा वाढ होणार आहे! त्याबाबत कोणातर्फे तरी मुमंकडे वजन टाकायला गेल्या असतील. ह्यांचे वजनही चागले आहे व आज-काल गोपीच्या वजनाला भाव पण चागला आहे म्हणे!'

आता मात्र कृष्णाचा संयम सुटला. अर्जुनाला सहा रिपूवर विजय कसा मिळवावा हे अठरा अध्यायांत सागणारा श्रीकृष्ण क्रोधरिपूच्या आहारी गेला. तो क्रोधरिपूच्या आहारी गेल्यामुळे पेंद्याला म्हणाला, 'पेंद्या, तू अगदी पेंद्याच राहिला आहेस बघ! अरे खुळ्या, वाढ मुंबईच्या मंत्रिमंडळात व्हावयाची असली तरी त्याच्याकरता मुबईला जाऊन काय उपयोग? त्याच्याकरता तू म्हणतोस त्या इंदिरा-प्रस्थेलाच जायला पाहिजे. जेथे पिकते तेथे विकत नाही, तसे बनते तेथे खपत नाही! आयाती-गोष्टी कशा जपान-जर्मनीत बनतात व येथे येतात? तसे आता सगळी मंत्रिमंडळे इंदिरा-प्रस्थाला बनतात व मग बाहेर पाठवली जातात. आता कृपा कर आणि मौन धारण कर बघू!'.

पुढाऱ्याच्या आज्ञेप्रमाणे पेंद्याने कृपा केली व मौनव्रत धारण केले काय पण मौनव्रताचा प्रभाव सांगावा? इकडे पेंद्याने मौनव्रत धारण करताच तिकडे दूरवर दया, क्षमा व शांती येताना दिसू लागल्या. बापूंनतर बाबा व बाबानंतर मौनाचा इतका यशस्वीरीत्या उपयोग झाल्याचे उदाहरण फक्त पेंद्याचेच असावे!

दूरवरून ठुमकत ठुमकत येणाऱ्या गोपी-दया, क्षमा व शांतीच आहेत, हे पाहिल्यावर पेंद्याचा आनंद गगनात मावेना, तो मोठ्याने व मोठ्या आनंदाने ओरडला, 'हमारी नेता...' तेवढ्यात कृष्णाने त्याच्या तोंडावर हात ठेवून त्याचे तोंड बंद केले. हल्ली कोणालाही गगनात न मावणारा आनंद झाला की, ते 'हमारी नेता...' म्हणून जयजयकार करतात हे पेंद्याने पाहिले व ऐकले होते. कृष्णाने आपल्या तोंडावर हात ठेवून आपल्याला भाषणबंदी का करावी हे त्याला कळेना. त्याला आपल्या लाडक्या व एकमेव पुढाऱ्याविरुद्ध मोठ्याने बोलणे पण शक्य नव्हते. म्हणून तो पुटपुटत म्हणाला, 'मी काही हमारा नेता...म्हणत नव्हतो. मी सर्वांसारखाच 'हमारी नेता' म्हणत होतो.' त्या पुटपुटण्यातही त्याने 'हमारी' वर जोर दिला होता. मग कृष्णानेच त्याचे कारण सागितले. तो म्हणाला, 'पेंद्या, आज गोपीनी आपला वा आपली नेती बदलली आहे. बघ, म्हणजे काही तरी भानगड आहे, हे सरळ काम नव्हे.'

पेंद्या बघतो तो काय? खरेच नेहमी सगळ्यात पुढे जी शाती असावयाची तिच्याऐवजी आज चक्क दया होती व त्यांच्या ठुमकत ठुमकत चालण्यातही लढाईवर निघालेल्या सैनिकांचा साज होता; पण पेंद्याने ह्या बारीक तपशिलाकडे लक्ष दिले नाही. मुख्य तत्त्व म्हणजे, गोपी व त्याही त्यांच्या खात्रीच्या दया, क्षमा व शाती आल्या होत्या. पेंद्या त्याच आनंदात होता. आता त्या तिघीजणी जवळ आल्या होत्या.

'चल कृष्णा, आता वेळ वाया घालवू नकोस. आधीच कोण उशीर झाला आहे! पोटातल्या कावळ्याना काव काव करण्याचे त्राण राहिलेली नाही. चल त्यांना अडवू! त्याच्या दुधा-दह्यावर तुटून पडू!' पेंद्या धाई-गर्दीला येऊन म्हणाला.

पेंद्याला तसे उतावळे होणे शोभणार असले तरी कृष्णाला ते तसे नव्हते. जनतेने एक वेळ उतावळेपणाने काही केले तरी चालते; पण पुढाऱ्याने तसे करून चालत नाही. त्यातून कृष्ण म्हणजे जगप्रसिद्ध अंतरज्ञानी होता! येथे मर्यादित अर्थाने बोलावयाचे, तर गोपीमध्ये व त्याच्यात कमी वा जास्त अतर असले तरी त्यांच्या मनात

काय आहे हे त्याला चटकन कळत असे.

'थांब. असा उतावळा होऊ नकोस!' कृष्ण उवाच. 'आजचा गोपीचा रंग काही नेहमीचा नाही; म्हणजे वेगळा आहे. एक तर समजूतदारपणाचे प्रतिक असलेली शाती आज त्याचे नेतृत्व करत नाहीयाय. आज त्यांचे नेतृत्व करते आहे सर्वांगीण बदल झालेली दया! जसे लाल रंगाच्या देशातून नेता बदलला की सगळेच्या सगळे सरकार बदलते, त्या देशाचे धोरण बदलते, एवढेच काय त्या देशाचे ध्येयसुद्धा बदलते, त्याचप्रमाणे ह्या गोपींनी आपला नेता बदलला आहे म्हणजे, आता त्याचे ध्येय बदलेल, धोरण बदलेल, मार्गही बदलतील!'

'वहावा कृष्णा, अवघ्या चौतिसाव्या वर्षी काय हे तुझे धाडस, काय तुझी बुद्धिमत्ता, काय तुझी हुशारी. देवा, तू विसाव्या शतकात भारतात जन्माला आला असतास तर तुला शंकराचार्य, येशू ख्रिस्त, भगवान बुद्ध वगैरे किताब हिंदुस्थानात ज्याला सगळ्यात जास्त माहिती आहे व त्या माहितीचे जो प्रसारण करत असतो त्या थोर माणसाने दिले असते; पण हरकत नाही. मीही काही कमी नाही! मी तुला हे किताब देतो व तेसुद्धा अगदी खऱ्या अंतःकरणाने. तुझ्या मंत्रिमंडळातले माझे पद टिकावे म्हणून नव्हे!'

आता गोपी म्हणजे दया, क्षमा व शाती खूप जवळ आल्या होत्या; पण कृष्णाकडल्या कँपची काही हालचाल दिसेना. ते अडवणार आहेत, अत्याचार वा अन्याय करणार आहेत अशीही चिन्हे दिसेनात. एखादा मोर्चा काळ्या घोड्यापर्यंत यावा व तेथे आपल्याला अडवतील ह्या आशेने पुढाऱ्यांनी पुढले बेत रचले असावेत; पण प्रत्यक्ष काळ्या घोड्याजवळ काळे पोलीस नसावेत व काळा घोडाही नसावा, म्हणजे त्या मोर्चा काढणाऱ्या पुढाऱ्यांची जशी स्थिती होते, तशी दया, क्षमा, शाती ह्यांची झाली.

'आता काय करायचं ग दया?' शांतीने विचारले. दयाच्या बदललेल्या मार्गाविषयी हिला संशय होताच. आतापर्यंत शाती पुढारी असल्यामुळे सगळे प्रश्न शातीने सोडवावेत, असे द्विअर्थी म्हटलं जायचे. भारताने जसे शेजार-पाजाऱ्याशी सगळे प्रश्न शातीने सोडवले आहेत, त्याचप्रमाणे गोकुळातल्या गोपींचे सारे प्रश्न शातीने सोडवले होते. त्यामुळे तिला दयाच्या मार्गाविषयी संशय व उत्सुकता होती.

कृष्ण आतरज्ञानी होता, हे मघाशी ओघाओघात सांगितले आहेच. त्याला त्या ज्ञानाने लगेच कळले की, आतापर्यंत शातीच्या पुढारीपणात सगळे प्रश्न शातीने सोडवले जावयाचे; पण आता दया पुढारी झाल्यापासून खूप फरक पडणार होता. आता ह्यापुढे कोणालाही दया, माया दाखवली जाणार नव्हती. एक वेळ प्रश्न सुटले नाहीत तरी चालेल, पण लढा चालला मात्र पाहिजे, असे पुढारीपण आता तयार झाले होते व दया आता तसाच लढा चालवणार, हे कृष्णाने ओळखले.

'आता काय ग करायचे दया?' शातीचाच प्रश्न आता क्षमाने विचारला होता. आता तीपण शांतीसारखीच टेकीला आली होती. खरे म्हणजे आता दया पण थोडी बावचळली होती; पण पुढारीच बावचळला म्हणजे काय होते, हे तिने जनता पक्षाच्या औट घटकेच्या राज्यात पाहिले होते. तेव्हा ती आपल्या सख्यांना म्हणाली, 'हे बघा, हा कृष्ण मोठा आपमतलबी आहे, लबाड आहे, धोकेबाज तर आहेच आहे. म्हणजे पुरुषांचे सगळे गुण असलेला आहे. तेव्हा त्याच्या शातपणे उभे राहण्यावर तुम्ही जाऊ नका. असे शातपणे उभे राहण्यात त्याचा काही डाव असेल!'

आता गोपी, कृष्ण व पेंद्या उभे होते तेथे आल्या होत्या. कृष्ण त्यांच्या रस्त्यात आडवा नाही, पण उभा आला व त्यांना अतिशय आदराच्या स्वराने म्हणाला, 'तुम्हाला जर अपमान वाटणार नसेल तर वा आपल्यावर अन्याय होतो आहे असे वाटणार नसेल तर, मला तुमच्या मडक्यातून व घड्यातून काय आहे ते बघू द्याल का?'

हे ऐकून शांतीने व क्षमाने अहिंसक पद्धतीने का होईना, पण कृष्णाने अडवले म्हणून मोठा निश्वास टाकला; पण त्याच वेळी दया मोठा श्वास घेऊन म्हणाली, 'हे बघ कृष्णा, तुला कोणी काही म्हणत असोत, मी तुला चक्क अरे-जारे म्हणणार!'

'अग दया, आज-काल पति-देवालासुद्धा बायका अरे-जारे म्हणतात, तेथे माझ्यासारख्या साध्या देवाला कोण अहो-जाहो म्हणणार? माझी काही हरकत नाही. अरे-जारे म्हणून घ्यायला मी काही हा 'प्रेस्टिज इश्यू' होऊ देणार नाही!'

आपला पहिलाच मुद्दा कृष्णाने बिनबोभाट स्वीकारल्याचा दयाला खूप आनंद झाला. त्यामुळे तिचे शांतीकडे व क्षमाकडे असलेले 'प्रेस्टिज' पण वाढले; त्या वाढत्या प्रेस्टिजमध्येच ती कृष्णाला रोखठोकपणे म्हणाली, 'कृष्णा, आम्हाला इतके शतकेन्शतके अडवत आलास. आमचे दूध, दही, लोणी लुटलेस व आता वर आम्हालाच विचारतोस की, आम्हाला अपमान वाटणार नसेल तर... वा आमच्यावर अन्याय होणार नसेल तर घडे व माठ पाहू द्याल का म्हणून? हो, वाटतो आहे आम्हाला अपमान. वाटत आहे की, आमच्यावर अन्याय होतो आहे म्हणून. मग काय म्हणणं आहे तुझं?'

'मी काय म्हणणार बापडा?' कृष्ण बापडेपणे म्हणाला.

'बघितलंत कसा लढ्याच्या पहिल्याच ह्याला बळी पडला कृष्णाचा अहंभाव!' दया मोठ्या आनंदाने म्हणाली. क्षमा व शाती बघू लागल्या. लढ्याच्या ह्या पहिल्या विजयामुळे त्यांना दयाविषयी, दयाने चोखाळलेल्या मार्गाविषयी व मुख्य म्हणजे दयाच्या पार्टीविषयी खूप आदर निर्माण झाला होता. कोठल्याही विषयाच्यावेळी पार्टीचे लोक ओरडतात तसे त्या आनंदाने ओरडल्या, 'हुर्रा, हुर्रा!'

नाटकात विनोदाला प्रेक्षक हसले की, त्याचे हसणे थांबेपर्यंत जसे नटलोक थांबतात, तसे त्याचे हुर्रा, हुर्रा म्हणून ओरडणे होण्याचे थांबेपर्यंत कृष्ण थांबला. त्यानंतर तो नाटकात स्वगत म्हणतात, पण सगळ्यांना ऐकू जाते तसे स्वगत म्हणाला, 'आम्हा पुरुषांचे, त्यातल्या त्यात माझे नशिबच असे आहे. मी काही करायला गेलो की, लोक त्यात काही तरी काळंबेरं आहे असे म्हणतात. मी काही म्हटलं की, त्याचे वेगवेगळे अर्थ काढतात. आता साधं अर्जुनाला लढाई करायला उत्साह यावा म्हणून दोन शब्द-म्हणजे गीता सांगि-

**आपला पहिलाच मुद्दा कृष्णाने बिनबोभाट स्वीकारल्याचा दयाला खूप आनंद झाला**

तेली तर त्याचे वेगळे वेगळे अर्थ अगदी बाळ गंगाधरांपासून तो बाबा माऊलीपर्यंत सगळयांनी लावले. मी कोणत्या अर्थी ह्या गोपींना अडवत होतो व ह्या गोपींना त्याच्यामागे माझा स्वार्थ दिसला, अन्याय दिसला, अत्याचार जाणवला !'

कृष्ण पुटपुटतो आहे, असं बघून शांतीला त्याच्याविषयी कणव आली. गीतेचे अठरा अध्याय धडाधडा म्हणणाऱ्या कृष्णावर अशी पुटपुटण्याची वेळ यावी हयाचे तिला फार दुःख झाले. त्या दुःखाने पाघळून ती म्हणाली, 'काय म्हणतो आहेस रे कृष्णा ?'

'बरं झाल नाटकातून संगीत गेल ते, नाही तर ह्या कृष्णानं ताना मारत 'नच सुंदरि करु कोपा' म्हणून तासन्तास गाऊन सुंदरीचा कोप आणखी वाढवला असता, '—क्षमा कृष्णाच्या बाजूने ! पण त्यात दयाला सुंदरी म्हणून म्हणण्याने काही जमते आहे का पहाण्याचे दृष्टीने म्हणाली,

'शट–अप', दया रागाने म्हणाली. हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळून व इंग्रजी शब्दांना प्रतिशब्द शोधण्याकरता इतकी मंडळे व महामंडळे नेमूनही नित्यात वापरायाच्या शट–अप वगैरे सारख्या शब्दांना प्रति–शब्द निघाले नसल्याने दयाला तो इंग्रजी शब्दच वापरणे भाग होत. परत एकदा शट–अप म्हणून तो क्षमा व शांतीला म्हणाली, 'काय पाघळता लोण्यासारख्या लगेच ! विसरू नका की, आपण लढा देण्याकरता उभ्या आहोत. आपण वज्रासारखे कठोर व्हायला पाहिजे. जरा कृष्ण पुटपुटला तर पाघळल्या लगेच.' मग दया कृष्णाकडे वळून म्हणाली, 'कृष्णा, तुला काय म्हणावयाचे आहे ते स्पष्टपणे म्हण व चांगले मोठयाने बोल! आमचा व आमच्या पार्टीच्या लोकांचा मोकळेपणाने बोलण्यावर श्रद्धा आहे. बोल तुला काय म्हणावयाचे आहे ते.'

'मी म्हणत होतो की, आतापर्यंत तुम्हाला अडवण्याभागे, तुमचे दूध–दही खाण्यामागे तुमच्यावर कोणत्याही तऱ्हेचा अन्याय करावा, तुमच्यावर बळजोरी करावी, तुमच्यावर पुरुषी सत्ता गाजवावी असा माझा काहीही हेतू नव्हता.'

'वा रे वा ! आणखी वर हे का ? तर मग अन्याय, अत्याचार वगैरे शब्दांचे अर्थच बदलायला लागतील.' आता साधीभोळी शांती पक्की बनत चालली होती.

'म्हणजे लोकशाही, भाषण–स्वातंत्र्य वगैरे शब्दांचे अर्थ वेळोवेळी बदलतात तसं !' क्षमा शांतीला दुजोरा देत म्हणाली.

पण दयाला चर्चा चालू ठेवावयाची होती. तो म्हणाली, 'बरे, मग आम्ही त्याला अन्याय नाही म्हणावयाचे तर काय म्हणावयाचे ? तसं म्हणल्यासारखी तुझी कृती होती का नव्हती ?'

'माझी कृती तशी होती हे एकदम मान्य; पण माझ्या नुसत्या कृतीवर जाऊ नका. त्यामागच्या माझ्या भावनेकडे पहा, माझ्या उद्देशाकडे पहा. तुमच्या पार्टीच पण लोक म्हणतात ना, का साधनाकडे पाहू नका म्हणून ?' कृष्ण.

साधना हा एकच शब्द, पण त्या एका शब्दाने त्या तीन गोपींच्या मनात तीन अगदी वेगवेगळया भावना निर्माण केल्या. शांतीने, साधना ? साधना तर बंद झाली आहे ना, असे विचारले. क्षमाने आता साधनाकडे काय पहायचे व न पहायचे, असं विचारले व वर म्हणाली की, 'मेरे मेहेबूब'पासून साधनाने सिनेमात काम करायचे सोडले आहे. आता ती खूप पिते म्हणे. आता काही दिवसांनी ती कामिनी कौशलसारखी चारित्र्यवान म्हणजे कॅरॅक्टर–रोल्स करू लागेल; पण असल्या नटयांना चारित्रवान कामात का पहावयाचे ? क्षमाने पूर्वी साधनासारखे केस कापून घेतले होते म्हणून तिला साधनाविषयी खास प्रेम व कोमल भावना होत्या.

दया मात्र कृष्णाच्या, 'तुमच्या पार्टीच्या तत्त्वाप्रमाणे साधनाकडे पाहू नका' हया वाक्याचा गंभीरपणे विचार करत होती. पार्टीचाच दाखला दिल्यामुळे त्याच्या म्हणण्याचा विचार करावा असे तिच्या मनाने घेतले. त्यामुळे तिच्या आवाजात थोडा मृदुपणा आला.

'काय भावना होत्या तुझ्या ? काय उद्देश होता आम्हाला अडवण्यात, आमचे दूध तपासण्यात, आमचे दही खाण्यात ?' दया विचारती झाली.

'मी अडवत होतो, तुमचे दूध–दह्याचे घडे तपासत होतो, दूध, दही खाऊन पहात होतो ते तुमच्या फायद्याकरता, तुमच्या भल्याकरताच !' हया आपल्या उत्तराने वादळ उठणार, हयाची कृष्णाला कल्पना होती, म्हणून तो शांतपणे पण ठामपणे म्हणाला.

'आमच्या फायद्याकरता आमच्यावर अन्याय व अत्याचार वा ! म्हणजे आपत्कार आणला तो जनतेच्या फायद्याकरता म्हणतात तसेच झाले की !' शांती म्हणाली. मघाशी म्हटले होते ना की, आता शांती वस्ताद बनत चालली होती म्हणून ?

'कृष्णा, ह्या तुझ्या करणीमुळे तुझे कौतुक झाले जगात; पण आमची बदनामी झाली! आमच्यावर काव्य रचली गेली, तमाशे लिहिले गेले, वग सजवले गेले. आमच्यावर अभिरुचीला सोडून विनोद केले गेले. अगदी सेन्सॉर होण्यालायक आणि वर म्हणतोस तुमच्या फायद्याकरता म्हणून ?' क्षमाही मागे राहणारी राहिली नव्हती.

'आमच्या चारित्र्यावर शिंतोडेच काय, घागरीच्या घागरी पाणी ओतले गेले. कोणीही गोपींबद्दल काहीही बोलावे अशी पद्धत पडत चालली. हा तुझ्या साधनाचा परिणाम ! त्यामागे आमचा कोणता फायदा करून देण्याचा तुझा हेतू होता ? काय उद्देश होते तुझे ?' दया कृष्णाचेच शब्द वापरून त्याला त्यात पकडण्याच्या दृष्टीने म्हणाली.

त्यावर कृष्ण म्हणाला, 'असे उन्हात उभे रहाण्यापेक्षा आपण कदंबवृक्षाच्या छायेत जाऊ व तेथे शांतपणे बसून चर्चा करू या.' छायेचे नाव काढताच सर्वांना थंडथंड वाटू लागले व त्या थंडपणातच कृष्णाचे म्हणणे सर्वांनी मान्य केले. तेथे गेल्यावर कृष्ण त्यांना म्हणाला, 'मी तुमचे मार्ग व वाटा अडवून तुमचे दूध, दही खात होतो वगैरे अगदी खरे. त्यामुळे तुमची जगात सर्व तऱ्हेची बदनामी पण झाली, हेही खरे आहे.'

मग त्याने गोपींच्या हे लक्षात आणून दिले की, धंद्याचा एक मान–बिंदू असतो. त्या त्या धंद्यातल्या लोकांना कोणी काही नावे ठेवली तरी चालतात; पण त्या मानबिंदूला कोणी हात लावलेला चालत नाही. आपला हा मुद्दा स्पष्ट करताना कृष्ण म्हणाला, 'आता असे बघा, सोनाराला बाकी कोणतीही बदनामी चालेल; पण तो सोन्यात भेसळ करतो असे कोणी म्हटले तर त्याचे सोने गरम करण्याकरता पेटवलेली आग त्याच्या मस्तकापर्यंत जाईल. त्याचप्रमाणे शिंपीबांधव बाकी सगळी बदनामी सहन करतील; पण ते कापड चोरतात म्हटल्यावर त्याचे हृदय कापडासारखे टरटरा फाटून निघेल ! त्याचप्रमाणे धोबीसमाज बाकी कोणतीही बदनामी सहन करेल; पण ते गिऱ्हाइकाचे कपडे वापरतात, असे कोणी म्हणाले तर तो समाज आपले डोके कपडे बडवण्याच्या दगडावर बडवून घेईल !'

कृष्णाने कोणता समाज वा कोणता बांधव, कोणती बदनामी सहन

करणार नाही ह्याची अशी काही लावण लावली की, आता ह्या अन्यायाला कसे तोंड द्यावे, असा दयाला प्रश्न पडला. सुदैवाने कृष्णानेच तो प्रश्न सोडवला. तो पुढे म्हणाला, 'तद्वतच गवळी बांधव व गवळणी-भगिनी बाकी कोणतीही बदनामी सहन करतील, त्यांच्या चारित्र्यावर शिंतोडे उडाले तरी चालवून घेतील, त्यावर वाईट-साईट तमाशे लिहिले गेले तरी चालतील; पण त्यांना कोणी दुधात पाणी घालणारे आहेत, असे म्हटले तर ते त्याना एका थेंबाने खपावयाचे नाही ! मला सांगायला अभिमान वाटतो की, गोकुळातल्या गौळणींना ह्या बदनामीपासून कोणी वाचवले असेल तर मी ! सांगा, जग बाकी वाटेल ते म्हणू दे; पण म्हणते कोणी अखिल जगतात की, गोकुळच्या गौळणी दुधात पाणी मिसळतात म्हणून ? सगळ्या तऱ्हेचे वाङमय वाचा. दलित, अदलित, ललित, अललित, अगदी गळित वाङ्मयातही तुम्हाला तसा उल्लेख सापडणार नाही !'

गोपींना कृष्णाचे म्हणणे पटत चालल्याचे त्यांच्या चेहऱ्यांवरून दिसू लागले. त्याच्या मनात आले, राधेविषयी इतके काही बोलतात. सासू-सासरे झोपले असता व नवरा बाहेर गेला असता ती कृष्णाला भेटायला जाते, त्याबद्दलही लोक बोलतात; पण राधेनेच काय पण गोकुळातल्या कोणीही गोपीनी दुधात पाणी घातल्याबद्दल कोणी संशयसुद्धा दाखवत नाहीत, हे खरेच होते; पण त्याचा व कृष्णाने अडवण्याचा व त्यांचे दूध-दही खाण्याचा काय संबंध होता हे त्यांना कळेना ! हे त्यांचे विचार त्यांच्या चेहऱ्यावरून कृष्णाच्या लक्षात आले. तेव्हा कृष्ण पुढे म्हणाला,

'आता स्वतःशीच थोडा विचार करा. बाकी जगातील सर्व गोप व गोपी दुधात पाणी मिसळण्याबाबत बदनाम असता तुमच्याबद्दलच असे कधी कोणी बोलत कसे नाही ?'

दया क्षमा व शांती स्वतःशीच थोडा विचार करू लागल्या; पण ह्या जगावेगळ्या गोष्टीचे कारण त्यांना सापडेना. तेव्हा आपण फड जिंकला आहे, कृष्णाच्या लक्षात आले व तो मोठ्या आनंदात म्हणाला, 'मी सांगतो तुम्हाला ह्या गोष्टीचे कारण. त्याचे कारण मी आहे व तुम्ही ज्याला अन्याय म्हणता, अत्याचार म्हणता ते आहे' गोपींचा चेहरा परत काही कळत नसल्यासारखा होत होता. परत कृष्ण पुढे म्हणाला, 'मी जे तुम्हाला अडवत होतो, ते तुमच्या दुधात, दह्यात, तुपात काही भेसळ आहे का हे पाहण्याकरताच ! आता माझ्याकडे नगरपालिकेच्या अधिकाऱ्यासारखे भेसळ मोजायचे यंत्र आहे का ? नाही ना ? मग मला तुमच्या दुधात भेसळ आहे हे दूध प्यायल्याशिवाय कसे कळणार होते ? आनंदाची व अभिमानाची गोष्ट अशी की, तुमच्यापैकी कोणाच्याही दुधात मला कधीही भेसळ आढळली नाही. आता एखाद्या गोपीच्या दुधात पाणी मुरतंय असा संशय जरी आला तरी मी तिचे माठ फोडून टाकत असे !

'मग तुमचा माझ्याबद्दल असा गैरसमज कसा झाला ? माझ्या उदात्त हेतूबद्दल तुमच्या मनात असा कुसंशय कसा निर्माण झाला ? तर त्याला कारण म्हणजे विरोधी पक्ष, त्यांचा खोटानाटा प्रचार हाच होय.' आता कृष्णानेच 'कृष्णार्पणमस्तु' सारखे सगळे विरोधी पक्षाला बहाल केल्यावर पुढे बोलावयाचे काही राहिलेच नाही ! आता फक्त ठराव मताला टाकायचा होता.

तेवढ्यात दया म्हणाली, 'कृष्ण म्हणतो त्यात थोडे तथ्य आहे, अगदीच नाही असे नाही. पण परत हा प्रश्न पार्टीच्या बैठकीत माडल्याशिवाय व पार्टीने लढा मागे घेण्याचा आदेश दिल्याशिवाय आता लढा मागे घेता येणार नाही !'

'म्हणजे रात्री अडीचपर्यंत येथेच थांबावयाचे की काय ? ह्या कदंबाच्या छायेत ? म्हणजे मज्जाच येणार म्हणायची की !' शांती मोठ्या आनंदात म्हणाली.

'पण पार्टी मीटिंगला येते तशी मजा येथे कशी येणार ?'—अर्थात हे क्षमा म्हणाली.

पण कृष्णाला हा प्रश्न लांबणीवर टाकावयाचा नव्हता. गोपींनी रात्री अडीचपर्यंत येथे थांबणे, सामाजिक व वैयक्तिक शांततेच्या व सुरक्षिततेच्या दृष्टीने कसे धोक्याचे आहे ते त्याने समजून सांगितले व पार्टीच्या मीटिंगशिवाय दुसरा काही मार्ग नाही का काढता येणार, ह्याची विचारपूस करू लागला.

'आमच्या पार्टीचे असे आहे', दया उत्तरादाखल सांगू लागली, 'जर येथे काही मार्ग निघत नसेल तर बिळघा-भोपळघाच्या देशात काय करतात ते बघायचे व तसेच येथे करावयाचे !'

'पण बिळघा-भोपळघाच्या देशातले मार्ग आपल्या गाई-बैलांच्या देशाला सोयीचे नसतील तर ?' पेंद्या अगदी न राहवून बोलला.

'अगदी तरीसुद्धा !' दया अगदी ठामपणे म्हणाली. कारण पार्टीचे पुढारीसुद्धा बिळघा-भोपळघाच्या देशाबाबत असाच ठामपणा दाखवत.

'पण दयाताई, त्यात एक मोठी अडचण आहे बघा. प्रथम बिळघा-भोपळघाच्या देशात गोपी आहेत की नाही, हे कुणाला माहीत नाही. बरं, गोपी असल्या तरी तेथे कृष्ण आहे की नाही ? बरं गोपी व कृष्ण असले तरी त्यांच्यावर अन्याय होतो की नाही ? बहुधा होत नसणार. कारण बिळघा-भोपळघाच्या देशात अन्याय हा शब्द शब्द-कोशातही नाही, ह्याच फक्त एक अन्याय तेथे आहे म्हणे. मग त्याचा मार्ग येथे कसा उपयोगी पडणार ?' बिळघा-भोपळघाच्या देशाच्या कृष्णाने केलेल्या कौतुकाने दया सुखावली होती. कृष्णाची व पार्टीतल्या थोर पुढाऱ्यांची बिळघा-भोपळघाच्या देशातल्या अन्यायाबाबतची मते इतकी मिळतीजुळती आहेत, हे बघून दयाला आनंद वाटला. त्या आनंदात ती काही बोलली नाही.

'पण मग आता काय करावयाचे? ताबडतोब काही तरी ठरवलेच पाहिजे !' पेंद्या, क्षमा व शांती घाई भावनेच्या आहारी जाऊन म्हणाले. जनता पुढाऱ्यांनी निर्णय घ्यावयास भाग पाडले ते असे.

'मी एक सुचवू का ?' कृष्णाने मनाशी निर्णय घेतला होता; पण तो दयाने घेतला आहे असे दाखवणे भाग होते. त्यामुळे मी अमुक एक ठरवले आहे, म्हणण्यापेक्षा मी काही सूचवू पहात आहे, असे म्हणणे हितकारी होते.

'हो, सांग की !' दया म्हणाली. तिलाही काही मार्ग सुचत नव्हताच व कृष्णाने मार्ग दाखवला तर त्याला हो म्हणावयाचे व सगळे श्रेय आपल्याकडे घ्यावयाचे, असा तिचा हेतू होता.

'तुमच्या पार्टीची मीटिंग होईपर्यंत व त्यांचा काही निर्णय होईपर्यंत आपण जैसे थे चालू ठेवावयाचे. म्हणजे तुम्ही नेहमीप्रमाणे दूध, दही घेऊन येणार. मी नेहमीप्रमाणे अडवणार, तुमच्यावर अन्याय करणार, वेळ पडली तर बळजबरी पण करणार ! नेहमीप्रमाणे तुमचे दूध व दही खाऊन पहाणार आणि हे सर्व तुमच्या फायद्याकरता, तुमची बदनामी टळावी म्हणून !. तुमचा मानबिंदू शाबूत रहावा म्हणून ! चालेल दयाबाई तुम्हाला ?'

'चालेल पण तरीही आमचा लढा चालू राहील!' दया म्हणाली. कृष्णाच्या मायावी बोलण्याने ती फसून जाणारी नव्हती.

'हो, हो लढा चालू ठेवायला काहीच व कोणाचीच हरकत नाही !' कृष्ण बाजी जिंकल्याच्या आनंदात म्हणाला. पेंद्या, क्षमा व शांतीला प्रश्न असा सामोपचाराने मिटल्याबद्दल, पण त्याच वेळी लढा पण चालू राहिल्याबद्दल मनापासून व तनापासून आनंद झाला व आनंदात ओरडले, 'हमारी नेता—दयामाता, हमारी नेता दयामाता !' □

# कोलारकरांचे संग्रह

## आणखी जागरुकता हवी !

मराठी साहित्यात संख्यात्मक विचार केला असता सर्वाधिक निर्मिती जरी काव्यप्रातात होत असली, तरी संख्यात्मक आणि गुणात्मक निकष वापरले तर कथाविश्वच अधिक विपुल आणि समृद्ध असल्याचे आढळून येते. श्री. राम कोलारकर व सौ. छाया कोलारकर यांनी ही गोष्ट हेरून मराठी साहित्याच्या या दालनाची मोठीच सेवा चालविली आहे. दरवर्षी प्रसिद्ध होणाऱ्या हजारो कथा वाचून त्यातून मोजक्या सर्वोत्कृष्ट कथा निवडण्याचे आणि त्या जाणीवपूर्वक पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्याचे काम त्यानी अव्याहतपणे एखाद्या व्रतासारखे चालविले आहे. मराठी कथाचा वाचक त्यांच्या या कार्यामुळे त्यांचे ऋणी रहातीलच; पण जे नवे दर्जेदार कथालेखक या दालनात उमेदीने उतरत आहेत, त्यांना मिळणारे प्रोत्साहन व दिलासाही अपूर्व आहे.

कोलारकर दापत्याने नुकतेच प्रसिद्ध केलेले ' सर्वोत्कृष्ट मराठी कथा, ' खंड १२ आणि खंड १३ हे या म्हणण्याची प्रचीती आणून देण्यास पुरेसे समर्थ आहेत. १९७५ व १९७६ या दोन वर्षांत प्रसिद्ध झालेल्या सुमारे नऊ हजार दोनशेपंचवीस कथातून निवडलेल्या तेवीस कथा या दोन खंडांतून आपल्याला वाचावयास मिळतात. या तेवीस कथापैकी अकरा कथांचे लेखक सर्वोत्कृष्ट मराठी कथांच्या या मान्यताप्राप्त खंडात प्रथमच प्रवेश करीत आहेत; म्हणजे जवळ-जवळ पन्नास टक्के लेखक नवे आहेत. या सर्वांकडून मराठी कथावाचक आता अधिक अपेक्षा बाळगू शकेल आणि अधिक उभारीने हे लेखक कथालेखन करतील, असे मानण्यास त्यामुळे जागा निर्माण झाली आहे.

खडाच्या संपादकीयात जी माहिती दिली आहे त्यावरून एक चिंतेची बाबही नजरेला येते. सर्वोत्कृष्ट कथानिर्मितीमध्ये लेखिकांचे प्रमाण प्रतिवर्षी घटते आहे आणि ही घट लक्षणीय आहे. १९७४, १९७५ व १९७६ या चार वर्षांतील हे प्रमाण अनुक्रमे ५६, ४६, २८ आणि २५ टक्के अशा उतरत्या भांजणीने कमी होत आले आहे. एकीकडे स्त्रियाचे अनुभवविश्व अधिकाधिक रुंदावत असताना साहित्य–निर्मितीतील त्याचा दर्जा घसरावा, ही तर अधिकच चिंतेची बाब आहे. तेराव्या खडात लेखिकाचे प्रमाण २५ टक्के आहे; म्हणजे अवघ्या चार लेखिकाना त्यात स्थान मिळाले आहे; त्यातही अरुणा अंतरकर या एकमेव लेखिकेला या खंडात प्रथमच स्थान मिळाले आहे. प्रथम अरुणा अंतरकराचे अभिनंदन ! कारण आपली मनोहर अभिव्यक्ती घेऊन अजूनही नव्या लेखिका पुढे येत आहेत, हे त्याच्या या खंडातील प्रवेशामुळे सिद्ध झाले आहे.

स्त्री–लेखिकाची ही शोकातिका केवळ कोलारकरानाच भावली आहे असे नव्हे; अलीकडेच डॉ. भालचंद्र फडक्यांनीही स्त्रियाच्या लेखनावर ताशेरे ओढलेच होते. (स्त्री–लेखिका–चिंता आणि चिंतन) फडक्याच्या या मतावर खूप वादविवाद झाला आणि काही मंडळींनी तर त्यांना स्त्री–द्वेष्टेही म्हणून घेतले; परंतु कोलारकराचा गेल्या चार वर्षांतला अनुभव फडक्यांच्या म्हणण्यालाच दुजोरा देतो एवढे मात्र खरे !

कोलारकरांची निवड पूर्णपणे निर्दोष आहे, असे म्हणता येत नाही; पण स्त्री–लेखिकाना त्याचा फारसा फायदा मिळेल असेही नव्हे; आणि येथे स्त्री–लेखक, पुरुष–लेखक असा प्रमुख भेद करून त्यावर वाद करण्याचा इरादाही नाही. या दोन खंडांच्या निमित्ताने मराठी कथेच्या ताज्या वाटचालीकडे थोडे-फार पहाता आले तर ते अधिक श्रेयस्कर ठरेल. मर्यादा अर्थातच कोलारकरांच्या निवडीच्या माध्यमाची !

कोलारकरानी निवडलेल्या कथा जर सर्वोत्कृष्ट मानावयाच्या असतील तर मराठी कथाकारांची नावाजलेली पिढी आता जणू अंतर्धान पावली आहे की काय, असा प्रश्न मनात उभा राहिल्याखेरीज राहणार नाही. व. पु. काळघाचे तर कोलारकराना वावडेच दिसते; पण जी. ए. कुलकर्णी, आनंद यादव, व्यंकटेश माडगूळकर, श्री. ज. जोशी, बाळ गाडगीळ, शंकर पाटील, द. मा. मिरासदार आदी अनेक प्रज्ञावंताची प्रतिभा आटली तर नाही, अशी शंका हे संग्रह पाहिल्यावर उभी रहाते.

यातील काही नावाच्याबाबतीत ते सत्यही आहे. प्रा. आनंद यादव कथाक्षेत्रातून जवळ-जवळ निवृत्त झाले असून त्यानी इतर प्रांतांत गती वाढवली आहे व. पु.ही आता कादंकरीकडे अधिक लक्ष देऊ लागले आहेत; पण जी. एं चं काय ? बाळ गाडगीळ, शंकर पाटलांचं काय ? त्यांच्या कथाचा दर्जा खरो-खरच एवढा घसरला आहे काय ?

ही वस्तुस्थिती म्हणून आपण मान्य करणार असू तर गोष्ट वेगळी; पण त्यांच्याहून अधिक दर्जेदार प्रतीचे लिखाण नवे लेखक करीत आहेत, असे तरी म्हणता येईल काय, हा खरा प्रश्न आहे. या प्रश्नाचा विचार करताना या दोन खंडात समाविष्ट झालेल्या नव्या अकरा नावांचा आणि त्यांच्या कथांचा विचार महत्त्वाचा आहे,

प्रथम खंड बारामध्ये समाविष्ट झालेल्या नावाचा विचार करू. प्रा. गंगाधर गाडगीळ हे त्यातलं प्रमुख नाव त्यांची ' आजकालची गोष्ट ' ही पैंजणच्या ७५च्या दिवाळी अंकातली कथा या संग्रहात समाविष्ट केलेली आहे. गाडगिळाची कथा सर्वोत्कृष्ट कथात समाविष्ट झाली, यात आश्चर्य काहीही नाही. आश्चर्य वाटते ते आतापर्यंत त्यांना या संग्रहात स्थान मिळाले नाही याचे आणि गाडगिळांच्या एकाहून एक सरस कथांमध्ये हीच गोष्ट कोलारकराना सर्वोत्कृष्ट वाटली याचेही ! वातावरणनिर्मिती, मोजक्या, साध्यासुध्या शब्दात आशय मांडण्याचं कसब ही तिची वैशिष्टयं; पण यापलीकडे काय ? काळजाला भिडून तिथे आशय रुजावा असं सामर्थ्य या कथेत नाही; असं सामर्थ्य असलेल्या कथा गाडगिळांनी अगणित लिहिल्या आहेत कथा-निवडीत कोलारकर कमी पडले हेच खरं !

दुसरी कथा शांताराम यांची. 'सत्यभामा'. (माहेर–दिवाळी ७५). ही कथा वास्तविक सत्यभामेची नव्हे. ती अनंतरावांची. त्यांच्याच कार्यकर्तृत्वाचं विश्लेषण करणारी. सत्यभामा हे निमित्त. ती अनंतरावाची गोष्ट आहे. सत्यभामेची नव्हे; पण शीर्षकातच फसलेली ही कथा या संग्रहात समाविष्ट झाली आहे!

रत्नाकर पटवर्धनांची 'मोक्षप्राप्ती' (संदर्भ–मे ७५) मात्र खरोखर चांगली कथा. उत्कृष्ट वातावरणनिर्मिती, प्रसंगांची सुरेख गुंफण, आशयाला पूरक अशी माडणी आणि व्याजोक्तीने नेमके लक्ष्य साधण्याची हातोटी पटवर्धनांच्या या कथेत आढळून येते.

ना. बा. ठेंगडीची 'त्या' ('तरुण भारत' दिवाळी ७५) ही दोघांतील अव्यक्त ओढीचे धागे दाखवणारी कथा. येथे लेखकाला वाचकापर्यंत पोहोचविण्यासाठी खास बाब सागावयाची काही दिसत नाही. दोघांच्या मानसिकतेचे फक्त वर्णन; पण त्यातही तपशिलाच्या अनेक जागा तशाच राहून गेलेल्या. अशा कथाना आवश्यक असणारा भाषेचा दिमाखदार फुलोराही नाही. लालित्याच्या छटा जणू दिसू नयेत, याचीच खबरदारी घेणारी सरळसोट भाषा. ही कथा संग्रहात कशी समाविष्ट झाली, हे खरोखर गूढच!

अशोक माहीमकराची 'गोठ्यात बांधलेलं वासरू' ('मागोवा' डिसेंबर ७५). कथा म्हणून चांगली आहे; पण सर्वोत्कृष्ट कथात ती कशी समाविष्ट होते, ते कोलारकरच जाणोत! कोलारकराची आवड लक्षात घेता, त्यांना आवश्यक ती पथ्ये माहीमकरांनी पाळलेली दिसतात. छोटी छोटी सुबक वाक्ये, आटोपशीरपणा, थोडासा व्यक्त-अव्यक्तपणा, पुरेसा वेग. मात्र भाषेच्या सौंदर्याला फारसे स्थान नाही!

## नवी सहा नावे

तेराव्या खडात शातिलाल भंडारी (उकल–'प्रसाद' दिवाळी ७६), वसंत मिरासदार (मुक्याचा मूकनायक कसा झाला–'मोहिनी' सप्टेंबर ७६) नरेश (लॉंग वे टु गो–'तन्मय' दिवाळी ७६) केशव मेश्राम (बाडगूळ–'सुगंध' दिवाळी ७६), चद्रकात वर्तक (भित–'रसिक' दिवाळी ७६) आणि अरुणा अंतरकर (बंदिनी–'हंस' जून ७६) यांची नावे नव्याने समाविष्ट झाली आहेत.

या सहा जणातील शातिलाल भंडारी, केशव मेश्राम व वसंत मिरसदार वगळता बाकी तिघांच्या विषयांचं वेगळेपण हे एक वैशिष्टच आहे. अरुणा अंतरकरांची 'बंदिनी' वळणावरच्या वाटा चोखाळतच जाते; पण तिचा शेवट आपला वेगळेपणा सिद्ध करतो. आशयाची खोली, सुरेख भरतकामासारखे बारीक-सारीक तपशील, भाव-भावनांची आवर्तनं आणि प्रत्यावर्तनं त्यांनी छान दाखवली आहेत. नरेश यांच्या 'लॉंग वे टु गो'-मध्ये उभा केलेला शीत-संघर्षही मनोहर आहे. चंद्रकांत वर्तकाच्या 'भित'मधील साध्या सोप्या भाषेतील भावुकता आणि हळूहळू मन विटत जाणारी वेदना ठाशीव आहे; पण शांतिलाल भंडारी यांची 'उकल' पारंपारिकच आहे. तिची मांडणी चांगली असली तरी संघर्ष उथळ वाटतो. ती आशयगर्भ असली तरी विनाकारण क्लिष्ट केली आहे. ज्या श्रेणिकमहाराजांनी पापांच्या राशी उभारल्या आहेत, त्यांचे हृदयपरिवर्तन इतक्या सहजी होईल, हे पटत नाही. प्रश्न मांडून त्याची उत्तरेही दिली म्हणजे प्रश्नाची 'उकल' होत नाही. त्याला तसेच जबरदस्त समर्थन लागते. ते समर्थन या कथेत आढळत नाही.

केशव मेश्रामांची 'बांडगुळ' तर अगदी मळलेल्या वाटा तुडवीत तुडवीतच जाते. यापूर्वी येऊन गेलेल्या अनेक ग्रामीण चित्रपटाच्या साच्याची हीच तर कथा होती. ग्रामीण पुढारी हा असाच तर होता! मेश्रामांनी नवे, वेगळे काय केले? ना भाषेचा नवा बाज, ना रचनेतलं वेगळेपण, ना आशयात फरक, ना विषयात फरक, कोणत्याही गावगुंड पुढाऱ्याची वर्षानुवर्षं रंगत आलेली, चावून चोथा झालेली कथा! पण कोलारकराना ती सर्वोत्कृष्ट वाटल्याने आपल्याला वाचलीच पाहिजे!

वसंत मिरासदाराच्या 'मुक्याचा मूकनायक कसा झाला' या कथेला सर्वोत्कृष्ट म्हणणे म्हणजे तर निव्वळ विनोद आहे. विनोदाचा काडीमात्रही परिपोष नसलेली ही विनोदी कथा! कल्पनादारिद्र्याची तर ही कथा म्हणजे कमाल मर्यादा आहेत. ही वाचत असताना गुदगुदल्या केल्या तरी हसू येणार नाही, इतका सुमार आणि बालिश विनोद इथे आहे. ही कथा जर सर्वोत्कृष्ट म्हणावयाची असेल, तर अशा कथा न लिहिल्या गेल्या तरच मराठी कथा-साहित्याची अधिक सेवा घडल्यासारखे होईल!

एकूण या अकरांपैकी किमान सहा कथा 'सर्वोत्कृष्ट' म्हणताना दहादा विचार करावा लागेल, असे दिसते. याचाच अर्थ, नवे लेखक जुन्यांची जागा घेण्याइतके समर्थ आहेत असं म्हणता येणार नाही. त्यामुळेच एकूण कथाविश्वाचा दर्जा वाढण्याऐवजी खालावतो आहे, ही नामुष्कीची गोष्टच कोलारकरांचा संग्रह प्रमाण मानला तर सिद्ध होईल!

अर्थात ही गोष्ट सिद्ध करण्यासाठी फक्त नव्या लेखकांचाच आधार घेण्याचे कारण नाही. बाराव्या आणि तेराव्या खंडात अरविंद गोखल्यांचे लेख समाविष्ट करून कोलारकरांनी जी धमाल उडवून दिली आहे तिला तोड नाही! तेराव्या खंडातील गोखल्यांचा 'समांतर' (दीपावली, दिवाळी ७६) हा लेख आणि बाराव्या खंडातील त्यांचे 'थीबा' (प्रपंच, दिवाळी ७५) हे पुस्तकपरीक्षण वाचून कोणीही त्या 'कथा' आहेत असे म्हणण्याचे धाडस करावे!

## कथा की परीक्षण

'समातर' हा लेख म्हणजे १५ मे १९४९ पासून शं. द. जावडेकर यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यात तीन दिवस झालेल्या साहित्य-संमेलनाच्या वेळी त्या संमेलनाकडे पाठ फिरवून पु. ल. देशपांडे याच्या घरी जी मैफल झाली तिचा वृत्तांत आहे. वृत्ताताची बांधणी कथासदृश निवेदनाने केली म्हणून तिला कथा कसे काय ठरविता येणार? तो एक खटयाळ वृत्तातच आहे. कथा नाही!

'थीबा'ची गंमत तर आणखीनच वेगळी आहे. या कथेची सुरुवात पहा– (खंड १२, पान १२८) 'थीबा' ही कादंबरी सुमारे चारशे चतकोर पानांची आहे. प्रस्तावनेत प्रथम लेखकाने एका सूर्यास्ताच्या समयी साग राला उधाण आले असताना रत्नागिरीचा थीबा पॅलेस बघितला आणि त्याचे कुतूहल चाळवले, असा उल्लेख आहे......आता पुढे याच परिच्छेदात पहा ........कादबरीचा आराखडा कसा तयार झाला याचा मग

आलेख आहे......माहिती मिळविण्यासाठी केलेल्या आटापिटचाचा सविस्तर पाढा आहे.........पान १२९......कादंबरीची सुरवात होते तेव्हा......पान १३०...... ......उपोद्घातात उल्लेखिलेली विदुषकासारखी विचित्र भूमिका थीबाच्या वाट्याला कादबरीभर आलेली आहे...पान १३१... ......लेखकाने दोनएक प्रकरणात ब्रह्मी राजस्त्रिया कशा अश्लील भाष्य करीत, एकमेकींशी भाडत व दासीकरवी ती भाडणे वाढवीत याचे अनेक नमुने पेश केले आहेत......पान १३३......सिबायुमासीन सासू कादंबरीत धूमकेतुसारखी उगवते आणि उल्केसारखी अदृश्य होते......पान १३८... कादंबरी संपते तेव्हा......इत्यादी इत्यादी हे पुस्तक परीक्षण नसून कथा आहे, असे गृहीत धरून कोलारकरांनी 'सर्वोत्कृष्ट कथा'त ते समाविष्ट केले आहे.

चूक त्यांची नाही !! असलीच तर या परीक्षणाला कथा मानण्यापुरतीच आहे !! ज्या 'प्रपंच' (दिवाळी ७५) मध्ये ते समाविष्ट झाले, तेथेही मूळ संपादकाने (माधव कानिटकर) 'थीबा' हे ज्याच्या पुस्तकाचे परीक्षण आहे त्याचा नामोल्लेखही केलेला नाही आणि सरळ सरळ ती कथाच असल्याचे म्हटले आहे. आता गोखल्यानाही ती कथाच आहे असे म्हणायचे असेल, तर मग सारे बोलणेच खुटले !

एक तर या सर्वांनाच वाचक अडाणी वाटत असला पाहिजे, किंवा 'मी म्हणेन ती कथा' असा या संपादकमहोदयाचा दावा असला पाहिजे ! दहा पानी परीक्षणात आठ पानं कादबरीच्या सारांशावर खर्च केल्यावर त्या परीक्षणाला कथेचेच रूप येते, असे या सर्वांचे म्हणणे असेल, तर मात्र आमची कोणतीही तक्रार नाही !

या दोन संग्रहातील खरोखर सर्वोत्कृष्ट अशा काही कथाचा उल्लेखही येथे आवश्यक आहे. त्यात खंड बारामधील लता सप्रे याची 'अनुचं घर' ('नवयुग', दिवाळी ७५), म. वि. कोल्हटकर याची 'उगाच फुल' ('राजस', दिवाळी ७५), जयंत नारळीकराची 'उजव्या सोंडेचा गणपती' ('किर्लोस्कर', दिवाळी ७५), चारुता सागर याची 'फोड' ('बळीराजा', दिवाळी ७५) या कथांचा समावेश होईल. खंड १३ मध्ये सुधा नरवण्यांची 'पाखरं आणि राक्षस' ('स्वराज्य', ऑगस्ट ७६), अनिल रघुनाथ कुलकर्णी यांची 'कावळे' ('अनिकेत', दिवाळी ७६), रत्नाकर मतकरी यांची 'धुके ... धुके ...' ('मनोहर', दिवाळी ७६), सुरेश वेंगुर्लेकरांची 'शिकवणी' ('मोहिनी', दिवाळी ७६), पद्मजा फाटक यांची 'बिनपाठीचा कासव' ('राजस', दिवाळी ७६), व डॉ. विद्याधर पुडलिकाची 'निरोप' ('महाराष्ट्र टाइम्स', दिवाळी ७६) या कथा सुंदर आहेत. विविध रसाचा परिपोष, भाषेची खुलावट, उपमा–उत्प्रेक्षांचा संयम आणि नेमका वापर, विषयाची आणि आशयाची बाधीव माडणी, आवश्यक त्या सर्व तपशिलानी केलेली सजावट आदी विविध गुण या कथातून दिसतात.

आणखी एक महत्त्वाची गोष्ट. या दोन्ही संग्रहात मिळून श्री. दा. पानवलकर याची 'कमाई' ('सत्यकथा', जुलै ७५), ही एकमेव दलितकथा आहे. दलित साहित्यातून आलेल्या उत्तमोत्तम कथाना हे व्यासपीठ एवढीच जागा देऊ शकते, ही खरोखर विचार करण्यासारखी गोष्ट आहे. ग्रामीण कथेलाही फारसा वाव नाही. या २५ कथांत अवघ्या चार कथा ग्रामीण म्हणता येतील अशा आहेत. तशी 'राखीव' जागा साहित्याच्या प्रातात असावीच, असा माझा आग्रह नाही. मी फक्त वस्तुस्थिती मांडू इच्छितो.

नागरी कथांइतक्या चांगल्या कथा दलित वा ग्रामीण साहित्यात नाहीत, हे संख्याधारे खरे असेल, पण टक्केवारीच्या भाषेत ते कितपत खरे ठरू शकेल ? आणि विशेषत: जेव्हा दर्जेदार कथांचा विचार होतो तेव्हा तर हे अधिकच जाणवते.

कोलारकरानी त्याना उपलब्ध झालेल्या नियतकालिकाची सख्या १७६ वर गेल्याचे म्हटले आहे. तरीही त्यात अनेक प्रसिद्ध नियतकालिकाचा समावेश नाही. याखेरीज दैनिकांच्या साप्ताहिकांतून (रविवार पुरवणी) येणाऱ्या कथांचाही त्यानी विचार करावयास हरकत नसावी. मात्र हे दोन संग्रह पहाता त्यानी अधिक जागरूक रहावयास हवे; आपल्या कसोटचा अधिक कठोर करावयास हव्या आणि अरविंद गोखल्यांच्या लेखांसारखे साहित्य त्यात घुसणार नाही, याची खबरदारी घ्यावयास हवी, असे वाटते. अन्यथा एका डागाने धवल वस्त्र डागळले, तरी त्याची स्वच्छता संपुष्टात येतेच !

— सुरेशचंद्र पाध्ये

**सर्वोत्कृष्ट मराठी कथा**
संपादक : श्री. राम कोलारकर,
सौ. छाया कोलारकर
प्रकाशक : सौ. छाया कोलारकर,
४३।३४८, संत तुकारामनगर
पिंपरी, पुणे १८.
खंड १२ : पृष्ठ १७०, मूल्य : २५ रुपये.
खंड १३ : पृष्ठ २०४, मूल्य : ३० रुपये.

# परिचय

'विविध प्रसंगांसाठी नमुनापत्रे', 'कॅरम तंत्र आणि मंत्र', 'निवंगं एकशिक्षकी शाळा' आणि 'कॅन्सर व त्यावरील उपचार' ही चार पुस्तके एप्रिल १९८१ ते जानेवारी १९८२ या काळात प्रसिद्ध झाली. कॅन्सरवरील श्रीविद्याने प्रकाशित केलेले पुस्तक सोडल्यास इतर तीन पुस्तके मॅजेस्टिकची आहेत.

एस. जी. गुप्ते याची 'नमुनापत्रे' पत्रे लिहू पहाणाऱ्यांना मार्गदर्शक आहेतच, पण 'पत्र लिहिणे' हा ज्यांचा 'वीक पॉइंट' आहे त्याना मदतीचा हात देणारीही आहेत. कारण रोजच्या जीवनात असे अनेक प्रसंग येतात की, एकमेकाना पत्र लिहिणं तर जरूर असतं. पण काय लिहावं नि कसं लिहावं हा प्रश्न पडतो.

या पुस्तकात प्रेमपत्रापासून शोकवार्तेपर्यंत आणि मुलगी सांगून जाण्यापासून शेजारच्या बंगलेवाल्याला त्याच्या चावऱ्या कुत्र्याबद्दल समज या व यासारख्या विविध प्रसगी लिहिण्यासारख्या, विषयवार वर्गीकरण करून लिहिलेल्या पत्राचे १११ 'स्टॅंडर्ड' नमुने आहेत. त्यात थोडाफार बदल करून कोणीही हे नमुने वापरावेत आणि पत्रलेखक बनावे. ज्याना ही पत्रलेखन-कला अवगत आहे, त्यांना ही पत्रे फारच घरगुती ट्रॅडिशनल आणि ठरीव छापाची वाटतील. पण त्याच्या

साठी हे पुस्तक नाही ! /

दुसरं पुस्तक आहे कॅरम-तंत्र आणि मंत्र. अरुण देशपांडे यांचं हे पुस्तक कॅरमविषयी जाणकारीने मराठीत लिहिलेले पहिलेच पुस्तक आहे. या पुस्तकाचे लेखन तर चांगले झाले आहेच, पण त्यामागील अनुभवाधिष्ठित पार्श्वभूमी आणि कॅरमविषयीच्या माहितीची परिपूर्णता अशी आहे की, नवशिक्यांप्रमाणे सराईत खेळाडूंनाही त्याचा उपयोग होईल.

बहुतेक सर्वजण कॅरम खेळू शकतात. पण या खेळाबद्दलची प्राथमिक माहिती मात्र फारशी नसते. उदा. कॅरमच्या सोंगट्यांवर कोरीव वर्तुळे कशासाठी असतात ? स्ट्रायकरची बनावट आणि त्याचे वजन याचे महत्त्व काय ? या मुद्द्यांवर लेखकाने दिलेली शास्त्रीय माहिती उपयुक्त आहे. तसेच ग्लान्स, पुश, बॅक-कट, रिबाउंड यासारखे संभाव्य शॉटस् कसे मारावेत याचेही तंत्रशुद्ध वर्णन या पुस्तकात आहे. पुस्तकाचं दुसरं वैशिष्टय म्हणजे तंत्रविषयक खुलाशासाठी. उदा. स्ट्रायकर कसा धरावा ? मजकुरासोबत जोडलेली ८ छायाचित्रे आणि ३१ बोलक्या रेखाकृती आणि क्रिकेटपटू सुनील गावसकर यांची बोलकी प्रस्तावना. कॅरम खेळणाऱ्यांनी हे पुस्तक संग्रही ठेवायला पाहिजे.

डॉ. मा. गो. माळी यानी लिहिलेले 'निर्वर्ग एकशिक्षकी शाळा' हे पुस्तकही लक्षवेधक आहे. भारत हा खेड्यांचा देश. तोदेखील छोटया खेड्यांचा. खेड्यांमधे शिक्षणासाठी बहुशिक्षकी शाळा चालविणे शक्य नसते. तिथे निर्वर्ग एकशिक्षकी शाळा यशस्वी झाल्या आहेत. एकशिक्षकी शाळांची परंपरा प्राचीन काळातील गुरुकुलापासून आहे. मौनी विद्यापीठात २० वर्षांपूर्वी शिक्षणतज्ज्ञ डॉ. जे. पी. नाइकांनी प्रयोगासाठी आणि संशोधनासाठी स्वतंत्र एकशिक्षकी शाळा स्थापन केली. यानंतरचा टप्पा म्हणजे निर्वर्ग-शाळा. ग्रामीण भागात या शाळानी शिक्षणाबरोबर समाजविकासाचे कार्य उत्तम रीतीने पार पाडल्याचा इतिहास आहे. पण सध्याच्या भारतीय शिक्षणपद्धतीत या शाळांना अजूनही नगण्य स्थान आहे.

या उपेक्षित शिक्षणवर्गाबद्दलची सर्व माहिती या पुस्तकात आहे. उदा. निर्वर्ग शाळेसाठी किमान साहित्य, वेळापत्रक, पुनर्रचित अभ्यासक्रम, प्रगतिपत्रक, स्वाध्याय, विद्यार्थी नोंदी, नमुना, चाचण्या इ. अनुत्तीर्णता आणि गळतीला मूठमाती देण्यासाठी डॉ. कोठारी आयोगाने सुचविलेल्या निर्वर्गघटकावर आधारित निर्वर्ग शाळेबद्दलची माहिती शिक्षणप्रेमींना, समाजसुधारकांना आणि शिक्षणक्षेत्रातील अभ्यासूंना उपयुक्त आहे.

कॅन्सर हा रोग 'असाध्य' गटात गेला आहे. त्यामुळेच कॅन्सर म्हणजे काय ? इतर रोग आणि कॅन्सर यात काय फरक आहे ? या विषयी अनेकाना योग्य माहिती नसते. त्यामुळे साधी गाठ आली तरी कॅन्सरची शंका उपस्थित करून माणूस झुरू लागतो. यासाठी 'कॅन्सर व त्यावरील उपाय' हे वैद्य एम. वाय. पराजपे यांचे पुस्तक उपयुक्त आहे. वैद्य परांजपे मुंबई, पुणे येथे संजीवन पद्धतीनुसार वैद्यकीय व्यवसाय करतात. संजीवन चिकित्सेनुसार कॅन्सरवर उपचार करण्याची पद्धत निराळी आहे. यासंबंधीची संपूर्ण माहिती 'कॅन्सर आणि संजीवन-चिकित्सा' या प्रकरणात आहे. रुग्णाशी कसे बोलावे, वागावे हा रोगचिकित्सेतील एक महत्त्वाचा भाग. पुस्तकात या बद्दलचे विवेचन आहे. संजीवनचिकित्सेमुळे बचावलेल्या रोग्यांचे रिपोर्ट पुस्तकाच्या शेवटी दिले आहेत. कॅन्सररोग व रोगासंबंधीची विशिष्ट उपचारपद्धती म्हणून हे पुस्तक वाचायला हरकत नाही. ☐

१) **विविध प्रसंगांसाठी नमुनापत्रे**
लेखक—एस जे. गुप्ते
मॅजेस्टिक प्रकाशन
पृष्ठे—९०, मूल्य—१० रु.

२) **कॅरम—तंत्र आणि मंत्र**
लेखक—अरुण देशपांडे
मॅजेस्टिक प्रकाशन
पृष्ठे—१३६, मूल्य—१२ रु.

३) **निर्वर्ग एकशिक्षकी शाळा**
लेखक—डॉ. मा. गो. माळी
मॅजेस्टिक प्रकाशन
पृष्ठे—११६, मूल्य—१२ रु.

४) **कॅन्सर व त्यावरील उपाय**
लेखक—एम. वाय. परांजपे
श्रीविद्या प्रकाशन
पृष्ठे—८८, मूल्य—१२ रु.

# वेडेपणा ?

कोणत्याही 'उपद्व्यापात' आघाडीवर माझा एक मित्र आहे. सहसा तो स्वतःबद्दल फारसा कधी बोलत नाही.

आपण उपाशी असलो तरी आपल्या चेहऱ्यावरून ते इतराना जाणवायला नको, असं वागणारा. एखादी गोष्ट करायची ठरल्यावर झोकून देऊन करणारा. अंग चोरून काम करणं त्याला ठाऊकच नाही.

त्या दिवशी भेटला. म्हणाला, 'चल निवांत बोलू या !'

बोलण्यात आठवणी चघळता चघळता तो बरंच बोलला.

फक्त तो बोलत होता—मी ऐकत होतो.

'एखाद्या अर्धवट गावात राहणारे आपण आपला अभ्यास, आपली करिअर, खेळ, सिनेमा, नाटक, कॉलेजातल्या पोरी असले विषय सोडून कधी तरी न कळत 'वेडेपणा' करून जातो. माझं असंच झालं.

'कोणत्या तरी विद्यार्थी संघटनेच्या मीटिंगला मित्रानं ओढून नेलं म्हणून गेलो.—आणि जातच राहिलो. नकळत तिथं रमलो, कळलंच नाही कसा ते.

'अंग चोरणं माहीत नाही त्यामुळं सोपवलेलं प्रत्येक काम करत राहिलो. आपोआप काम वाढत गेलं. समजूत आली. जाणीव निर्माण झाली तसा कामात आणखीनच गुरफटलो. वर्तुळ वाढलं, सामाजिक, सास्कृतिक कार्यक्रमांना जात राहिलो. अशा उपक्रमातील सहभाग वाढला.

'एखादा मोर्चा, एखादा परिसंवाद, हनुमानजयंतीची वर्गणी, चौकातला गणेशोत्सव, दुष्काळग्रस्तांसाठी कपडे, आणि पूरग्रस्तासाठी निधी यापलीकडं 'सार्वजनिक कामात (?)' धाव नसते.

पण डोक्यात वारं असतं—

'आपण 'कुणी तरी' आहोत, विशेष करतो आहोत, असं उगीचच वाटायला लागतं. हा रस घेतोय म्हटल्यावर आणखी कामात गुरफटून टाकणाऱ्या जबाबदाऱ्या टाकल्या जातात. आपण नकळत आणखी एखादं

'ओझं' उचलतो

'असाच एका सभेला स्वयंसेवकाचा बॅच लावला. त्या ग्रुपमध्ये वावर सुरू झाला. संबंध वाढले आणि त्या पक्षाचाच होऊन गेलो!

'या गावातले बोर्ड रंगवणं आलं, माईकवरची अनाउन्समेंट आली, मेळावे, शिबिरं, सभा, समेलनं. बैठका सगळच सुरू झालं आणि हळूहळू तेच रूटिन बनून गेलं.

'ओळखी वाढल्या, संबंध वाढले–त्यामुळं चार नमस्कार झडायला लागले.

'दिल्लीत काय चाललंय?'

'पोटनिवडणूक काय म्हणतीये?'

'मंत्रिमंडळात कोणाची वर्णी लागतीये?' –लोक विचारत असतात.

'आपल्याला आपण कुठं आहोत हे माहीत असतं–तरीही वर्तमानपत्री माहिती ठोकून देतो, उत्तर देणं भाग असतं!

'या सगळ्या गडबडीत परीक्षा आल्या–गेल्या. नापासाचा शेरा कधी लागला नाही. शिक्षण संपलं; पण बनलेलं रूटिन मात्र कायम राहिलं. आपलं पुढचं आयुष्य-त्याचं भविष्य-विचार कधी केलाच नाही. ऐषमध्ये रहावं अशी परिस्थिती कधी नव्हतीच; पण भानही नव्हतं

'हळूहळू घरच्यांचा उद्वेग जाणवायला लागला बाहेरचेही टोकायला लागले. 'काय करतोस?–धंदा–नोकरी वगैरे', चौकश्या सुरू झाल्या. अशांच्या बोलण्यातून फक्त कीव डोकवायची. भयानक चीड यायची घरी बसणं शक्यच नसतं, बाहेरही त्यापेक्षा वेगळी स्थिती नाही. 'उपद्व्यापात' ही मन नसतं. रिकामपण तर खायला उठतं!

'–आणि या सगळयाचा उबग आला. आपल्या मागचेही पुढं गेल्याचं दिसतंय–आपलं काय–? प्रश्नच असतो. या 'नस्त्या उठाठेवीही' मग बंद झाल्या.

'भेडसावणाऱ्या भविष्यानं भरकटायला झालं. आता आपल्याकडे फिरकायलाही कोणाला वेळ नाहीये. त्याना दोष कशाला द्यायचा? त्यांचा मतलब पुरता संपलेला आहे; पण इतके दिवस आपण फक्त 'ओझ्याचे गाढवं' होतो ही खंत उद्विग्न करते. आपला मार्ग आपल्यालाच शोधायला हवा!

'आज मला आमच्या कॉलेजच्या सेंड-ऑफची आठवण येतेय–

'खूप भोगलेले' आमचे एक सर भाषणात म्हणाले होते–

'समाज–बिमाज सगळं झूट आहे. दुसऱ्यासाठी जगलास हे झूट आहे. स्वत साठी जगलास तर जगलास, हेच खरं! या दुनियेत कदर करणारं कुणी भेटणार नाही, मदतीला कुणी असणार नाही–'

'सरांना त्या वेळेला हसलो होतो. आज स्वतःला हसतोय–बोलून संपलं–'

रितं झाल्यासारखा क्षणभर तो सुन्न बसला.

मग एकदम उठला–खळखळून हसत पाठीवर थाप मारून निघाला. त्याचा मूड पुरा बदललेला–आपली खळबळ इतरांना जाणवायला नको असा! पण त्याच्या बोलण्यानं सुन्न झालेल्या माझा अस्वथ मूड अजूनही तसाच आहे!

**–विनय गुणे, संगमनेर**

---

## कै अण्णासाहेब पाटील

**पृष्ठ २ वरून**

शिकून शहाणी व्हावीत याचेही अण्णांना भान असे. त्यासाठीच त्यांनी विविध संस्थांची उभारणी केली होती.

कामगाराकडे जातीने लक्ष देणे हा अण्णासाहेबांचा जात्याच असणारा गुण! या माथाडी कामगारांना मुंबईत रहाण्यासाठी घर असावे म्हणून मुंबई परिसरात एका गृहनिर्माण संस्थेचे ते लवकरच उद्घाटन करणार होते. अण्णाच्या मार्गदर्शनामुळेच या कामगाराने आतापर्यंत गावी छोटेसे घर बाधलेले आहे. कामगाराने दारू पिऊन, धिंगाणा घालून कुटुंबाची वाताहात करावी हे त्याना बिलकुल खपत नसे. तशा कामगाराची बायको अण्णांच्याकडे तक्रार घेऊन आली तर अण्णा त्या कामगाराला असा काही सरळ करत की त्याला जन्माची याद रहावी!

एखादा भला मोठा डोंगर अचानक कोसळून पडावा त्याप्रमाणे अण्णासाहेब गेल्याने लक्षावधी कुटुंबाचा आधार आज गळून पडला आहे! कामगारवस्तीला तर शोककळाच प्राप्त झाली आहे. ज्या अण्णांनी आम्हाला वाढवलं, आम्हाला सामाजिकतेचे, राजकारणाचे धडे दिले, आमच्या कुटुंबावर प्रेम केलं, ते अण्णा आम्हाला सोडून गेल्याने आम्ही आता कोणाच्या आधारावर जगायचं, कोणाच्या वात्सल्याखाली जगायचं याचंच कामगाराला राहूनराहून दुःख होतं आहे! अण्णा गेले त्या दिवशी हातातील सर्व कामं बाजूस टाकून हा कामगार अण्णाच्या मृतदेहावर पडून ढसाढसा रडला! त्यांच्या अंत्ययात्रेला तीन लाख लोक जमले! संपूर्ण चंदनवाडी माणसांनी भरून गेल्याने लोकाना बाहेर उभं रहावं लागलं. शेवटच्या शोकसभेत वक्ते बोलत होते, पण ह्या वक्त्यांचे एक एक बोल लोकाचे काळीज हेलावून टाकत होते!

अग्निसस्कारानंतर कामगार घरी परतले; पण त्यांचे कशातच लक्ष लागेना! जेवण त्यांना गोड लागेना. ज्या अण्णाच्या समवेत आपण इतके दिवस काम केले ते अण्णा, त्याचे ते धिप्पाड, बलदंड शरीर, त्यांचा तो घणाघाती आवाज आपल्याला परत केव्हाच ऐकावयास मिळणार नाही, ह्या जाणीवेने लोकाची झोपच उडाली! आज त्यांच्या डोळ्यासमोर अण्णा जसेच्या तसे दिसतात आणि मग व्याकुळतेने त्यांना अगदी असह्य होतं.

अण्णाच्या निधनाचे वृत्त समजताच मा. यशवंतराव चव्हाण दिल्लीहून आले. शरद पवार तर सकाळपासूनच अण्णांच्या पार्थिव देहापाशी बसून सर्वांचे सात्वन करत होते. अण्णांचे ते बलदड शरीर, त्या धारदार मिशा पाहून यशवंतराव डोळ्यांत पाणी आणून आपला हुंदका आवरत म्हणाले, 'आज माझ्या घरचाच माणूस निघून गेला' होय, अण्णा हे सर्वांनाच घरच्यासारखे होते. अशा या अण्णांच्या स्मृतीस अनंत प्रणाम!

**–मोहन शं. कुलकर्णी**
**घाटकोपर.**

---

**दुरुस्ती....**

दि २० मार्च १९८२ च्या माणूस अंकात 'संगीत सौभद्र' या वनस्थळी ग्रामीण विकास केंद्रानं सादर केलेल्या प्रयोगाचं परीक्षण आलं आहे वनस्थळीचे विश्वस्त या प्रसंगी बोलले. त्याचं नाव श्री. देवराम गोरडे आहे परीक्षणात त्याचं नाव चुकीचं छापलं गेलं आहे.
१९ मार्च –किशोरी उपलेंचवार, शिरूर

रंगभूमी

# संगीत ' अमृतमोहिनी '

सगळीकडे दरवळणारा धुपाचा धूर. त्यातूनच उमटणारे ऑर्गनचे सूर. त्यापाठोपाठ नटराजाला वंदन करणाऱ्या नांदीचे दृश्य रंगमंचावर उभे असते.

सौभद्र-स्वयंवर-मानापमानाचा जमाना डोळ्यांपुढे उभा राहतो 'ललितकलादर्शन'-ची जयजय गौरीशंकर, सुवर्णतुलाची फळी आठवायला लागते. 'मराठी रंगभूमी'चे 'स्वरसम्राज्ञी', पुरुषोत्तम दारव्हेकरांची 'कटयार काळजात घुसली' ऐकू येऊ लागते. एकतीस ऑक्टोबर एकोणीसशे ऐंशीला अण्णासाहेब किर्लोस्करांच्या 'शाकुंतल'ने मराठी रंगभूमीवर संगीत नाटकाची ही भलीमोठी परंपराच निर्माण केली. या सगळ्या रांगेतील एखाद-दुसरा अपवाद वगळता गाण्याचे प्रयोजन वा प्रस्तुतता याचा विचार न करता एका कथानकाचा आधार घेऊन गद्य संवादांच्या साह्याने जोडलेली उपशास्त्रीय संगीताची मैफल नाटयगीतांच्या स्वरूपात सादर करणे असेच या बहुतेक संगीत नाटकाचे स्वरूप होते. 'अभिनय' या नाटयसंस्थेतर्फे नुकतेच रंगभूमीवर आलेले यशवंत रांजणकर लिखित आणि बाळ कुडतरकर दिग्दर्शित 'संगीत अमृतमोहिनी' हेही अशाच जलशाच्या माळेतील एक नाटक.

'अमृत मोहिनी'चे कथानक आहे भस्मासुराच्या आत्मघाताचे. (अर्थातच कथानक या प्रकारातील उत्कंठा–जर थोडी-फार असलीच तर–नाटक सुरू होताच सुरवातीच्या काही क्षणांमध्ये आणि दोन गाण्यांमध्ये संपते.) यातील प्रमुख भूमिका आणि कलावंत पुढीलप्रमाणे : शंकर–प्रकाश घाग्रेकर, भस्मासुर–प्रसाद सावकार, नारद–चंद्रकांत कोळी, इंद्र–नारायण बोडस, पार्वती–नीलकमल आणि विष्णू–अजित कडकडे. आता पार भस्मासुरापासून इंद्रापर्यंत आणि नारदापासून पार्वतीपर्यंत सगळी गायकमडळीच घेतल्यानंतर या चोथा कथानकापेक्षा गाण्यांकडे सगळ्याचे लक्ष राहणार, हे उघडच होते. तरीही कथानकात कित्येक जागी सूचक संवाद टाकून या पुराणातील वाग्याचा आधुनिक कटलेट वा हॅंबुर्गशी साधा जोडण्याचा केविलवाणा प्रयत्न संपूर्ण संहितेत केला होता. (हा उघड प्रयत्न 'ज्याला जे जाणवेल, ते त्याने स्वीकारावे. आमचे त्याबाबतीत काही म्हणणे नाही,' या सबबीखाली दडवूनही मुंबईतील कोण्या एका पत्रकाराला या भस्मात सिमेंटची भेसळ आढळली म्हणे!) केवळ संवादापुरताच हा प्रकार मर्यादित राहिला नव्हता; तर भस्मासुराच्या रंगभूषेतूनही अल्पसंख्याकाना (दलित आणि मुसलमान) प्रतिनिधित्व मिळत होते.

इतके असूनही नाटकातील गायक नटाचा मोठा ताफा आणि 'संगीत–जितेंद्र अभिषेकी' असे भरघोस नाव यामुळे गाणी हे या नाटकाचे प्रमुख आकर्षण होतेच. नाटकामध्ये नांदी आणि अखेरचे जितेंद्र अभिषेकींनी स्वतःच पार्श्वसंगीताप्रमाणे गायलेले 'खेळत नटराज साव' हे गीत वगळता एकूण तेरा गाणी आहेत. ही तेरा गाणी आधी उल्लेखलेल्या सहा गायक नटांना सारखी वाटून देण्याच्या प्रयत्नात दिग्दर्शक आणि पर्यायाने संगीत–दिग्दर्शकही एकाही गायकाचे गाणे पुऱ्या कौशल्याने बाहेर काढू शकले नाहीत. सगळे गायक–नट बिचारे मिळालेल्या दोन-अडीच पदांमध्ये शक्य तेवढी कसरत करून घेतात. (या कसरतीबरोबरच त्यांच्याकडे आणखीही काही कामगिऱ्या सोपवल्या होत्या, ज्या त्यानी यथायोग्य पार पाडल्या–अजित कडकडे यांनी मुळगावकरांच्या कॅलेंडरमधील गोड, चिकणा चोपडा, देवआनंदी (म्हणजे चॉकलेटी), पण थोडा बायकी विष्णू उभा करणे. प्रसाद सावकरांनी अन्य काही कलाकारांच्या मदतीने मधून मधून विदुषकी चाळे करीत 'भस्मासुराचा वध' या बालनाटयातील काही प्रवेश सादर करून नाटकास आलेल्या बालप्रेक्षकाचे मनोरंजन करणे.)

संपूर्ण नाटकात मनसोक्त वाव मिळालेला एकच माणूस असावा–स्वाधीन डे. नाटकातील प्रकाशव्यवस्था आणि अनेक चित्तचक्षुचमत्कार दाखविण्याची जबाबदारी या प्राण्यावर होती. पडदा उघडताच कैलासाच्या एका शिखरामागे एक कधी न उगवणारा, न मावळणारा स्तब्ध तांबडा सूर्य, रंगमंचावर धडाडत पळणारे ढग आणि कडाडत कोसळणारा पाऊस, जमिनीवर खडा पडताच उठणाऱ्या आगीच्या लोळातून उत्पन्न होणारा भस्मासुर; भस्मासुराने केलेला शंकराचा जीवघेणा पाठलाग आणि या सर्वांवर कडी म्हणजे रंगमंचावर धडाडत जळणारा भस्मासुर अशी या स्वाधीनभाऊने अगदी मनचाही हौस फेडून घेतली !

संगीत नाटकातील संगीत हा प्रकारच मुळात पुरेसा ताकदीचा न झाल्याने विष्णू आणि इंद्राचे सतत आखडल्यागत चालणे, बसणे, नारदाचे उगाचच खोटे खोटे हसणे आणि मधूनमधून पाठांतर चुकणे अशा अन्य बारीकसारीक कुसळांचे खुपणे सुरूच होते.

सर्वच गायक–नटांचे, विशेषतः चंद्रकांत कोळी, नीलकमल, नारायण बोडस यांचे अभिनंदन ! या साऱ्यांनीच अपुऱ्या संधीमध्येही आपल्या कौशल्याने श्रोत्यांना हरप्रयत्ने जिंकण्याचा प्रयत्न केला.

– सदानंद बोरसे


वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे
प्रेरणादायी चरित्र

**एक होता कार्व्हर**

लेखिका : सौ. वीणा गवाणकर

मूल्य : रुपये पंधरा

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव, पुणे ३०

MANOOS ( Marathi Weekly ) 100 Paise Regd. No. PNC-W 28
( Licensed to post without prepayment of postage-No. 11 )

# तत्परतेने कर जमा करा

- त्यामुळे व्याज आणि दंडाची बचत होते.
- ताण आणि काळजी टळते.
- हे चांगल्या नागरिकत्वाचे लक्षण आहे.
- राष्ट्रनिर्मितीसाठी साधनसामग्री गोळा करण्यास मदत होते.

कर भरण्यासाठी ठराविक अखेरची तारीख असते; पण अखेरच्या तारखेची वाट पाहायची कशाला? विलंब केल्यास गफलत होण्याचीच शक्यता असते.

---

## योग्य कर भरा : राष्ट्र बलवान करा

---

निवेदक

**डायरेक्टर ऑफ इन्स्पेक्शन**

(रिसर्च, स्टॅटिस्टिक्स अँड पब्लिक रिलेशन्स)

इन्कम टॅक्स डिपार्टमेंट

नवी दिल्ली – ११०००१

davp 31/341
Marathi